म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव आचार मीमांसा

सन

५८

धर्म

सन - १८८५
सं. धर्म ७३७

# आचार मीमांसा.

आणि

## आमच्या

———— भोळेपणाची कमाल.

———————— भोळेपणाचा कळस.

———————————— भोळेपणाचा कडेलोट.

——:०✳०:——

एकोऽपि वेदविद्धर्मं यं व्यवस्येद् द्विजोत्तमः
स विज्ञेयः परोधर्मो नाऽज्ञाना मुदितोऽयुतैः मनु.

---

"विचाराचें आणि बोलण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असल्या वांचून धर्माची दैन्यावस्था नाहींशी व्हावयाची नाहीं." मोक्षमूलर.

---

लेखक.

**केशव वामन पेठे.**

---

( सर्व हक्क पुस्तक कर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

---

सन १८९९.
मुंबईत 'बॉम्बे न्यू प्रेस' मध्यें छा. प्र. केलें.
किंमत ८ आणे.

# अर्पण पत्रिका.

बहु सन्माननीय–परलोकवासी,

प्रि॰ गोपाळ गणेश आगरकर.

यांस:—

त्यांची, आह्मां लोकांतील भोळेपणाच्या गोष्टी

समूळ नष्ट करण्याविषयींची उत्कट इच्छा,

सुधारणे विषयीं अमर्याद उल्हास,

अलौकिक स्पष्टवक्तेपणा,

अद्वितीय अदांभिकत्व,

विलक्षण निस्पृहता,

अप्रतिम सत्यप्रीति,

खरी कळकळ,

इत्याद्यनेक

अनुकरणीय

मंगल गुणांच्या अभिनंदनार्थ

हा अल्प यत्न

प्रेमपुरःसर व नम्रतापूर्वक अर्पण केला असे.

पु॰ कर्ता.

# या पुस्तकावर विद्वानांचे अभिप्राय.

## रा. रा. श्री. रा. भांडारकर. एम. ए.

आसि. रेजि. युनि. ऑफ बॉम्बे यांचा अभिप्राय.

" श्रम वांचविण्याच्या हेतूनें शब्दासच चिकटून अर्थास फांटा देणें हा ...ष्य जातीचा सर्वत्र स्वभावच आहे, तथापि हिंदू लोकांमध्यें या ...भावानें सांप्रतकाळीं जो कहर करून सोडला आहे तसा दुसऱ्या ...णत्याही लोकांमध्यें नसेल. तरी या प्रमाणें शब्दासच चिकटल्या... हिंदूलोकांच्या आचारांमध्यें केवढा खुळेपणा, विसंगतपणा व पर...र विरोध पदोपदीं दिसून येतो, व शास्त्रकारांनीं सांगितलेल्या विधि...षेधांचें पालन ह्मणून जो आचार ते करितात, त्या आचारानेंच ...स्त्रकारांच्या उद्देशांविरुद्ध त्यांचें वर्तन किती होतें हें दाखविण्याचा ... रा. पेठे यांनीं आपल्या " आचार मीमांसे " मध्यें जो उद्योग ...ला आहे तो फारच स्तुत्य आहे. मीं या ग्रंथाचीं कांहीं पानें ...चून पाहिलीं आहेत, आणि मला वाटतें कीं, जें जें कांहीं रा. रा. ...ठे यांनीं या ग्रंथामध्यें सांगितलें आहे तें सगळें जरी लोकांस मान्य ...लें नाहीं तरी, हा ग्रंथ वाचून त्यांत विवेचन केलेल्या गोष्टींचें यथा...ग्य रीतीनें, जर लोक मनन करतील तर फारच चांगलें होईल. "

ता. १९।१२।९९

---

## रा. रा. सदाशिवराव पांडुरंग केळकर, यांचा अभिप्राय.

रा. रा. केशव वामन पेठे यांणीं आचार मीमांसा नांवाच्या केलेल्या ...स्तकाचे दोन भाग मीं वाचून पाहिले. धार्मिक व सामाजिक गोष्टींत ...चार होते कसे, हल्लीं आहेत कसे, व ते असावे कसे, याविषयीं ...थकर्त्यांच्या विचाराची जी मुख्य दिशा आहे ती योग्य आहे. अशा ...हेचा यत्न होणें अत्यंत आवश्यक आहे. कित्येक गोष्टींत मतभेद ...णें साहजिक आहे व तसा माझाही आहे तरी, त्यामुळें पुस्तकाच्या ...ख्य उद्देशाला बाध येत नाहीं. पुढील भाग अद्यापि छापून तयार ...हींत यामुळें त्यांविषयीं कांहीं ह्मणतां येत नाहीं तरी तेही, या दोन ...गां प्रमाणें उपयुक्त होतील असा अजमास करण्यास हरकत दिसत ...हीं. ता. ९ फेब्रुवारी १८९६

## हें पुस्तक लिहिण्यास ज्या ग्रंथांचें साह्य घेतलें त्यांचीं नांवें.

१ मनुस्मृति.
२ बकल साहेबांचा सुधारणेचा इतिहास.
३ वेदार्थयत्न.
४ बैबल.
५ The Human Hair.
६ Evolution of clothing.
७ फायलालजी.
८ आश्वलायन गृह्यसूत्र.
९ मांसाहार.
१० The cow question in India.
११ वैदिक हिंदुधर्म.
१२ दार्विनचें उत्क्रांति मत.

यां खेरीज तुकाराम, रामदास, वामन इत्यादि सर्वमान्य कविजनांच्या ग्रंथांतून प्रसंगवशात वचनें घेतलीं आहेत.

या साहाय्याबद्दल मी सर्वांचा फार ऋणी आहें.

आचारमीमांसेचा कर्ता.

---

## अनुक्रमणिका.

उपोद्घात. पान. १—३

### भाग १ ला.

## धार्मिक भोळेपणा.


| विषयानुक्रम. | पान. | विषयानुक्रम | पान. |
|---|---|---|---|
| ईश्वरासंबंधीं भोळेपणा. | ३—१०. | मंत्रसामर्थ्य | १८—२१ |
| दुष्ट गुणी देव | १०—१२ | नामोच्चारण | २१—२६ |
| क्लिष्ट देवता | १२—१४ | पोथीवाचन | २६—३० |
| भ्रष्ट देवता | १४—१५ | भाषेसंबंधीं भोळेपणा. | ३०—३४ |
| संध्या | १५—१८ | प्रायश्चित्त | ३४—४१ |


### भाग २ रा.

## सामाजिक भोळेपण.


| विषयानुक्रम. | पान. | विषयानुक्रम | पान. |
|---|---|---|---|
| केश | ४२—५६ | आंगधुणें | ७२—९१ |
| वस्त्राच्छादन | ५६—७२ | न्हाणें | ९१—१२८ |

# याच ग्रंथकर्त्यांच्या कित्येक पुस्तकांची याद.

## पुस्तकें छापून तयार.

| पुस्तकाचें नांव | किंमत आ. पै. |
|---|---|
| १ आचार मीमांसा. ( पूर्वार्ध ) ... ... ... ... ... ... ... ... ... | ८—० |
| २ उद्योग नशीबाचा कारागीर ... ... ... ... ... ... ... ... ... ... | ४—० |
| ३ बाष्पनौका प्रहसन. ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... | ४—० |
| ४ सांप्रतच्या शिक्षणांतील दोष व ते कसे दूर करावे ? मुं. महा. वक्तृ. सभेंत बक्षीस मिळालेला विषय. ... ... ... ... ... ... ... ... ... ... | ३—० |
| ५ राष्ट्र भाषा. ( पुणें वक्तृ. सभेंत ब. मि. विषय.)... ... ... ... ... | ३—० |
| ६ समाज, शंकराचार्य व सुधारक. म्हणजे, सामाजिक सुधारणें संबंधी समाज, शंकराचार्य, व सुधारक. यांचें संमेलन ( हेमंतोत्सवांत दिलेलें व्याख्यान. ) | २—६ |
| ७ आमचे कलाकौशल्यांत सुधारणा करण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत ? ( हेमंतोत्सवांत दिलेलें व्याख्यान. ) ... ... ... ... ... | २—६ |
| ८ एका विक्षिप्त विद्यार्थ्याचा फार्स ... ... ... ... ... ... ... ... | २—० |
| ९ नीतिधैर्य. ( मु. म. व. सभेंत बक्षीस मिळा. विषय. )... ... ... ... | २—० |
| १० स्तोत्रमाला. ( निरनिराळ्या रागरागिण्यांत म्हणतां येण्याजोगीं पद्यें ) ... | ०—९ |

---

## लौकरच छापलीं जाणारीं.

आच्छादन मीमांसा

१ शीर्षाच्छादन. भाग १ ला. स्वाभाविक शीर्षाच्छादन म्ह. केश.

भाग २ रा. कृत्रिम शीर्षाच्छादन म्ह. पागोटीं वगैरे.

२ वस्त्राच्छादन. भाग १ ला. वस्त्रांचा इतिहास. समाज शास्त्रदृष्ट्या विचार.

भाग २ रा. वस्त्रें कशीं असावीं ? आरोग्य शास्त्रदृष्ट्या विचार.

३ तिर्यक् प्राण्यांचे हक्क:—मुक्या प्राण्यांविषयीं पार्लमेंतांत वेळोवेळीं झालेल्या कायद्यांच्या भाषांतरासह.

४ प्राचीन आर्यधर्माचा आरोग्याशीं संबंध.

५ सुश्रुत शारीराचें मराठी भाषांतर.

६ नाट्यमीमांसा:—पाश्चात्य देशांतील नाटकांच्या इतिहासासह.

७ नामस्मरण:—हेमंतोत्सवांत दिलेलें व्याख्यान.

८ विश्वचमत्कार. चंद्र सूर्यादि खस्थ पदार्थांवरून मनुष्यांनीं काय शिकावें ?

# याच ग्रंथकर्त्याच्या कित्येक पुस्तकांची याद.

९ मराठी भाषेचें शुद्धलेखन:—

१ व्याकरणदृष्ट्या, २ उच्चारदृष्ट्या व ३ वर्णाक्षरदृष्ट्या विचार.

१० स्त्रीपुरुषांचे मिश्रसमाज. ( ठाणें वक्तृत्व सभेंत बक्षीस मिळालेला विषय. )

११ गोमूत्रावर निबंध.

१२ आमच्या कापसाचा व्यापार व त्याच्या भरभराटीस उपाय. ( ठाणें वक्तृत्व सभेंत बक्षिस मिळालेला विषय. )

१३ धर्मभंगाचे भयंकर परिणाम व तन्निवारणार्थ उपाय. ( सोलापूर वक्तृत्व सभेकडून बक्षीस मिळालेला विषय. )

१४ नॅशनॉलिटि. ( सातारा वक्तृत्व सभेकडून बक्षीस मिळालेला विषय. )

१५ इंग्लिशराज्यापासून आमचे झालेले नफे तोटे ( चिपळूण वक्तृत्व सभेकडून बक्षीस मिळालेला विषय. )

१६ देशी कपडा वापरण्यापासून फायदे. ( नाशीक वक्तृ. स. ब. मि. विषय. )

१७ राष्ट्रीयसभेविरुद्ध लार्ड डफरिन व सर आकलंड कालव्हीन यांनीं आणलेल्या आक्षेपांचें खंडण. ( पुणें. व. स. ब. मि. वि. )

१८ हिंदुस्थान श्रीमंत होत आहे कीं गरीब, आणि त्याच्या उन्नतीचे उपाय. ( अहमदनगर. व. स. ब. मि. विषय. )

१९ हिंदू मुसलमानांतील तंटे नाहींसे होण्यास उपाय. ( ठाणें व. सभेंत बक्षीस मिळालेला विषय. )

२० जलतरण किंवा पोहण्याची कला.

यांप्रमाणें दुसरे बहुत निबंध तयार आहेत ते, सवडीप्रमाणें प्रसिद्ध केले जातील.

केशव वामन पेठे.

गिरगांव, कांदेवाडी, शेंड्ये यांची चाळ, मुंबई.

# प्राक्कथन.

वा ६२९३०

निबंधमालेंतील लोकभ्रम हा विषय माझ्या वाचनांत आल्यापासून, आपल्या आचारांत भ्रम किंवा भोळेपणा अतिशय भरलेला आहे त्याचें विवेचन करावें असा हेतु होता, तो गेल्या वर्षीच्या येथील हेमंतोत्सवांत 'आमच्या भोळेपणाची कमाल' या विषयावर निबंध वाचून, सिद्धीस नेला. सदर्हू निबंध विद्वान लोकांस पसंत पडल्यामुळें, तो विस्तृत करून स्वतंत्र पुस्तक रूपानें प्रसिद्ध करावा असें वाटल्या वरून, प्रस्तुत त्याचा पूर्वार्ध प्रसिद्ध केला आहे. यांत धार्मिक व सामाजिक भोळेपणाच्या कित्येक गोष्टींचा विचार केला आहे. उत्तरार्धांत, पिणें, लग्न, शिक्षण, व्यायाम, उद्यम, गान, वाद्यवादन, परदेशगमन इत्यादि राहिलेल्या सामाजिक व राजकीय गोष्टींत, आमचा भोळेपणा कसा माजला आहे या विषयीं निरूपण करण्याचा विचार आहे. सदर्हू विषयप्रतिदनांत **आचार** या शब्दाचा फार व्यापक अर्थ घेतला आहे. **दार्विनच्या** उत्क्रांतिमताच्या धोरणावर व मनुस्मृतीच्या आधारावर प्रस्तुत विषयाची रचना केली आहे. ही गोष्ट 'खाणें' या प्रकरणावरून त्वरित लक्षांत येईल. मनु व दार्विन यांच्याच धोरणावर पुढील भाग लिहिण्याचा विचार आहे. मराठींत अशा प्रकारचा हा पहिलाच यत्न आहे. इंग्रजींत देखील या सारखा प्रयत्न झाला असेल असें वाटत नाहीं कारण, "जर्मनींतील प्रसिद्ध प्रोफे. इहेरिंग यानें धर्म संबंधीं आचारांचे मूळचे हेतु चांगल्या रीतीनें शोधून काढिले आहेत" असें मोक्षमूलर साहेब आपल्या धर्ममीमांसेंत ह्मणतात. दुसऱ्या कोणाचाही त्यांनीं उल्लेख केल्याचें आढळत नाहीं. आचारांचें पालन योग्य रीतीनें होण्यास ते आचार ईश्वरकृत आहेत, असा सामान्य लोकांचा ग्रह करण्यांत आल्यामुळें, आचारांची व धर्माची सारखीच योग्यता वाटूं लागली इतकेंच नव्हे तर, आचार हाच प्रथम धर्म असा समज झाला. कालमानाप्रमाणें आमच्या आचारांत हल्लीं पुष्कळ फेरफार होणें इष्ट आहे, परंतु ते ईश्वरकृत मानले गेल्यामुळें त्यांत बद्दल होणें सामान्य जनांस

इष्ट वाटत नाहीं. आचार हाच धर्म व धर्म हा परलोक प्राप्तीचें साधन असा ग्रह झाल्यामुळें, आचारपालनांत वस्तुतः ऐहिक सुखच आहे हा महात्म्यांचा बोध ठसावा तसा सामान्य जनांस ठसलेला दिसत नाहीं. 'शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्' हा उदात्त विचार फारच थोडे जाणतात, तो बहुतांनीं जाणावा व धर्माची इमारत आरोग्यरक्षणावरच बहुतांशीं आहे असें त्यांस समजावें अतएव हा अल्प यत्न केला आहे. अशा प्रकारचा यत्न करणारा मोठा बुद्धिमान, विद्वान व मार्मिक पाहिजे. हे गुण जरी मजमध्यें नाहींत तरी, अशा प्रकारचा यत्न आजपर्यंत मुळींच न झाल्यामुळें, तो होईपर्यंत माझ्या यत्नाचा अल्प तरी लाभ लोकांस होईल अशी आशा आहे. ब्राह्मण व त्यांची विद्या' या ग्रंथाच्या लेखका प्रमाणें माझा हा लेख पाहून कित्येकांस अशी शंका उत्पन्न होईल कीं या लेखावरून लेखक, सुधारक आहे, कीं जुन्या मताचा ह्मणावा ? याचें उत्तर इतकेंच देऊन ठेवितों कीं, या ग्रंथांत मीं दोन्हीं बाजूंचा नीट विचार करण्याचा यत्न केला आहे. मी आपली विचाररूपी नाव सुधारक किंवा असुधारक मतरूपी बंदरास लावावयाचा विचार केलेला नाहीं, तर सत्यरूपी बंदराकडे तिचा कल ठेविला आहे. प्रसंगवशात ती सुधारक मताकडे, कधीं तद्विरुद्ध दिशेकडे कलंडते आहे असें वाटेल, तेवढ्या वरून मी त्या मतांचा वादी आहें असें समजणें योग्य होणार नाहीं. सत्याकडेसत्र मी तिचा झोंक ठेविला आहे, ही गोष्ट संपूर्ण ग्रंथवाचनानें कळेल. हा माझा प्रयत्न पहाण्यास बहुप्रिय विष्णुशास्त्री चिपळोणकर व प्रि. गो. ग. आगरकर, प्रस्तुत यालोकीं असते तर, मी आपणास कृतकृत्य मानिलें असतें परंतु, तशी गोष्ट नाहीं याचा फार खेद वाटतो. आतां त्यांच्याच सारखे जे विद्वान लोक आहेत त्यांनीं या माझ्या कृतींचें परीक्षण करावें. त्यांच्या बऱ्यावाईट अभिप्राया प्रमाणें मला पुढले भाग लिहिण्यास उत्तेजन येणार आहे इतकी प्रार्थना करून हा अल्पलेख पुरा करितों.

**पुस्तक कर्ता.**

# आचार मीमांसा.

मानवी समाज सुखासमाधानानें राहण्यास महात्म्यांनीं त्यास कांहीं नियम लावून दिले. लोकांची त्या नियमांवर विशेष भक्ति बसावी व त्यांचें त्यांनीं योग्य आचरण करावें ह्मणून, ‘ हे नियम ईश्वरानें लावले आहेत ’ असा लोकांचा समज करण्यांत आला. ईश्वरी नियम–भंगानें पाप लागेल या भीतीनें हे नियम फारच कडकपणानें आचरणांत येऊं लागले. पुढें चमत्कार असा झाला कीं, नियम करण्याचा उद्देश बाजूस राहिला, इतकेंच नव्हे तर, केव्हां केव्हां त्या नियमाच्या उद्देशांस घातक असें वर्तन नियम पालनांत होऊं लागलें. आरंभीं नियम चांगल्याच हेतूनें केलेले होते. अमुक गोष्ट अमुक तऱ्हेनें करावी असा जो नियम लावून दिला तो विधि व, अमुक गोष्ट करूं नये ह्मणून जो नियम घालून दिला तो निषेध होय. कालांतरानें या विधिनिषेधांचा इतका बारीक कीस निघूं लागला कीं, अत्यंत क्षुल्लक गोष्टींस नसतें महत्व येऊन, महत्वाच्या गोष्टी एका बाजूस राहिल्या. इतकेंच नव्हे तर त्या, निरुपयोगी क्षुल्लक गोष्टींनीं झांकून गेल्यामुळें त्यांचा मागमूसही दिसेनासा झाला. एखाद्या कुशल माळ्यानें सुंदर सुवासिक व सुफलित वृक्षवल्लींचा मनोहर बाग बनवावा, पुढें त्या बागास माळ्याचा हातही लागूं नये ह्मणजे, कांहीं काळानें त्या बागांत जिकडे तिकडे रान उगवून त्या वेलींस तें वेढून टाकितें. वेलीही आपल्या नियुक्त वृक्षांस सोडून इतस्ततः भ्रमण करूं लागतात. झाडांचा पाला तळीं पडून कुजूं लागतो. उपयुक्त वनस्पतींची व वृक्षांची अवलाद उत्पन्न होण्यास, नवीन नवीन कवडीमोल घाणेरीं व कांटेरी झाडें आपाप उगवून प्रतिबंध करूं लागतात. असें होऊं लागलें ह्मणजे त्या बागाची हृदयंगमता नष्ट होऊन

जिकडे तिकडे अव्यवस्था दिसूं लागते. तसाच प्रकार महात्म्यांनीं समाजाच्या सुखासाठीं बनविलेल्या सुखदायक नियमाचा झाला आहे. मधून मधून शंकराचार्य, तुकाराम रामदासां सारख्या साधुवर्यांनीं नियमरूपी बागेंतील निरुपयोगी केरकचरा काढून टाकण्याचा थोडा बहुत यत्न केला. ‘ झाडुं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग ’ असें या साधूंनीं ब्रीद बाळगून जे यत्न केले त्यामुळें, या बागेची सामक्षा तरी राहिली आहे. नाहीं तर तीही नष्ट झाली असती. फलद्रूप जमिनींत उपयुक्त व निरुपयोगी वनस्पति सारख्याच जोरानें वाढतात तद्वत, या आमच्या अधात्म विचारांस फलद्रूप भूमींत भोळेपणाचें रानही उफाड्यानें वाढलें आहे. या घाणेऱ्या रानाचा जसजसा क्षय होत जाईल त्या त्या मानानें आमच्या वर्तन नियमरूपी बागास शोभा येऊन त्या पासून आह्मांस अधिकाधिक सुखांचा लाभ होत जाईल व जीवनार्थ कलहामध्यें आमचें राष्ट्र आज जें बहुतेक राष्ट्रांमागें आहे, तें सर्वांपुढें जाईल अशी उमेद बाळगण्यास कांहीं हर्कत नाहीं.

आतां भोळेपणा ह्मणजे काय तें पाहूं. सोनें पिंवळें असतें व पितळही पिंवळी असते. आजपर्यंत बहुत अज्ञान लोकांस लबाड लोकांनीं सोन्याच्या ऐवजीं पितळ देऊन फसविलें आहे. या फसले जाणाऱ्या लोकांस आपण भोळे ह्मणतों. कारण केवळ वर्णावर, धोरण ठेवल्यामुळें हे फसले. यांनीं ही पितळ आगींत घालून पाहिली असती, हिचें वजन पाहिलें असतें, हिजवर डाग पडतो कीं नाहीं तें पाहिलें असतें, तर त्यांस फसण्याचा प्रसंग येताना. भावार्थीपणानें जास्त चवकशी न केल्यामुळें हे फसले. आतां त्यांचें भोळेपणा काढावयाचें ह्मणजे सोनें व पितळ यांचे गुणधर्म त्यांस शिकवून खरी पारख करांवयास शिकवावयाचें. घोड्यावरील स्वारानें मोतद्दारास सांगितलें कीं ‘ कांहीं पडलें झडलें उचलून ठेव ’ मोतद्दारानें घोड्याच्या लेंड्या जमा करून ठेवल्या ! यांत त्याचें भोळेपण दिसून येतें. त्याचें भोळेपण काढावयाचें ह्मणजे

त्यास ग्राह्याग्राह्यतेची समजूत करून द्यावयाची. 'राजद्वारे स्मशानेच यःस्तिष्ठतिस बांधवः' या वाक्यार्थावर नजर देऊन, मसणवटींत आपणा बराबर आलेल्या गाढवास, एक दीड शहाणे आपले बंधु समजले ! हें भोळेपणामुळेंच. यांचें भोळेपण काढावयाचें ह्मणजे त्यांस सारासार विचार शिकवावयाचा. मागें सांगितल्या प्रमाणें नानाप्रकारचा भोळेपणा आमच्या आचार विचारांत अज्ञानामुळें शिरला आहे. आमच्या भोळेपणाच्या अनंत गोष्टी आहेत त्या सर्व सांगूं लागल्यास भारत प्राय ग्रंथ होईल. ह्मणून विस्तार भयास्तव कित्येक गोष्टींचा मात्र उल्लेख करून त्यांत, चौकसपणा करण्या विषयीं सर्वांस प्रार्थना करितों. 'ज्ञानावीण जीजी कळा । तीती जाणावी अवकळा' असें आहे. भोळेपणामुळें आमच्या द्रव्याचा, कालाचा, व बुद्धीचा अनाठायीं व्यर्थ खर्च होत आहे. ह्मणून आमचा भोळेपणा आह्मीं कसोटीस लावून तो नष्ट केला पाहिजे. आमच्या भोळेपणाच्या गोष्टी धार्मिक, सामाजिक व राजकीय या ३ प्रकरणांत विभागल्या आहेत. त्यांचा क्रमशः ऊहापोह करितों.

---

## भाग १ ला.

### धार्मिक भोळेपणा.

**धर्मसंबंधी भोळेपणा काढण्याचा जे यत्न करितात, त्यांस बहुधा नास्तिक ह्मणण्याचा प्रवात आहे.**

ईश्वरासंबंधीं भोळेपणाः—ईश्वराचें अस्तित्व आहे किंवा नाहीं याचें उद्घाटन करण्याचा हा प्रसंग नव्हे. ईश्वराची कल्पना सर्व राष्ट्रांत अधिक उण्या प्रमाणानें आहे. प्रचंड पर्वत, विशाल नद्या, ज्या प्रदेशांत असतात तेथल्या लोकांत ईश्वराची विशेष भीति वाटत असून स्वतःचा दुबळेपणा फार भासतो. या लोकांत भोळसर मनुष्यें फार आढळतात. 'हिंदुस्थानांत देवभोळेपणाचें विशेष प्राबल्य असण्याचें कारण, येथील प्रचंड विश्वाद्भुतें होत' असें सुधारणेचा इतिहास लिहि-

णारे बकल साहेब यांचें मत आहे. तें खरें असावेंसें वाटतें.- ईश्वरवादी लोकांत सगुणोपासक व निराकारवादी असे दोन भेद आहेत. पहिल्या प्रकारांत मूर्तिपूजकांचा समावेश होतो. आमचें अत्यंत पवित्र मानलेलें धर्म पुस्तक वेद होय. यावर लोकांची विशेष श्रद्धा बसावी ह्मणून ईश्वरानें वेद केले, असें मत लौकिकांत प्रचलित करण्यांत आलें. वेद-कालीन आचार विचार प्रस्तुत आचारांहून फार भिन्न आहेत. 'वेद मानवकृत आहेत' असें लोकांस पटलें, ह्मणजे आपणास अनुकूळ अशा सुधारणा करण्यास ठीक पडेल, असें कित्येक विद्वानांस वाटून त्या मताचें मंडण करण्यांत त्यांचे अव्याहत यत्न चालले आहेत. 'वेद ईश्वरकृत आहेत' असा लोकांचा दृढ निश्चय झाल्यास वेदज्ञान अधिक तत्परतेनें लोक करून घेतील, असा आर्य समाजादिकांचा विचार झाले ला आहे. या परस्पर विरुद्ध दोन मतांत पुष्कळ अर्थ आहे. या दोन मतांपैकीं कोणतें मत श्रेष्ठ, कोणतें मत कनिष्ट, याचा विचार करण्याचें हें स्थल नव्हे. परंतु वेद ग्रंथांत ज्या गोष्टींचा उल्लेख झालेला आहे, त्यांत भोळेपणा कसा वाढला आहे, याचा विचार अवश्य झाला पाहिजे. वेदांत अग्नि, वायु, वरुण इत्यादि दैवतें वर्णिलीं आहेत. ३३ देवांचीं वेदांत नांवें होतीं, त्यांचे आह्मी ३३ कोटी देव कल्पिले! मारुती, गण-पती, चंडी, दुर्गा यांसारखे प्रस्तुत कालचे देव वेदांत आढळत नाहींत. हल्लीं कितीतरी प्रकारच्या आकारांच्या देवतांस आह्मी भजतों आहों. व त्यांची संख्या तरी किती मोठी आहे! ३३ कोटी ही संख्या केवळ बोलण्यांत मात्र आहे, खरी संख्या याहून फारच मोठी आहे. हिंदुस्था-नांत साधारणतः २० कोटी लोक मूर्ति पूजक आहेत. प्रत्येकाच्या घरांतील देव्हाऱ्यांत सरासरी १०।१२ देव असतात त्या सर्वांची बेरीज करून त्यांत गांवांतील देवता, जलदेवता स्थल देवता, काष्ट देवता, पाषाण देवता यांची संख्या मिळविल्यास १०० कोट किंवा अब्जावर आमच्या देवांची संख्या जाईल! इतके देव असल्यामुळें प्रत्येक सगु-

णोपासकास २।२ चार चार देवांची भक्ति करितां येईल तरी, इतक्यानें लोकांची तृप्ति होत नाहीं. दगडास शेंदूर फांसून नवीन नवीन देव, लोक बनवीत आहेत.

**शेंदुरें माखिला धोंडा । पूजा करिती पोरें रांडा ।**

तुकाराम.

असा साधुसंत त्यांचा निषेध करीत आले आहेत तरी, देवांच्या वृद्धीची आमची हांव मोडत नाहीं. नारायणावर सर असे सत्यनारायण, गणपतीवर सर असे सत्य गणपती, दुर्गा—सत्य दुर्गा, अनंत—सत्य अनंत असे किती तरी नवे देव झपाट्यानें प्रचारांत येताहेत, तितक्यानें भागत नाहीं ह्मणून, अनार्य ह्मटले जाणारे जे यवन, त्यांच्या पिरांस व ताबुजांस आमचे लोक भजताहेत, त्यांपुढें उड्या मारताहेत, आंगास रंग फांसून त्यांपुढें वेडींविद्रीं सोंगें घेताहेत, तेवढ्यानें न भागल्यामुळें ख्रिस्ती लोकांच्या मोतमावलीस आमचे लोक भजूं लागले आहेत ! फार काय सांगावें, या मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरीं प्रसिद्ध युरोपियन लोकांचे जे पुतळे उभारले आहेत त्यांस, देवाप्रमाणे आमचे कित्येक लोक नवस करितात व ते पुतळे नवसास पावतात अशी त्यांची पक्की खातरी झालेली आहे! हे साकार भक्तांनो, देवाची कल्पना येण्याकरितां त्यांच्या मूर्ति केल्या आहेत. देवाच्या व मनुष्यांच्या मूर्ती कोणत्या यांचा भेद जाणा. मुसलमानांच्या पिरांस भजणें तुह्मांस योग्य नव्हे. तुमच्या धर्मात तुह्मांस पाहिजेत तितके देव आहेत, त्यांचीच मनोभावें सेवा करा ह्मणजे पुरे आहे. जें आपणास प्रिय तेंच देवास प्रिय अशी आमची भावना असल्यामुळें, आह्मांस जे उपचार सुखदायक वाटतात, तेच आह्मी देवास करितों. न्हावी आह्मास आरसा दाखवितो ह्मणून आह्मी देवास आरसा दाखवितों. आमच्या कित्येक बहादरांस दारू आवडते ह्मणून, त्यांच्या गणपतीच्या हातांत दारूची बाटली दिलेली आढळली आहे. स्नानानें आह्मांस हुशारी येते ह्मणून, आह्मीं देवास

स्नान घालितों, आपणाप्रमाणें त्यास गंध लावितों, आह्मांस फुलें आवडतात ह्मणून, त्याच्या डोक्यावर फुलांची रास घालितों. आमच्या लग्नांत दुःशकून होऊं नयेत ह्मणून, आह्मी फार खबरदारी घेतों, तशीच देवांच्या लग्नांतही घेतों. तुळशीशीं कृष्णाचें दरसाल आह्मीं लग्न लावितों. एक गृहस्थ देव्हाऱ्यांतील बाळकृष्णाची मूर्ती घेऊन तुळशी वृंदावनाकडे त्याचें लग्न लावण्यास चालला होता, इतक्यांत मांजर आडवें आल्यामुळें, त्यानें ती मूर्ती खालीं ठेऊन, दांडक्यानें माजराचें डोकें बडविलें, तेव्हां त्याचें समाधान झालें! मांजरूं आड आलें हा, देवाच्या लग्नास अपशकून झाला, असें त्यास वाटल्यामुळेंच त्यानें हें उष्टें काढलें! घरांतील देव्हाऱ्यांतल्या देवांची नित्य पूजा झाली पाहिजे असा आमचा ग्रह झालेला आहे. उत्सुकतेनें पूजा करणारे फार थोडे. ज्या घरांत बरेच मुलगे असतात त्यांस, पाळी पाळीनें ही पूजा करावी लागते. कित्येक ह्मातारीं आईबापें कामाच्या गर्दींत असल्यास, किंवा कंटाळा आला असतां, आपल्या चिरंजिवांस आर्जव करितात कीं, बाळ्या आजचा दिवस तेवढी पूजा कर! पोराच्या मनांतून पूजा करावयाची नसते, ह्मणून रागा रागानें ताह्मनांत देव बुडवून, त्यांस गंध लावून त्यांवर तीं फुलें रचून ठेवितो. व नैवेद्यास आण ह्मणून आरोळी ठोकतो. देवपूजा ही कांहीं वेठ वारावयाची नाहीं. प्रत्येकास ईश्वरध्यान करणें जरूर आहे. या गोष्टी वरच्यासारख्या कुटुंबांस विदित नाहींत. देव्हाऱ्यांतील देवांस पाण्यांत बुचकळून काढून गंध लावून फुलें घातलीं, व नैवेद्य दाखविला ह्मणजे आपलें कर्तव्य आटपलें व, हें आपण पुण्य कर्मच केलें असें मानणारे लोक भोळे नव्हत तर कोण?

आपणास ज्या चांगल्या गोष्टी आवडतात त्या देवास आवडत असतील असें मानण्यांत भयंकरपणा नाहीं परंतु, ज्या निंद्य गोष्टी आपणास आवडतात त्या देवासही आवडतात असें समजणें, फार मूर्खपणानें आहे. देवाच्या हातांत दारूची बाटली देणें, त्यास मुरळ्या वाहणें,

या गोष्टी अत्यंत निंद्य होत. या गोष्टींनीं देवाचा अपमान केल्या प्रमाणें होतें ह्मणून, अशा गोष्टी करूं नयेत. देवास वाहिलेल्या मुरळ्या देवाच्या नांवावर व्यभिचार करितात व समाजांतील नीति बिघडवितात ही तर फारच लाजीरवाणी गोष्ट आहे. प्रत्येक आस्तिक मनुष्यानें ईश्वराची भक्तिभावानें निरलस सेवा केली पाहिजे. वेठीची देवपूजा करण्यापेक्षां ती न करणें बरें. वेठीची पूजा करण्यांत दोन तोटे आहेत. पहिला तोटा हा कीं, या कृत्यानें ईश्वराची थट्टा होते. दुसरा तोटा हा कीं असल्या पूजेंत घातलेला वेळ व्यर्थ घालविल्या प्रमाणें होतें. ह्मणून प्रत्येक भाविकानें, भक्तिपुरःसर देवतार्चन करावें. तसें करणें नसेल तर, वेठपूजा करण्याच्या वेळांत कांहीं उपयुक्त उद्योग करावा. तरच कांहीं सार्थक होईल.

आह्मां लोकांत वर्षांतून एकदां महालक्ष्मी पूजण्याचा बायकांत प्रघात आहे. बायका रात्रीं घागरी घेऊन फुंकीत असतात. फुंकता फुंकतां एखाद्या बाईच्या आंगांत वारें येतें. महालक्ष्मीनें तिच्या आंगांत संचार केला असें समजून, इतर बायका तिला नानाप्रकारचे प्रश्न करितात. या वारें येणाऱ्या बायांपैकीं बऱ्याच बाया मोठ्या ढोंगी असतात. माझ्या लहानपणची एक गोष्ट मला आठवते ती अशीः महालक्ष्मीचें वारें आलेली एक बाई भरांत आली होती, व विचारलेल्या प्रश्नांचीं ती मोठ्या दिमाखानें उत्तरें देत होती. इतक्यांत मीही आपल्या आंगांत अवसर आल्याचें लोकांस भासावें ह्मणून, खूब मारे हिकडून तिकडे उड्या मारूं लागलों. व मोठ्या जोरानें घागर फुंकूं लागलों. माझ्या घागरीच्या तडाख्यांत कित्येक बायकांच्या बांगड्या वाढवल्या, व जिकडे तिकडे कल्लोळ झाला! तेव्हां मजविषयीं त्या वारें आलेल्या बाईस लोकांनीं विचारतां 'हा शंकराचा अवसर आहे' असें तिनें उत्तर दिलें! मी लागलेंच साफ सांगितलें कीं, माझ्या आंगांत शंकराचा नव्हे परंतु, विनोदाचा अवसर भरला आहे! तेव्हां लोकांची हसतां

हसतां गाळण उडाली, भोळ्या व अज्ञान लोकांस फसविण्यास थोडेसें ढोंग पुरे आहे. मी खरी गोष्ट सांगितली नसती तर, मला लोक प्रश्न विचारून पुरेपुरेसें करिते !

साकार भक्ति चांगली कीं निराकार भक्ति चांगली, यांचा वाद मी करीत नाहीं. परंतु साकार भक्तींत किती भोळेपणा शिरला आहे हें, आतां पर्यंत दाखविलें. गाई बैलां सारख्या उपयुक्त पशूंची आह्मीं प्रसंग विशेषीं पूजा करितों, इतकेंच नव्हे तर, कित्येक उपयुक्त वनस्पतींत आह्मीं ईश्वरत्व असल्याचें कल्पिलें आहे. वड, पिंपळ, उंबर, तुळस हे आमचे पवित्र वृक्ष होत. इतर वृक्षांपेक्षां यांस विशेष पवित्र मानण्यास कांहीं कारणें आहेत. ज्या वृक्षांपासून सोमरसासारखीं मादक पेयें प्राचीन आर्य काढीत त्यांस ते पवित्र समजत ( डा. कुंटे कृत अष्टांग हृदय पुस्तक पहा ) आंबा नारळ खाण्यास चांगले असल्यामुळें ते पवित्र मानण्यांत आले. तुळशीच्या आंगीं हवा शुद्ध करण्याचा गुण आहे, ही गोष्ट हल्लीं सप्रमाण सिद्ध झाली आहे.

"तुळस घराच्या आवारांत लावल्यानें आरोग्य वाढतें. ज्या ठिकाणीं या क्षुपाच्या पंक्ति लावाव्या, त्या ठिकाणीं ओझोन वायु उत्पन्न होऊन आसमंतांतील वायु शुद्ध होतो."

भारत वर्षीय औषधी संग्रह
डाक्तर पांडुरंग गोपाळकृत.

यावरून तुळशीच्या आंगीं हवा शुद्धतेचा गुण आहे हें तर ठरलें व ही गोष्ट अनुभवावरून प्राचीन आर्यांस कळलेली असावी. ह्मणून तिला देवत्व आलें असावें. तुळस पूर्वीं पुढील दारीं असे परंतु, यवन लोक ती भ्रष्ट करूं लागल्या पासून ती मागील दारीं गेली. तुळस भ्रष्ट करणाऱ्या यवनाची, एका हिंदूनें खोड मोडल्याची गोष्ट बहुतांस माहीत असेलच. 'तुळस तुह्मी देव मानता, परंतु मी तर ती गलिच्छ भागावर चुरडून टाकतों पण, मला कांहीं तो तुमचा देव शिक्षा करी

नाहीं हें कसें ? असें एका यवनानें हिंदूस विचारिलें. हिंदु ह्मणाला साहेब, अशी गोष्ट कधीं होणार नाहीं. तुह्मांस कोणी फसवीत असेल. आमची खरी तुळस तुह्मी ह्मणता त्या भागावर चुरडीत असाल, तर ती आपला पराक्रम दाखविल्या शिवाय कदापि राहणार नाहीं. यवन ह्मणाला असें ह्मणता तर,'आणा तुमची खरी तुळस कोठें आहे ती.' हिंदूनें खाजकुयली पुढें आणून दिली, ती यवनानें गलिच्छ भागास लावतांच, तेथें कंड सुटून दहा होऊं लागला. तेव्हां हिंदु ह्मणाला. 'साहेब मी ह्मटल्या गोष्टीची प्रचीती आली कीं नाहीं तें पहा' ही गोष्ट खरी असो वा खोटी असो परंतु तुळशीवृंदावन यवन भयानें मागील दारीं गेलें ही गोष्ट जुनी खोडें अद्यापही सांगणारीं आढळतात. साहेब लोकांच्या दारापुढें जशी बाग असते, तशींच तुळशीचीं वनें हवा शुध्यर्थ प्राचीन आर्य घरापुढें लावीत असावे ही गोष्ट तुळशीवृंदावन या शब्दावरून सिद्ध होण्यासारखी आहे. हवा शुद्धीच्या गुणामुळें च तिला देवत्व आलें, तुळशी महात्म्य ह्मणून एक पुराण रचलें गेलें आहे. "जयदेव जयदेव जय माय तुळशी । तूझा अपार महिमा न वर्णवे मजशीं । जयदेव जयदेव" अशी तिची आरती होऊं लागली. तुळशी-वनें हवा शुद्ध करीत असतां, तिचा महिमा मोठा ह्मणणें कांहीं गैर नाहीं. परंतु हा हेतु पुढें बाजूस राहिला. वनाच्या जागीं बारीकशी तुळस, वृंदावनांत लोक लावून तिची पूजा करूं लागले. मुंबईसारख्या शहरीं भाडोत्री जाग्यांत राहणारे कर्मठ, कुंडींत झुरमुरु करणारी तुळस लावून ठेवितात, तिचीं पानें किडीनें बहुतेक खाल्लेलीं असतात. अर्धेंमुर्धें चांचवलेलें एखाद दुसरें पान तुळशीच्या दांड्यावर असतें. मूळचा हेतु सिद्धीस नेण्याचें या दांड्यांत कांहींच त्राण नसतें. तरी, त्यावर गंधाक्षता टाकून त्यास धूप दीप नैवेद्य दाखविला ह्मणजे आपण धर्म कृत्य केलें असें मानणारीं शेंकडों स्त्रीपुरुषें आह्मांत आहेत ! पहा तुळशी वनाचा प्रथम हेतु काय होता व त्याचें पुढें काय झालें. भाविकांनी

तुह्मांस तुळशीची पूजा कर्तव्य असेल तर खुशाल करा परंतु जितक्या जास्त व घोंसदार तुळशी लाववतील तितक्या लावा. ह्मणजे त्यांत मूळचा उद्देश तुह्मी सिद्धीस नेत अहा असें होईल.

## दुष्ट गुणी देव.

आतांपर्यंत वर्णिलेले देव सुष्ट गुणी होते. आतां दुष्ट गुणाच्या देवांचें वर्णन करितों. अत्यंत सुष्ट गुणास जसें आह्मीं देवत्व दिलें तसें अत्यंत दुष्ट गुणासही तें दिलें आहे. समुद्रांत एक फार घात करणारा मासा आहे त्यास आह्मी देव मासा ह्मणतों. साप मनुष्यांस डसून त्यांचा जीव घेतो, त्या सापाची नागपंचमीच्या दिवशीं आह्मीं पूजा करितों. जरीमरी, गोंवर, इत्यादि रोगांस आह्मीं यांच्या नाशकर्तृत्वा-मुळें फार भजतों. देवींनीं मनुष्यांचा फार संहार होतो. या रोगास देवी हें जें आह्मीं नांव दिलें आहे यावरून आमची देवाची कल्पना व्यक्त होते. खवीस चेडा मार्का इत्यादि भूतें जीं आह्मांस फार दुःख देतात असें आह्मीं मानतों, त्या पिशाच्यांस आह्मी देव समजतों. खेडेगांवांत नदीकिनारीं एखाद्या दगडास शेंदूर किंवा नुस्तें गंधच कां लावलेलें आह्मीं पाहतों तेव्हां, तो देव आहे अशी सहज आमची म-नोदेवता धांवते ! कोंकणांत अशा ग्रामदेवता व खिडुक मिडुक देवता लक्षावधि आहेत. यांच्या देवळांत बिचाऱ्या शेतकरी कुणब्यांच्या पैशाचा, काळाचा, व अब्रूचा संहार होत असतो. हे देव ह्मणजे को-णीतरी प्रसिद्ध पुरुष मरून त्याचें झालेलें पिशाच होय. खेडेगांवच्या अज्ञान लोकांची सर्व मदार कायती या कोंबडखाऊ देवांवर ! खेड्या पाड्यांत डाक्तर किंवा वैद्य मिळणें कठीण. जरा कांहीं दुखूं खुपूं ला-गलें, कीं चालले लोक या देवाचा विचार घ्यावयास. या देवांस बो-लविण्याची तऱ्हा फार मासलेवाईक आहे. पोपयाचे किंवा अशोकाचे वगैरे कळे आणून, उजव्या बाजूस दोन व डाव्या बाजूस दोन या प्रमाणें लावितात. मग आजारी मनुष्य कौल लावणारास कळवितो

कीं अमक्या गृहस्थाचें मजवर भूत पडलें आहे, मग कौल लावणारा देवास मनसतो.—

" जे आय खेम, मानाय, पाटकरीण, रोळोबा, खेत्रुपाळ, सातही देवांनो " ( बाकीचे लोक ह्मणतात ' होय बाय माजे ' ) या अमक्याचें यावर भूत पडलें ह्मणून हा तापकरी पडला असा उजवा सोड. कांहीं वेळ वाट पाहून उजवी कडला कळा पडला तर भूत खरोखरीच पडलें असें समजण्यांत येतें. जर मागितलेला कळा न पडतां दुसराच पडला तर कौल लावणारा ह्मणतो कां बाय माजे ! मागें कां जातेस ? तुला कोणी जाप लावला आहे काय ? ( जाप लावणें ह्मणजे देवास नारळ कोंबडें देऊन सांगावयाचें कीं, माझें भूतघालणें तुला कोणी विचारावयास आल्यास तूं कबूल होऊं नको. ) जर असें असेल तर डावा सोड. अशा प्रसंगीं डावा कळा पडला तर आरोपींवर आरोप शाबीद होऊन त्यापासून गुन्हेगारी भरून घेण्यांत येते. प्रत्येक गोष्ट देवास कौल लावूनच विचारण्यांत येते. कळे पडण्यास उशीर झाला तर ' बोल चाटकिन् ' ह्मणून देवास दपडशहा देण्यांत येत असतो. कधीं कधीं एखाद्या मनुष्याच्या आंगांत अवसर येतो. तो आपली शेंडी पिस्कारून हूं: हूं: हूं: करीत मुंडी हालवूं लागतो. प्रथम हें त्याचें हूं हूं हलक्या सुराचें असतें परंतु पुढें पुढें तें मोठें मोठें होत जातें. मग तो हिकडून तिकडे नाचूं उडूं लागतो व विचारल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा आव आणतो. तीं उत्तरें बहुधा संदिग्ध असतात. परंतु भोळे लोकांस मतलबी लोक त्यांचा अर्थ स्पष्ट करून सांगतात. हें जें आंगांत वारें येतें त्यास देव आंगांत आला असें ह्मणतात ! गरीब बिचारे अज्ञान लोक ! सर्व शक्तिमान परमेश्वराची, सुशिक्षित लोकांची कल्पना यांच्या गांवींही नाहीं. या कोंबड खाऊ देवांस ते पिरतिमी ( पृथ्वी ) उत्पन्न करणारे समजतात. लुच्चे लोक या भोळ्या लोकांस नानातऱ्हांनीं नाडतात. त्यांची एखादी वस्तु उपटाव-

याची असल्यास त्यांवर भूत घातल्याचा आरोप ठेवतात व कसें तरी त्यांस पेंचांत अडकवून आपलें कार्य साधतात. कळे लावण्यांत तरी किती लबाडी असते ! जो कळा पडावा असें कौल लावणारा इच्छित असतो त्यास, दुसऱ्या कळसापेक्षां पाणी कमी लावितो. परंतु या गोष्टी त्या बिचाऱ्या भोळ्या लोकांस कशा कळाव्या. या देवांच्या प्रत्येक देवळांत दररोज ४।५ नारळ फुटतात व १।२ कोंबडीं देवाच्या नांवानें देवळकरी लोक गडप करितात. कित्येक ब्राह्मणेतर, कुरकुर करितात कीं धूर्त ब्राह्मण आह्मांस ठकवीत आहेत त्यांनीं, या ग्राम देवतांच्या देवळांत जाऊन पहावें ह्मणजे केवळ शूद्रच नव्हत परंतु अत्यंत नीच मानलेले महार लोक ब्राह्मणासही भुतें घालण्याची भीति दाखवीत असतात. बिचारे गांवढळ, भोळेपणानें त्यांच्या दबकावणीस भितात व सहसा त्यांचे वाटेस जात नाहींत. गुरांवर गोचेडी ह्मार भुताखेरीज होणें नाहीं असा सर्वांचा समज आहे ! भुतें उमगण्यांत व त्यांची खंडणूक करण्यांत बिचाऱ्या उद्योगी कुळंब्याचे महिनेच्या महिने मोडतात. सुधारकांनीं खेडे गांवांत जाऊन या भोळेपणाच्या गोष्टी लोकांच्या डोक्यांतून काढण्याचा यत्न केला पाहिजे.

**वाजे पाऊल आपलें । ह्मणे मागें कोण आलें ॥**

रामदास

या दासोक्तीचा उद्देश, साधण्यास ह्मणजे लोकांचा संशय काढण्यास झटणें हें मंगल कृत्य होय.

## क्लिष्ट देवता.

आमची देवाविषयींची तिसरी क्लिष्ट कल्पना आहे. यांत जननेंद्रियांमध्यें आह्मी ईश्वर पाहतों व, ती आमची धर्माची बाब आह्मीं समजतों. फाल्गुन महिन्यांत होलिकापूजन आह्मी करितों त्याचा, स्त्री जननेंद्रियाशीं संबंध आहे. नानाप्रकारचे अचकट विचकट शब्द उच्चारून फाका घालणें, व चोरी करणें या गोष्टींस या सणांत मोक-

ळीक दिलेली आहे. शक्ति उपासक लोकांनीं शाक्तपंथ काढिला आहे. त्यासारखा विचकट व घाणेरडा पंथ दुसरा कोणताच नाहीं. पण तोही धर्माच्या नांवाखालीं मोडला जात आहे. व त्या पंथांत गेल्यावर केलेल्या भ्रष्टाचरणास दोष नाहीं, असा कित्येकांचा समज झालेला आहे. शिवलिंगाचें वर्णन वेदांत नाहीं. बैल हें त्याचें वाहन आहे. बैल धान्य पिकवितो व, पुरुष जननेंद्रिय प्रजावृद्धि करितें, यास्तव शिवलिंग व बैल या उत्पादकांस ईश्वरत्व लोकांनीं दिलें यांत आश्चर्य नाहीं. देवळांतील शिवलिंगापेक्षां मृतिकेचें तात्कालिक केलेलें शिवलिंग पुजेस अधिक प्रशस्त समजतात. कृत्रिम मूर्तीपेक्षां स्वयंभु देवांत देवपणा अधिक, अशी लोकांची कल्पना आहे. स्वयंभू देवाविषयीं एका लुच्चा मनुष्यानें लढपलेली हिकमत अशी कीं, त्यानें एका खडकास भोंक होतें त्यांत, एक वरवंट्याच्या आकाराचा धोंडा बसविला व, त्याखालीं हरभरे घालून त्यांवर बरेंच पाणी ओतलें. पुढें लोकांस सांगूं लागला कीं पहा, हा देव स्वयंभू असून वरवर येत चालला आहे ! लोकांस हें खरें वाटून त्यांनीं त्या देवापुढें नारळ, सुपाऱ्या, पैसे व फुलें यांचा ढीग घातला. पुढें ही गोष्ट एका धूर्त मनुष्यास कळतांच, त्यानें तें शिवलिंग उपटून पाहिलें तों, त्याखालीं हरभरे फुगलेले त्याच्या दृष्टीस पडले ! हा प्रकार त्यानें लोकांस कळविला तेव्हां आपल्या भोळेपणाचें व त्या लुच्या मनुष्याच्या धूर्ततेचें जो तो आश्चर्य करूं लागला ! याप्रमाणें आमच्या लोकांचा भोळेपणा चाणाक्ष लुच्या मनुष्याच्या फार हिताचा आहे. शाक्त पंथांतील व फाल्गुनोत्सवांतील गलिच्छपणा काढण्याकडे विद्वानांनीं फार लक्ष पोंचविलें पाहिजे. शाक्त पंथांतील निंद्य प्रकार नाहींसा केल्यास त्यास कास्मापालिटन क्लबासारखें उज्वल रूप येईल. फाल्गुनोत्सवांतील बीभत्स प्रकार मोडून त्यांत मर्दुमकीचे खेळांचा अंतर्भाव केल्यास फार बहार होईल !

## भ्रष्ट देवता

आमच्या देव भोळेपणाचीं मुळें किती खोल गेलीं आहेत, तीं पुढील गोष्टींवरून स्पष्ट समजतील. कोणत्याही गुणाचा अतिशय पणा आह्मां-स दिसतो तेथें देव असावा अशी आमची कल्पना धांवते. नरक व मूत्र या अत्यंत दुर्गंध उत्पन्न करणाऱ्या वस्तु असल्यामुळें त्यांत, ईश्वराचें अस्तित्व आह्मीं भोळेपणानें कल्पिलें आहे. श्रीकृष्णानें नरकासूर मारला ह्मणून नरक चतुर्दशीचे दिवशीं नरकाचें आलय जें संडास त्यांत दिवा लावून ठेवण्याचा आह्मांत प्रघात आहे. नरकासूर व नरक यांत कसा संबंध जोडून दिला आहे पहा ! परंतु यांत आमचा भोळे पणा दिसतो तो कांहींच नव्हे. या मुंबई शहरांत रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या लघुशंकेच्या सोईसाठीं, ठिकठिकाणीं मुतऱ्या बांधलेल्या आहेत. एका ठिकाणीं फारच मोठें मूत्रालय बांधलें आहे. जं येतो तो त्या ठिकाणीं मूत्रोत्सर्ग करितो. या ठिकाणीं नेहमीं अत्यंत दुर्गंधी सुटलेली असते. याच ठिकाणीं दुर्गंधीचा अतिशयपणा दिसू आल्यामुळें भोळे लोकांनीं येथें मूत्रादेवीची स्थापना केली आहे. य देवीची यात्रा भरते व ही देवी नवसासही पावते असा भोळ्या लोकांच समज आहे. सर्वत्र ईश्वर ज्यांस दिसतो त्यांस तो नरक मूत्रांत दिसल तर त्यांत आश्चर्य काय, असें कित्येक ह्मणतील परंतु, मूत्रा देवी भक्त आपलें घरदार सोडून, जे या मूत्रालयाशीं येतात ते, मूत्रांत विशे प्रकारचा देव आहे असें मानितात ह्मणूनच. तेव्हां ईश्वर विषयक आमचें भोळेपण किती आहे तें पहा. वैदिक काळच्या लोकांस सूर्य वारे, पर्जन्य आकाश इत्यादि विश्वाद्भुतांत ईश्वर दिसे. पुढें अद्भुतांतू देव निघून तो गिऱ्हा, लांवसट, खवीस इत्यादि भूतांत आला. त्यानंतर किंवा त्याच वेळेच्या सुमारास तो जननेंद्रियांत नंतर नरक व मू असल्या गलिच्छ वस्तूंतही तो आहे असें मानण्याकडे आमची प्रवृत्ति होऊं लागली ! येथें आमच्या भोळेपणाची कमाल झाली. मंगलम

ईश्वराची हगामुतांत कल्पना करणें, या आमच्या मूर्खपणास सीमा आहे काय ? विद्वानांनीं हे गलिच्छ प्रकार आमच्या लोकांतून जितके लौकर काढवतील तितके काढण्यास झटलें पाहिजे.

## संध्या.

अद्भुतांत ईश्वराची कल्पना असतांच, प्रस्तुत संध्या ह्मणून जो विधि आह्मी करतों त्याची उत्पत्ती असावी. संध्येचा खरा अर्थ किंवा उद्देश जाणणारे लोक आहेत कीं नाहींत याचीच शंका आहे. दिवस व रात्र यांचा संधि, सूर्योदयीं व सूर्यास्तीं होत असतो. त्या वेळीं सर्व भूमंडळाचें रूप कांहीं विशेष प्रकारचें होतें. आकाशांत रक्तिमा आलेली असते व जिकडे तिकडे शांतता भासते. संध्येचें रूपवर्णन केलेलें आहे तें असें ' रक्तवर्णा, रक्तवस्त्रा, हंसमाल्यानुलेपना इ० ' नदीच्या तिरावर बसून आकाशांतल्या आरक्ततेकडें पाहून, संध्यावंदन करणारे पूर्वींचे ऋषी कोणीकडे व, दिवसास १० वाजतां व रात्रीं बहुधा तितक्याच वेळीं नोकरीवर जाण्यास आतुर झालेले, किंवा नोकरीवरून दमून भागून येऊन, मुंबई सारख्या दाट वस्तीच्या घाणेरड्या* जाग्यांत, अस्वस्थ मनानें वाडवडील संध्या स्वरूपाचा जो मंत्र ह्मणत आले, तो भलत्याच वेळीं ह्मणून संध्या वंदन करणारे आमचे अर्वाचीन ब्राह्मण कोणीकडे ! कशास कांहीं मेळ नाहीं. सृष्टीच्या विलक्षण स्वरूप दर्शनांत, अद्भुत रसांत ईश्वराचें ध्यान करणें, हा हेतु हल्लीं कोणी कडल्या कोणीकडेस उलथून पडला आहे. प्राणायाम मोकळ्या हवेंत झाला पाहिजे तो, प्रस्तुत गटारांतील दुर्गंधयुक्त हवेनें केला जात आहे ! पूर्वीं पारशी व आह्मी एकत्र होतों तेव्हां पासून संध्या प्रचारांत असा-

---

* पूर्वेस संडास, पश्चिमेस विटाळशांची न्हाणी, उत्तरेस उघडीं गटारें, दक्षिणेस उकिरडा सांठविण्याची पेटी, सभोंवार लहान मुलांनीं मलमूत्रोत्सर्ग केल्यामुळें सतत सुटणारी दुर्गंधी, जमिनी ओलसर, भिंतीवर ढेंकूण, पिसवा, कडीपाटावर चिलटें, घरांत ओल्या फाट्यांचा धूर, रात्रौ राकेलच्या दिव्याची व विडीची घाण अशा प्रकारच्या जाग्यांत मुंबईत गरीब कुटुंबें आयुष्याचे दिवस घालवीत असल्याचें आढळतें.

वीसें वाटतें. हल्लीं पारशी बऱ्याच अंशानें खरी संध्या करितात. सूर्योदयीं व सूर्यास्तीं ते समुद्र किनारीं जाऊन सृष्टीचें भव्यरूप पाहून भक्तिरसाचा थोडा तरी अंश साध्य करून घेतात. आह्मी मूळ उद्देशांपासून पुष्कळच झुकलों आहोंत. संध्येंत पाणी हुंगण्याचा एक प्रकार आहे त्याची मूळ पीठिका अशी आहे कीं, आह्मी आर्यांनीं बाहेरून येऊन येथल्या कृष्णवर्ग लोकांस जिंकून त्यांचे प्रांत काबीज करीत गेलों. संध्येचा प्रकार पूर्वींपासून आह्मांत होताच. एखादा ऋषि नदीवर संध्या करूं लागला ह्मणजे, प्रथम त्यास पाणी हुंगून पहावें लागे. कारण त्या पाण्यांत, आमचे अनार्य ह्मटलेले शत्रू घाणेरडे पदार्थ घालून ठेवीत! पूर्वीं पाणी हुंगून पाहणें योग्य होतें. हल्लीं तें हुंगण्याची काय गरज आहे. तानसा तलावाचें, उच्छ्वासांत शुद्ध करून आणलेलें पाणी आह्मी स्वयंपाकास व पिण्यास निःशंक घेतों, मग २ आचमनें संध्येंत घेण्यास त्याची दिक्कत कां वाटावी! परंतु हा विचार करतो आहे कोण! 'पीछेसी आई' या न्यायानें आमचे सर्व व्यवहार चालले आहेत व जुने विधी जसेच्या तसेच आचरण्यांत पुण्यप्राप्ति आहे असें, आमच्या भोळ्या मनानें घेतलें आहे. संध्येंत आचमन विधि आहे त्याचा हेतु सांगणारे कितीसे सांपडतील. कर्मठ लोकांस यांचीं उत्तरें देतां येणार नाहींत. हा आरोग्य शास्त्राचा विषय आहे. अमेरिकेंतील प्रख्यात दाक्तर हल्लीं असें प्रतिपादूं लागले आहेत कीं, निजून उठतांच गरम चहा घेण्याची कित्येकांस सवय असते, ती फार वाईट आहे. रात्रीस निद्रावस्थेंत जे शारीरिक व्यापार चालले असतात त्यानें शरीराचे उष्णतामानांत फरक झालेला असतो ह्मणून, निजून उठतांच थोडेंसें थंड पाणी प्यावें 'The book of Health' या पुस्तकांत ही गोष्ट सांगितली आहे. आह्मांत उषःपान करण्याचा जो प्रकार आहे त्याचा, वरील गोष्टीशीं संबंध दिसतो. स्नाना पूर्वी आचमन करण्यास गुरु चरित्रांत सांगितलें आहे याचा व उषःपानाचा उद्देश एकच आहे.

मग उठावें शयन स्थानीं । आचमन करोनि दोनी
लघुशंकेशीं जाऊनी । शौचाचमन करावें

गुरुचरित्र अ. ३६ ओवी ११९

कित्येक आधुनिक अल्लड सुधारकांस आमचें वरील विधान चमत्कारिक वाटेल. ते ह्मणतील कीं १९ व्या शतकाच्या अखेरीस, अमेरिकेतील डाक्तरांस, आरोग्यरक्षणाची जी गोष्ट कळली ती ३।४ हजारांहून अधिक वर्षा पूर्वीच्या ऋषींस कळणें अशक्य. परंतु त्यांनीं हें खूब समजावें कीं ब्रह्मचर्य व्रत पालन वगैरे गोष्टी, चरक, सुश्रुत वाग्भटांसारख्या विशाल कल्पक बुद्धीच्या वैद्यांनीं धर्मांत गोंवल्या, त्या केवळ अनुभविक ज्ञानाच्या बळावर होत ह्मणून, प्रातःकाळीं जल प्राशनाचे सुष्ट परिणाम त्यांस कळले नव्हते असें मानणें, एका प्रकारचें भोळेपणच होय. आतां या आचमनांत इतकीच सुधारणा झाली पाहिजे कीं प्रकृति, हवा, व वय या मानानें अधिक उणीं आचमनें घेण्याचा प्रघात पडावा. सूर्य दृग्गोचर असतां त्याकडे पहात गायत्री* मंत्र जपावयाचा आहे कारण ती त्याची स्तुति आहे आतां सूर्य लोकांतरास गेल्यावर, आकाशास कालिमा आली असतां रक्तवर्णा इत्यादि संध्येचें ध्यान करणें ह्मणजे वेडेपणानें कांहीं तरी करणें होय मनुनें सांगितलेला संध्यावंदनाचा काळः—

पूर्वां संध्यां जपंस्तिष्ठेत्सावित्रीमार्क दर्शनात्
पश्चिमां तु समासीनः सम्यगृक्षविभावनात्

अ. २ श्लो. १०१

**अर्थः**—प्रातःकाळच्या संध्येच्याठायीं सूर्यदर्शन होईपर्यंत गायत्रीचा जप करीत होत्साता उभें रहावें, आणि सायंकाळीं गायत्रीचा जप करीत होत्साता नक्षत्र दर्शन पर्यंत बसावें.

---

* हा मंत्र गायत्री नांवाच्या वृत्तांत आहे. ह्मणून ती गाईची स्तुती आहे, असें कित्येकांस वाटतें. हें भोळेपण होय. हरिणी वृत्तांत राजाची स्तुति केली असतां ती हरिणीचीच स्तुति असें मानण्या सारखें हें आहे.

संध्येंत तंत्रांतील काहीं प्रकार शिरले आहेत त्यांचा धर्माशीं वस्तुतः संबंध नाहीं 'अस्त्राय फट्' हा मंत्र ह्मणून टाळी वाजविण्याचा प्रकार होतो. मंत्र ह्मणून टाळी वाजविली असतां, तें अस्त्र आपल्या शत्रूंस मारील असें प्राचीन भोळ्या ऋषींस वाटे. तो प्रकार जशाचा तसा संध्येंत राहिला आहे. अलीकडे तर या मंत्राची फारच दुर्दशा उडाली आहे. न्हावी पलाटण्यावर वस्तरा फट्फट् करून विधवांचे केश काढितो ह्मणून, अस्त्रायफट् शब्दानें विधवा असा अर्थ ध्वनित होऊं लागला आहे!

संध्येचा खरा उद्देश व प्रस्तुतकालीं तींतील ग्राह्याग्राह्यतेचा कोणता भाग आहे व त्यांत फेरफार काय केले पाहिजेत हें, आपल्या रसाळ वाणीनें प्रोफेसर जिनसीवाल्यांसारखे खरे विद्वान ब्राह्मण, लोकांस सांगू लागतील तो खरोखर सुदिन समजला पाहिजे.

## मंत्र सामर्थ्य.

वैदिककाळीं भाविक ऋषींनीं देवास वेळोवेळीं हृदयद्रावक प्रार्थना केल्या, त्यांचे अर्थ पुढील काळच्या भटजींस कळेनातसे झाले, परंतु वेद ईश्वरकृत आहेत ही त्यांची कल्पना असल्यामुळें प्रत्येक कृत्यास वेदाचा आधार असण्याची त्यांस जरूर वाटूं लागली. वेद भाषेचा अर्थ तर त्यांस कळतच नव्हता. परंतु वेद ऋचेंतील समान भासणारे शब्द ते भोळेपणानें भलत्याच कृत्याचे वाचक समजून त्या शब्दानें युक्त ऋचा ते, त्या त्या कार्यास लावूं लागले. यामुळें काय चमत्कार झाला आहे पहा

( अ ) सपिंडी करणांतील मंत्र.

मधु नक्त मुतोषसो मधुमत्पार्थिवं रजः ।
मधु द्यौरस्तु नः पिता ॥ ७ ॥
मधु मान्नो वनस्पतिर्मधुमाँ अस्तु सूर्यः ।
माध्वी र्गावो भवन्तु नः ॥ ८ ॥

अर्थः—"आह्मा करितां रात्र मधुर होवो, आणि उषा, पृथ्वी

अंतरिक्ष, पितादु हीं मधुर होवोत. आह्मा करितां वृक्ष मधुर होवो सूर्य मधुर होवो, गाई मधुर होवोत." अ० १ अ० ६ सू० ९० मं० ७, ८,

**टीकाः**—हे मंत्र अंत्येष्टि संबंधीं जें सपिंडी करण ह्मणून कर्म आहे त्यांत ह्मणतात. पिंडाच्या संबंधानें मधु ( मध ) लागतो. आणि या मंत्रांत मधु शब्द आला आहे ह्मणून हे मंत्र त्या प्रसंगीं ह्मणत असतात वास्तविक पाहतां तसल्या प्रसंगाला या मंत्रांचा कांहीं संबंध नाहीं.

**भोळेपणाच्या कमालीचें उदाहरण.**

गर्भ मोचनाचा मंत्र.

**( मंत्रार्ध ) प्रमन्दिने पितुमदर्चता वचो**
**यः कृष्ण गर्भा निरहन्नृ जिश्वना ॥**

**अर्थः**—तुह्मी स्तुत्य इंद्राप्रत हव्य युक्त स्तोत्र गा, जो इंद्र ऋजिश्व्याच्या योगें करून काळ्या लोकांला मारून टाकिता झाला."

( अ. १ अ. ७ सू. १०१ मंत्र १ )

**टीकाः**—स्त्रियांची गर्भापासून सुटका होत नसली, तर ती सत्वर व्हावी ह्मणून हा मंत्र जपण्याचा प्रचार पडला आहे. याचें कारण इतकेंच दिसतें कीं यांत गर्भ शब्द आला आहे. 'कृष्ण गर्भाः' या शब्दाचा अक्षरशः अर्थ ज्यांचीं पोरें काळीं आहेत अशा प्रजा इतका आहे. त्याचा अर्थ मातेच्या पोटांत असलेला गर्भ असा येथें होत नाहीं आणि तसा होतो असें क्षणभर कल्पिलें तरी गर्भाची सुटका व्हावी अशा विषयीं यांत कांहींच नाहीं इतकेंच नव्हे, परंतु त्या गर्भाचा नाश होण्याविषयीं मात्र सांगितलें आहे !

**भोळेपणाच्या कडेलोटाचें उदाहरण पहा.**

वधूवरांचे आयुष्यवर्धक मंत्र.

**पुनः पुनर्जायमाना पुराणी समानं वर्णमभि शुम्भमाना ।**
**श्वघ्नीव कृत्नुर्विज अमिनाना मर्त्तस्य देवी जर यन्त्यायुः ॥**

**अर्थः**—"पुनः पुनः जन्मास येणारी आणि पुरातन असूनहि

एकच रूपानें शोभणारी ही उषा देवी, धूर्त आणि नागविणाऱ्या द्यूतकाराप्रमाणें मर्त्यांचें आयुष्य हळू हळू हरण करणारी होय.”

(अ. १ अ. ६ सू. ९२ मंत्र. १०)

**टीका:**—लग्नांत वरानें वधूचें पाणिग्रहण केल्यावर आयुष्य वाढावें या हेतूनें ज्या मंत्राच्या शेवटीं “आयुः” हा शब्द येतो असे जे आयुष्यवर्धक सहा मंत्र म्हणून आशीर्वाद देतात, त्यांत हा मंत्रही कोणी कोणी म्हणतात कारण याच्या शेवटीं “आयुः” असा शब्द आहे परंतु ज्यानें हा मंत्र अशा कामी लाविला त्याला याचा अर्थ समजला नाहीं. जर समजता तर ज्यांत आयुष्य वृद्धि नसतां हानि सांगितली आहे असा मंत्र अशा मंगल कार्यांत तो घालताच ना.

(वेदार्थ यत्न पुस्तकावरून.)

अशा प्रकारचीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. या मंत्राच्या खऱ्या अर्थाप्रमाणें जर ईश्वरानें गोष्टी घडवून आणल्या तर, मोठाच अनर्थ ओढवण्याचा प्रसंग खरा, चंडी पाठांत एका ब्राह्मणानें ‘ भार्यां रक्षतु’ म्हणण्याऐवजीं भार्यां भक्षतु भैरवी असें चुकून म्हटल्यामुळें, त्याची भार्या मृत झाली. ही गोष्ट भटांनीं चंडी पाठांत हलगर्जीपणा करूं नये म्हणून त्यांस भीति घालण्याकरितां सांगण्यांत येतें. वरच्या प्रमाणें वेदोक्त मंत्रांचे मूळ अर्थाचें काय होत आहे याचा कोणीच विचार करीत नाहीं. कधीं कधीं गर्भ मोचनाचा मंत्र म्हणतांच स्त्री सुखरूपपणें बाळंत झाली तर भटजी मंत्राच्या प्रभावाचें ऐटीनें वर्णन करूं लागतात. परंतु बहुत प्रसंगीं असल्या गोष्टी काकतालीय न्यायानें होतात कधीं कधीं “ भट मंत्र म्हणताहेत, आतां आपली खचित लौकर सुटका होईल” या औत्सुक्यानेंही इच्छित काम होतें. शरीराचा व मनाचा निकट संबंध असल्यामुळें मनावर झालेले सुष्ट दुष्ट परिणाम शरीरावर घडतात. बहुतेक मंत्राचा हाच प्रकार होय, परंतु भोळ्या लोकांस मंत्र प्रभावानेंच विलक्षण कामें होतात असें वाटतें. सारांश

काय कीं वेद मंत्र, संध्या, रुद्र इत्यादि गोष्टी अर्थावांचून ह्मणून त्यांतच परमेश्वराची स्तुति व प्रार्थना झाली असें आह्मीं समजतों. यांत स्तुतीचें व प्रार्थनेचें खरें कार्य घडत नाहीं कधीं कधीं विपरीत प्रकार घडतो ह्मणून जें कांहीं करणें तें अर्थ समजून घेऊन करावें तरच तें कृत्य केल्याचा फायदा, नाहींतर तें कृत्य करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

=======

## नामोच्चारण.

देववाचक नांवाचा उच्चार करण्यांत कांहीं विशेष पुण्य आहे असें आह्मीं मानितों. ख्रिस्ती लोकांचें मत आह्मांहून विपरीत आहे. उगाच देवाचें नांव घेणारा मनुष्य पापी आहे असें ते मानितात. नवऱ्याचें नांव आमच्यांत घेण्याचा प्रघात नाहीं. तें घेतल्यानें त्याचें आयुष्य कमी होतें असा समज आहे. परंतु ख्रिस्ती लोकांत (नेटिव ख्रिस्त्यांच्या बायकांवर पूर्वाश्रमीचे संस्कार असल्यामुळें त्यांस हा नियम लागू नाहीं.) नवऱ्याचें नांव उच्चारण्यास स्त्रियांस कांहीं दिक्कत वाटत नाहीं. आतां या परस्पर विरुद्ध समजांचा विचार केल्यास असें आढळेल कीं, ईश्वराचें किंवा नवऱ्याचें नांव न घेण्यांत एक प्रकारचा मान देणें आहे. वारंवार नांव घेतल्यानें सलगी फार होते व ' अति परिचयात अवज्ञा ' हा न्याय लागू होतो. अशा समजानें निरनिराळ्या दोन पृथक लोकांत नामोच्चारणाची बंदी झाली असावी. आमच्या स्त्रिया नवऱ्यांचें नांव घेत नाहींत याचा कित्येक परकी लोक गैर समजानें असा अर्थ करितात कीं, नवरा बायकांचें वितुष्ट असल्यामुळें बायका नांव घेण्यास नाखूष असतात! आतां आमच्या कित्येक स्त्रिया नवऱ्याचें नांव न घेण्याचा प्रघात पाळतात परंतु, त्याच्या हेतूस झुगारून देतात. " जळ्ले मेल्यांचे हात. मेले कसे वसावस आंगावर येतात. आमच्या हिकडल्यांना कीं नाहीं काडीचीही अक्कल नाहीं " इत्यादि वाक्यें नवऱ्याचें नांव न उच्चारणाऱ्या स्त्रीच्या तोंडून बऱ्याच

वेळां ऐकूं येतात. त्यविळीं विचारी मनुष्यास किती चमत्कार वाटत असेल याची सहज कल्पना होणार आहे. ईश्वर व नवरा याच्या नामोच्चारणासंबंधानें आह्मांत व ख्रिस्ती लोकांत भिन्न समज कां झाले याचीं कारणें शोधून काढण्याचें काम तत्ववेत्यांवर सोंपवून मी आप-ल्या गृहीत विषयाकडे वळतों.

देवनाम जपण्यांत पुण्य आहे हा आमचा समज होण्याचें कारण बहुधा असें असावें कीं, नामोच्चारणा बरोबर त्या नांवानें दर्शवि-लेल्या व्यक्तीचा बोध होतो इतकेंच नव्हे, तर ती व्यक्ती डोळ्यांपुढें दिसूं लागते. लक्षांत येणाऱ्या व्यक्तीचीं कृत्यें ही आपणास दृश्य होऊं लागतात. व्यवहारांत याचा अनुभव पदोपदीं येतो. ह्मणून ईश्वराचें मंगलनाम उच्चारल्यानें त्याच्या कृत्यांचें किंवा पराक्रमाचें आपणास स्मरण होऊन आपल्या सद्वासना जागृत राहतील, निदान वाईट विचा-रांना तरी आपल्या मनांत ईशनामोच्चार चालत असतां स्थळ मिळ-णार नाहीं, अशा हेतूनें नामोच्चार प्रचात सुरू झाला असावा. लो-कांनीं देवाचें नांव घ्यावें ह्मणून साधुसंतांनीं व पुराणिकांनीं फारच नामी गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांपैकीं अजामिळाची गोष्ट होय. हा ब्राह्मण फार पापी होता. त्याच्या पुत्राचें नांव नारायण होतें. तें मरतां मरतां त्यानें उच्चारल्यानें तो सद्गतीस गेला. खरोखर परमे-श्वराकडे लक्ष न देतां केवळ कोणत्या तरी कारणानें ईश्वरवाचक नांव उच्चारल्यानें महापापी अजामिळ तरला तर, असें विलक्षण प्रभा-वाचें नांव तुह्मी सतत जपा असा साधुसंत उपदेश करीत आले,

**वामन ह्मणतो:—**

**अहो येतां जातां वसत उठतां काम करितां**
**सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां**
**घरीं दारीं शय्येवरि रतिं सुखाचे अवसरीं**
**समस्तांची लज्जा त्यजुनि भगवत् चिंतन करीं**

## कारण.

**अजित नाम वदो भलत्या मिसें । सकल पातक भस्म करीतसे**

हरिदास बुवा 'राम' नाम उच्चारल्यानें पातक कसें निघतें तें सांगतात:—राम नामांतील 'रा' अक्षर उच्चारतांच जबडा उघडतो व आंतील सर्व पाप बाहेर पडतें 'म' ह्मणतांच जबडा बंद होतो ह्मणून बाहेर पडलेल्या पापास पुन्हां आंत येतां येत नाहीं. ह्मणजे वाताकर्षक यंत्रानें जसें निर्वात स्थल करितां येतें तद्वत रामनामोच्चारानें निष्पाप शरीर होतें! यास आधार काय असें कोणी पुसल्यास, मनुष्य घातक, पापी, वाल्या कोळी, रामनामोच्चारानें, पवित्र वाल्मिक ऋषी बनला ही गोष्ट सांगण्यांत येते. केवळ नामाच्या उच्चारानें पुण्य प्राप्ति होते इतकेंच नव्हे तर, पोपट किंवा मैना यांनीं उच्चारलेलें देवनाम ऐकून पुण्य लागतें. इतकेंच नव्हे तर 'राम' हीं अक्षरें कागदावर लिहून तो कागद पिठाच्या गोळींत घालून तो माशाकडून खावविला ह्मणजे तो खाणारा मासा, व खावविणारा मनुष्य निष्पाप होऊन स्वर्गीं जातात असा भोळेपणानें आमचा ग्रह होऊं लागला. मूळ उद्देश सोडून आह्मीं किती झुकलों पहा. ईशनामोच्चारणानें आह्मांस त्याच्या सद्गुणाचें व पराक्रमाचें दर्शन होईल खरें. परंतु आजपर्यंत ईश्वर चर्मचक्षूंनीं कोणींच पाहिला नाहीं. तेव्हां फार झालें तर रामनाम अवधान पूर्वक उच्चारिल्यास रामाची पार्थिवमूर्ती ध्यानीं येईल किंवा रामायण पूर्वीं ऐकिलें असल्यास, त्याच्या पराक्रमाची आठवण होईल. परंतु अवधान पूर्वक रामनाम उच्चारणारे शेंकडा ९ मिळणें कठिण. राम, राम, राम, राम, असा सारखा तडाखा चालला असतो. त्या तडाख्यांत त्याचे पराक्रम किंवा त्याचें रूप मनांत आणण्यास अवकाशच नसतो. नुसता 'राम ध्वनि' उच्चारणारा, रामशेट सोनारास, कीं राम झेंतरास, कीं दशरथी रामास उद्देशतो? कोणास ठाऊक! जो प्रघात पडला आहे तो आचरण्यांत पुण्य आहे या परतें त्या बिचाऱ्यास

कांहीं माहीत नसतें. आतां अशी कल्पना करूं कीं, कोणत्याही मिषानें कां होईना 'राम' ध्वनि काढतांच खरोखर जो ईश्वर किंवा राम तो, ते शब्द आपणास उद्देशून वदण्यांत येत आहेत, असें समजतो आहे, परंतु याचा तरी काय फायदा? आपण डाक्तराकडे गेलों व त्यास ऐकूं जाईल अशा उच्च स्वरानें डाक्तर, डाक्तर, डाक्तर, डाक्तर, ह्मणून भराभर त्यास हांका मारूं लागलों तर, त्यास त्रास होऊन तो आपणास ह्मणेल अरे, माझ्या नांवाचा कशाला जप चालविला आहेस तुला काय पाहिजे तें बोल. व्यर्थ कटकट करूं नको. देवाचे नांवाचा भराभर फाडा मात्र वाचला तर देवास त्रास होणार नाहीं काय? आह्मांस जें प्रिय तें देवास प्रिय आह्मी मानतों ही गोष्ट मूर्ती पूजेच्या प्रकारावरून सहज कळण्यासारखी आहे. कोणी ह्मणेल देव सर्वज्ञ आहे तेव्हां त्याचें नांव घेतांच आह्मांस जें पाहिजे तें तो जाणतो, यावर उत्तर असें कीं जर, तो सर्वज्ञ आहे तर नांव न घेतांही तो आमच्या इच्छा जाणत असला पाहिजे. सारांश काय कीं पोहाणी शिकविणारा पहिल्यानें पोहाणी शिकणारास पिढलीं बांधतो व त्यांच्या साह्यानें पोहतां येऊं लागल्यावर तीं सोडून टाकावीं, असा त्याचा उद्देश असतो तद्वत, मूर्तिपूजेच्या आधारानें निराकाराची कल्पना व्हावी हा जो महात्म्यांचा हेतु, तो सिद्धीस न जातां मूर्तिपूजेकडेसच विशेष धोरण ठेवण्यांत लोक तरबेद होऊं लागले. तोच प्रकार नामोच्चारासंबंधानें झाला. देव नांवाचा उच्चार करतां करतां, देवाचे शुद्ध आचार व विचार मनुष्यें करूं लागतील, हा महात्म्यांचा हेतु एका बाजूस राहिला व नामोच्चारांतच पुण्य प्राप्ति ही भलतीच कल्पना दृढ झाली. वेद मंत्र किंवा देवनाम याचा भलत्याच प्रकारानें आह्मी विनियोग करूं लागलों आमचे बांधव जे बुद्ध ते या कामांत आह्मापुढें गेले आहेत. त्यांनी प्रार्थनेचें एक यंत्रच बनविलें आहे! कागदावर मंत्र लिहून तो यंत्रांत घालून यंत्र फिरविलें ह्मणजे जितके वेळ यंत्र फिरेल तितके वेळ, मंत्र

जपाचें पुण्य आपणास लागतें, अशी त्यांची भ्रामक कल्पना झालेली आहे, मंत्रोचार किंवा प्रार्थना यांचा मनुष्यावर परिणाम होतो कीं ईश्वरावर होतो याचा कोणीच विचार करीत नाहीं. आह्मी जर ईश्वराची प्रार्थना केली नाहीं तर, त्याचें कांहीं अडेल असें नाहीं 'देव भावाचा भूकेला। दास भक्तांचा तो झाला' हीं विधानें मनुष्यानें ईश्वराची भक्ति, उमेदीनें करावी एवढ्याच साठीं केलेलीं आहेत. भक्ति करण्यानें तिचे परिणाम भक्तावरच होतात. ह्मगजे तो भक्ति करीत असतां त्याच्या वृत्ति सन्मार्गांत असतात. अमूक एक गोष्ट ईश्वराजवळ मागावी तेव्हांच ती आपणास देण्याचें त्याला सुचतें असें कांहीं नाहीं. तो तर सर्वज्ञ आहे त्याला सर्व कांहीं कळतच आहे. अमुक एक गोष्ट देवाजवळ मागितली आहे ती आपणास तो देईल या उमेदीनें जें सुख होतें, त्या कारितां प्रार्थना करावयाची आहे. त्याच प्रमाणें आह्मी त्याची स्तुति करूं तरच त्यास आनंद होणार असें कांहीं नाहीं. तो सच्चिदानंद ह्मगजे सदा आनंदीच आहे. परंतु आपण त्याची स्तुति केली असतां त्यास आनंद होईल, अशी जी आपणास उमेद उत्पन्न होते, त्या उमेदीच्या सुखासाठीं त्याचें स्तौत्य मनुष्यें करताहेत, तें चांगलेंच आहे. पिठाच्या रामनामयुक्त गोळ्या माशांस खावविल्यानें, प्रार्थनेचें यंत्र फिरविल्यानें, वर वर्णिलेलें उमेदीचें सुख मिळण्यासाठीं लोक झटत आहेत, परंतु ते आपले ठरीव प्रार्थना प्रकार आजन्म करीत राहिले पण, त्यांचा मूळ हेतू जें सद्गुण वर्तन व सन्मार्गपंथसेवन या पासून ते घसरले तर, या नामस्मरणादिकांचा लवमात्र उपयोग नाहीं. फार झालें तर थोडेंसें मनास समाधान मात्र वाटेल. परंतु काळाचा व देहशक्तीचा जो व्यय होतो त्याचा मोबदला या समाधानानें भरून येणें अशक्य आहे. ह्मणून साधुवाक्य:—

'व्यर्थ भराभर केला नामोच्चार
जाणा तो असार देहाशीण.'

असें आहे त्याचा भाव जाणून नामोच्चारणाविषयीं जो आमचा भो-

ळेपणा आहे तो आह्मी सोडून त्याच्या खऱ्या हेतुसिद्धीस लागावें. परमेश्वराचें स्वरूप किंवा त्याचीं मंगलकृत्यें ध्यानांत आणून त्याचा जप, ध्यान, स्तुति किंवा प्रार्थना करावी. ह्मणजे महात्म्यांचा उद्देश सिद्धीस जाण्यास साधन होईल. व आमचें कल्याण होईल.

## पोथी वाचन.

वेद मंत्रांचा खरा अर्थ समजेनासा झाला तेव्हां, ते मंत्रच केवळ उच्चारणें यांतच पुण्य वाटूं लागलें. स्मृति व गीता ग्रंथ यांतील लेखां विषयीं तीच भावना झाली. प्रत्यहीं गीतापाठ करणारे परंतु तिचा अर्थ न समजणारे शेंकडों गृहस्थ आहेत. केवळ गीता वाचणें यांतच पुण्य आहे असा त्यांचा समज झालेला आहे. रामविजय हरिविजय इत्यादि अगदीं मराठी भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांचाही सर्व अर्थ कळण्यास मार्ग नव्हता, परंतु हल्लीं रा. रा. जावजी किंवा सोहनी यांसारखे, ग्रंथांवर टीपा देणारे लोक झाल्यामुळें, त्या ग्रंथांचा अर्थ तरी कळूं लागला आहे. पूर्वीं शब्द तोडलेले नसल्यामुळें अर्थाचा अनर्थ होत असे.

## मार्गीचाललाऋषींचाभार.

याचा अर्थ वाटेंत चांभारऋषि चालला आहे, असा कधीं कधीं समजण्यांत येई. ऋषींचा भार ह्मणजे मेळा हा अर्थ लोपून जात असे. शनिमहात्म्य वाचून एक भाविक, स्त्रियांस अर्थ सांगत होता.

**पहावी निज कन्येची अवस्था । आह्माकडे काय शब्द !**

' स्वतः येऊन आपल्या मुलीची स्थिति पहा, आह्मांस कां दोष लावता ' असा खरा अर्थ परंतु, निज ह्मणजे आपली हा अर्थच माहीत नसल्या मुळें भाविकानें अर्थ सांगितला कीं:—

" हे राजा तूं येथें येऊन नीज व मुलीची स्थिति पहा. "

असो, अर्थज्ञान न झालें ह्मणून काय झालें. भाविकपणें लोक ईश्वर विषयक ग्रंथ वाचताहेत हें तरी बरेंच आहे, असें कोणी ह्मणेल तर, ती ही गोष्ट एकनेक कबूल करण्या सारखी आहे. परंतु पुढें भोळेपणा कुठे

मला आहे तो पहा. पूर्वी लेखी पोथ्या पवित्र व छापलेल्या अपवित्र समजत. कारण छापलेल्या पोथ्यांच्या शाईत कोणते भ्रष्ट पदार्थ असतील कोण जाणें असा संशय येई. नुकतीच घडलेली एक गोष्ट सांगतों. कांहीं दिवसां पूर्वी प्रोफेसर जिनसीवाले, वेद मनुष्य कृत आहेत ह्मणून व्याख्यानें देऊं लागले. त्यांशीं वाद करण्याकरितां, आर्य समाजांत कोणी यती आले होते त्यांस नेमण्याचा विचार निघाला, तेंव्हां यती ह्मणाले. 'हे तुमचे प्रोफेसर पुस्तकें वाचून, त्यांच्या साह्यानें मजबरोबर वाद करणार काय ! पुस्तकें गाईच्या चर्बीनें छापलेलीं असतात, तीं पुस्तकें वाचणाराचें मुखावलोकनही मी करणार नाहीं, मग वादाची गोष्ट दूर राहिली. मजजवळ लाखी शाईनें लिहिलेल्या पोथ्या आहेत, तसल्या पोथ्यांच्या आधारानें जर कोणी वाद करूं इच्छित असेल तर पाहिजे तेंव्हां माझी तयारी आहे!' अलीकडे एकानें तर तुपाचें गुरुचरित्र छापलें आहे हें, शाईबद्दल संशय न राहावा ह्मणून. कांहीं सरावानें छापील पोथ्याही आह्मांस पवित्र वाटूं लागल्या. परंतु पुढें आमचें भोळेपण तिच्या आकारांत शिरलें. पोथ्या आडव्या छापलेल्या असतात बुकें-उभीं छापतात. बुकें तेथून झाडून सारीं अपवित्र ! कारण तीं वाचणारे बहुधा इंग्रजी शिकणारे व पुढें ख्रिस्ती होणारे किंवा कर्मठ दृष्टचा बाटणारे असतात. पोथींत देवाचा विषय व बुकांत ऐहिक गोष्टी असतात ह्मणून पोथी पवित्र; पुस्तक अपवित्र ! बुकें अपवित्र वाटण्याचें कारण तीं कागदावर छापलेलीं असतात, कारण कागद तयार करण्याचीं द्रव्यें गलिच्छ असतात, असें कारण वाटलें असतें तर त्यांत कांहीं तरी अर्थ होता, कां ह्मणाल तर रस्त्यावर शेंबूड शिंकरून गलिच्छ झालेल्या चिंध्या उकिरड्यांत कुजत असतात, त्या कुटून त्यांत खळ वगैरे घालून ह्मार, चांभार, मुसलमान यांच्या हातानें कागद तयार होण्याचा संभव असल्यामुळें तो अपवित्र वाटणें साहजिकच आहे परंतु, कागद घाणेर्ड्या पदार्थांचा बनतो हें भोळे लोकांस फारच थोडें माहित असतें आणि

जरी तें माहित असलें तरी, त्यावर देव नामाचा शिक्का उठल्यावर मग तो पवित्र होतो असा लोकांचा समज आहे. मग देव नांवानें जर कागद पवित्र होतो तर, तोच पोथींतील मजकूर बुक साईझनें छापला तर त्या बद्दल दिक्कत कां वाटावी ! वाटू नये पण आमचें भोळेपण आह्मांस सांगतें कीं उभीं छापलेलीं बुकें भ्रष्ट मजकुरानें भरलेलीं असतात ह्मणून, रामविजय आडव्या छापलेल्या पोथींतून वाचणें पवित्र परंतु बुकसाईझनें तो छापला असेल तर, तो वाचण्यांत पोथीइतकें पुण्य नाहीं ! आमच्या भोळेपणाचा येथें कसा कडेलोट झाला आहे तो पहा. वेदासारखा अत्यंत पवित्र मानलेला विषय, जर पुस्तक रूपानें प्रसिद्ध झाला असेल आणि त्याहून फारच कमी प्रतीचीं पुराणें पोथीसाईझचीं असतील तर, तीं अधिक पवित्र व शुद्ध मानण्याचा प्रघात आहे इतकेंच नव्हे तर ख्रिस्तीधर्म ज्यास अत्यंत अपवित्र वाटतो व त्या धर्माचें एखादें पुस्तक कोणी त्यास दिल्यास तें फाडून तोडून गटारांत जो फेंकून देत असतो, असा एक कर्मठ मनुष्य आहे. त्यास पोथ्यांची आवड फार. बुकांचा तिटकारा आहे.हा बिचारा जरी गरीब आहे तरी याजवळ पोथ्यांचा बराच संग्रह आहे, यास संस्कृत जरीं येत नाहीं तरी, त्या भाषेनें लिहिलेल्या पोथ्या संग्रहीं ठेवणें तो सुकृत्य समजतो. एकदिवस मी त्याच्या पोथ्या पहावयास गेलों. त्यांत संस्कृत भाषेनें येशूख्रिस्ताचें चरित्र छापलेली पोथी मला आढळली. हें लुकाचें शुभवर्तमान होतें. मी ही पोथी वाचूं लागलों.

**“ यिहुदियाया राज्ञो हेरोदस्य काले ऽबियस्य श्रेण्यां नियुक्तः सखरियनामा याजक आसीत् । तस्य भार्य्या हारोण वंशोद्भवा, नाम तस्या इलीशाबेता ”**

मी इतकें वाचून थांबलों. पोथीचे मालक ह्मणाले कां थांबलेत चालूं द्या. तीं यवनी बुकें वाचण्या पेक्षां हें संस्कृत वाचन खचित पुण्यकारक आहे. मी ह्मटलें तुह्मी तर ख्रिस्ती पुस्तकांस शिवत सुद्धां नाहीं आणि यांत तर ख्रिस्ताचें चरित्र आहे. हें तुह्मांस कसें चालतें ! खरोखर तुम-

च्या समजाप्रमाणें तुझी वाटलेत ! गृहस्थ झणाले, संस्कृतशब्द श्रवणानें वाटगेपणा येणार नाहीं. मी दुसऱ्या दिवशीं त्या गृहस्थां जवळ मराठींतील लुकाचे शुभवर्तमानांतील तीच ओंवी वाचूं लागलों:—

**" यहुदाचा राजा हेरोद याच्या दिवसां मध्यें अबीयाच्या वर्गांतील जखर्या नामें कोणी याजक होता, व त्याची वायको अहरोनाच्या कन्यांतील होती, तिचें नांव अलीसावेत. "**

लुक अ. १ ला ओवी ५ वी.

मी मराठी बैबलांतील हीं वाक्यें वाचीत असतां त्या गृहस्थांनीं कानांवर हात ठेवले होते व तोंडानें विष्णवेनम: झणून झणत होते. पुढें इंग्लिश बैबलांतून हींच वाक्यें वाचलीं.

"There was in the days of Harod, the King of Judaca, a certain priest named Zacharias, of the course of Abia: and his wife was of the daughters of Aaron, and her name was Elisabeth."

मराठी बायबल वाचण्याचें बंद करतांच त्या गृहस्थानें कानावरील हात काढले होते परंतु, इंग्लिश बैबल मी वाचूं लागतांच ते तडक घरांत निघून गेले ! बिचाऱ्यांस सगळाच भ्रष्टपणा वाटला असेल ! बैबलच्या कवरास चामडें होतें तें अपवित्र वाटलें असेल ( वस्तुतः व्याघ्रांबरापेक्षां हें मोरोको चामडें अधिक सफाईदार व नाजुक होतें. व्याघ्रांबरावर बसून संध्या करणारांनीं या चामड्यास नाकें मुरडणें चमत्कारिक होय ) बुकसाईझनें तें छापलेलें असल्यामुळें हें दुसरें अपवित्र पण. चर्बीची शाई हें तिसरें अपवित्रपण. यवनी भाषा हें चवथें व त्या भाषेंत ख्रिस्ती धर्म हें पांचवें अपवित्र पण त्यांस वाटलें असावें. सारांश पोथी संबंधी भोळेपणा आझांत दिसून येतो तो घालविण्याचा यत्न केला पाहिजे. ज्या वस्तू किंवा जे विचार शरीरास किंवा मनास खरोखर बिघडवीत असतील त्यांचाच त्याग करावा व त्यांस अपवित्र मानावें. कोणत्याही धर्माचें पुस्तक वाचण्यांत पाप नाहीं, त्यांतले चांगले विचार घ्यावे वाईट टाकून द्यावे झणजे झालें.

## भाषेसंबंधीं भोळेपणा.

पोथीवाचन या मागील प्रकरणावरून एक गोष्ट सिद्ध होते कीं; भाषेसंबंधीं लोकांत बरेंच भोळेपण माजलें आहे. आमची व्यावहारिक महाराष्ट्रभाषा ईश्वर स्तुति किंवा ईश्वर प्रार्थना करण्यास संस्कृतास हार जाणारी नाहीं, इतकेंच नव्हे तर प्रोफेसर भागवतांच्या मताप्रमाणें ' ईश–स्तुति–प्रार्थनेसंबंधी या भाषेंत संस्कृताहून अधिक विचार झालेला आहे. भक्तिभावासंबंधीं मराठींत जितका ऊहापोह झाला आहे तितका संस्कृतांत नाहीं. ' ही गोष्ट निःसंशय खरी आहे परंतु, लोकमत किती चमत्कारिक आहे पहा. मराठीहून संस्कृत व संस्कृताहून वैदिक संस्कृत अधिकाधिक पुण्यकारक आहे असें लोकांस वाटतें. या लोक विचाराची मीमांसा केली, तर असें आढळेल कीं, जितक्या जितक्या भाषा अधिक जुन्या, तितकें तितकें त्यांत गूढपण अधिक आहे. जुनें तें सारें पवित्र मानण्याकडे कल असल्यामुळें, फार जुन्या भाषांत अत्यंत पवित्र पण आहे असें लोकांस वाटतें. मूर्तिपूजेचा विचार केला असतां असें आढळतें कीं, ज्या देवाचें सहज दर्शन होण्याचा संभव आहे त्यापेक्षां, जो देव अत्यंत गूढ स्थळीं व अस्पष्ट दिसणारा आहे, त्याचें महत्व अधिक मानण्याकडे लोकांचा फार कल असतो. तेव्हां गूढपणांत स्पष्टतेपेक्षां ईश्वरत्व अधिक भासूं लागल्याप्रमाणें, सहज कळणाऱ्या मराठीपेक्षां संस्कृत, अधिक पुण्यकारक किंवा ईश्वरास आवडती असें वाटूं लागलें. संध्या संस्कृतांत आहे, तिचें मराठी भाषांतर बऱ्याच लोकांनीं केलें आहे. परंतु मराठी संध्या करणारे कोणी आढळांत नाहींत. ब्राह्मण होऊं पाहणारे कित्येक मराठे भाई जानवीं घालून संध्या व श्रावणीही करूं लागले आहेत. परंतु हे सर्व विधि संस्कृतांतूनच करण्याकडे त्यांचा भर आहे. आतां या मराठे भाईंच्या पूर्वींच्या ५६ पिढ्यांस संस्कृताचा गंध नसल्यामुळें त्या भाषेच्या प्रयोगांचे ते धिंडवडे काढीत आहेत. ' केस्वाय्नह्मा।

नारायेनायेन्ह्मा! ह्माचेवायेन् ह्मा!' इत्यादि आचमन विधि होत असतात. " जाणवीं घालूनशान झालीं आतां, गात्रोत्री जपण्याचा इचार बगाहो मंडली. सरावनीस येळ फार झाला, चपलाय करा. आटपा विगी विगी" इत्यादि वाक्येंही उच्चारल्याचें ऐकण्यांत आहे. सदर्हू मराठे भाईची थट्टा करावी, ह्मणून हीं वाक्यें दिलीं आहेत असें कोणास वाटेल, पण तसें नाहीं. त्यांनीं संध्या करूं नये, असें कित्येक ह्मणतात तेंही मला मान्य नाहीं. दिवस रात्रीच्या संधिवेळेचें असामान्य स्वरूप लक्षून, परमेश्वराच्या भक्तिभावांत जर यांचें मन तल्लिन होत असेल, तर कोणाच्याही निंदेस न जुमानतां यांनीं खुशाल संध्या करावी. परंतु संध्यावंदनाच्या हेतूंपासून फार दूर झुकून कित्येक भोळ्या कर्मठांनीं, पोपट पंजीचा फार्स उडविण्याचा जो प्रघात सुरू ठेवला आहे, तो तसाच ठेवणें ह्मणजे आगींतून निघून फोंफाट्यांत पडण्यासारखें आहे, असें ह्मटल्याखेरीज राहवत नाहीं. संध्या रुद्र इत्यादिकांचा खरा अर्थ जर व्यवहारिक भाषेच्या द्वारें लोकांस कळेल, तर त्यांचें गूढपण नष्ट झाल्यामुळें त्यांवरील लोकांची हल्लीं प्रमाणें पूज्यबुद्धि राहीलसें वाटत नाहीं. 'अश्माचमे, मृत्तिकाचमे, गिरयचमे' इत्यादि विधानें व्यावहारिक भाषेंत होऊं लागल्यास लोकांची कल्पना जागृत होईल. व बैबलच्या इंग्लिश भाषांतरानें जें कार्य पाश्चात्यांच्या सुधारणेवर झालें, तेंच कार्य आमच्या धर्म ग्रंथांच्या भाषांतरानें आमच्या सुधारणेवर होईल संध्या व रुद्र इत्यादिकांचे खरे हेतु लोकांस कळतील तर, अधिक उदात्त विचारानें ते परमेश्वरास भजूं लागतील. गंगानदीस अनेक कारणांनीं ईश्वरत्व आलें आहे. त्यांपैकीं तिचा गुरुप्रवाह हें एक होय. आतां आमाझोनचें गुरुत्व गंगेहून अधिक असल्यामुळें गंगेचें, गुरुत्वासंबंधीं ईश्वरत्व ते आमाझोनलाही देऊं लागतील. यास्तव सुधारकांनीं आपल्या बुद्धीचा ओघ धर्म ग्रंथांच्या भाषांतरांकडे वळविला पाहिजे. सहज कळणाऱ्या मराठीपेक्षां संस्कृत पुण्यकारक अशी सामान्य जनाची कल्पना असल्यामुळें, व या

भाषेचा मानमरातब मराठीहून जास्त असल्यानें, ही भाषा बोलणाऱ्यांची योग्यता कांहीं लोकांस विशेष वाटते ह्मणून, ब्राह्मणाहून कमी दर्जाचे मानले गेलेले कित्येक लोक, ज्या भाषेचा द्वारें आपणास योग्यता यावी ह्मणून, कधीं कधीं संस्कृतांत बोलण्याचा आव घालतात परंतु कधीं कधीं त्यांची यासंबंधानें फारच नाचक्की होते. कारण ते, जे संस्कृत शब्द योजतात ते बहुधा कोशांतून पाहून योजलेले असतात ह्मणून, कोशांतून शब्द काढून मराठी बोलूं पाहणाऱ्या गौरकायांप्रमाणेंच त्यांचा हास्यकारक प्रकार होतो. समुद्रास अर्णव हा प्रति शब्द आहे. हा शब्द एका साहेबास माहीत होता. तो आपल्या मित्रास ह्मणाला '**मित्रा अर्णवावर फिरावयास येतोस काय ?**' मराठी जाणणाऱ्या मित्रास अर्णव शब्द चमत्कारिक वाटला. असाच प्रकार संस्कृत बोलणाऱ्या एका कपीचा झाला तो असा:—

तो आपल्या मित्रास ह्मणाला 'मित्रा अद्य संध्याकाळीं मी, वीथींतून गमन करीत असतां, माझी एका जीर्ण ( ह्मातारा ) मनुष्याशीं ग्रंथी पतन पावली. ( गांठ पडली ) तदनंतर रात्रौ मी भोजनार्थ खाणावळीण बाईकडे गेलों. एक अन्न कवल मम—कर—कमलामध्यें ग्रहण करून वदनांत त्यक्त केला. पण दादा तो अगदीं इकासारखा लागला' ! हें घेड गुजरी संस्कृत बोलण्यांत बोलणाराचा उद्देश व्यक्त होत आहे. संस्कृत भाषा श्रेष्ट ह्मणून, ती कशीबशी बोललें तरी मोठेपण आहे, असा त्याचा समज झाला असावा खास. कित्येक शूद्रांस संस्कृतांतून आपलें कर्में भटांनीं चालवावीं असें वाटत असतें. भटजींस तितपतच संस्कृत येत असतें परंतु दक्षिणेवर नजर देऊन 'उष्णं भातं फुकं खातं' अशासारखें अनुस्वार युक्त कांहीं तरी शब्द भोळ्या शूद्रांस ऐकवून संस्कृतांत कर्में चालवीत आहों असें दाखविण्याकडे त्यांचा कल असतो. शूद्रांस वेदाचा अधिकार नाहीं असें भटजींस वाटतें. त्यांस तर त्याची आवड फार ह्मणून, वेदोक्त मंत्र ह्मटल्यास अमुक दक्षणा व पुराणोक्त ह्मट

ल्यास अमुक, असा ठराव करण्यांत येतो. या लोकांसच कांहीं हंसावयास नको. सभांत भाषण करतांना एखाद्या गोष्टीस आधार दाखवावयाचा असतां, भलें थोरलें जाड, सोनेरी कव्हराचें पुस्तक आधार देण्यास टेबलावर ठेवलें असतां, सामान्य श्रोतृजनास वाटतें कीं, कांहींतरी महत्वाचा आधार या पुस्तकांत आहे खचित! आतां या लष्ठ बुकांतला तोच आधार छापलेलें लहानसें चोपडें आधार देण्यास पुढें केल्यास, त्या चोपड्याच्या क्षुद्रत्वावरून आधाराचें क्षुद्रत्व मानणारे शेंकडों लोक आहेत. वकील लोक भोळ्या कुळापासून पैसे उपटण्याची अशी युक्ति करितात. ते एक लहान आकाराचें साधें व दुसरें खूब जाड व सोनेरी कव्हराचें, अशीं दोन बुकें टेबलावर ठेवतात. कूळ मागितलेली फी देण्यास घासघीस करूं लागलें तर वकील साहेब ह्मणतात १ रुपयाच दिलास तर या भिकार पुस्तकांतल्या आधारावर मी तुज करितां भांडेन. पण जर ९ रुपये देशील तर या थोरल्या पुस्तकांतले आधार काढून तुझा कज्या जिंकीन. तुझी मर्जी काय तें बोल? भाबडें बिचारें कूळ. थोरल्या बुकांतल्या आधारानें खचित आपण जिंकूं असें समजून, कर्ज काढून विन तक्रार वकिलानें मागितलेली रकम देतें. यांतलाच वेदोक्त व पुराणोक्त कर्म यांचा प्रकार आहे. हें भोळेपण अवश्य घालविलें पाहिजे.

संस्कृत इंग्लिश इत्यादि सामान्य जनास न कळणाऱ्या भाषांत जे शब्द सभ्यपणाचे गणले आहेत ते, मराठींत कधीं कधीं असभ्यपणाचे किंवा कमी योग्यतेचे मानण्यांत येतात. विघ्न विनाशक गजाननाचें 'वक्रतुंड' इत्यादि स्मरण करण्यांत येतें. वक्रतुंड याचा वांकड तोंड्या असें मराठींत भाषांतर होईल. गणपतीस हा शब्द लावणाऱ्यांवर गणेशभक्त दांत ओंठ खाल्याखेरीज कधीं राहणार नाहींत. परंतु असें कां व्हावें. दोन्ही शब्दांचे अर्थ सारखेच आहेत परंतु वक्रतुंड शब्द मंगलवाचक व, वांकडतोंड्या निंद्य मानला आहे यानें कारण इतकेंच

दिसतें कीं, वांकडशब्द मराठींत व्यंगत्व दर्शक आहे ह्मणून तो गजाननाच्या नांवाकडे लावणें आह्मांस युक्त दिसत नाहीं. इतकेंच नव्हे, तर तो कोणी तसा योजल्यास त्याचा आह्मांस तिटकारा येतो. ही गजाननाच्या नांवाची भांडाभांडी आह्मा मानवांतच. खुद्द गजाननास वक्रतुंड या संस्कृत किंवा वांकडतोंड्या या प्राकृत नांवाचें सारखेंच महत्व वाटणार आहे. यांत कांहीं संशय नाहीं. इंग्लिश ही राजभाषा आहे ह्मणून तिला हल्लीं फार श्रेष्ठत्व आलें आहे. 'न वदेत यावनीं भाषां प्राणैःकंठ गतैरपि' हें पूर्वीचें बंधारण सुटून हल्लीं स्वभाषेपेक्षां इंग्लिश बोलणाराचीच योग्यता आह्मी अधिक मानीत आहों. आमचे जातभाई वरिष्ट अधिकाऱ्यांस आमची स्वभाषा कळत असतां, स्वभाषेंत त्यांशीं बोलण्यापेक्षां इंग्रजी बोलण्यानें त्यांच्या मनावर विशेष कार्य होतें. 'महाराज मला रजा द्याल का?' यापेक्षां 'Will you grant me leave please?' या प्रश्नरूप विनंतीनें वरिष्ट खुलून जातात व बहुधा आमचें काम होतें. वस्तुतः इंग्लिश व मराठी भाषेंतल्या सदर्हु विनंतींत सारखाच अर्थ असतां, पहिली राजभाषा असल्यामुळें तिच्या शब्दांची योग्यता अधिक मानण्याची प्रवृत्ति होते ती भोळेपणामुळेंच. लहानापासून थोरापर्यंत अशा प्रकारचा, भाषेसंबंधीं भोळेपणा घालविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

## प्रायश्चित्त.

भ्रष्ट विचारांनीं चित्त अपवित्र झालें असतां, त्याकडून सुष्ट कृत्यें घडणें अशक्य ह्मणून तें, पुन्हा ताळ्यावर आणणें ह्मणजेच प्रायश्चित्त करणें होय. भ्रष्ट विचारांनीं मन भ्रष्ट होतें. स्त्रीस व कन्येस आलिंगन देण्यांत जरी शरीराचे व्यापार सारखेच होतात तरी, मानासिक व्यापार भिन्न असतात. स्त्रीस आलिंगितांना कामवासना जागृत असते व, अपत्य प्रेम कन्येच्या आलिंगनांत जागृत असतें. कन्येस कामवासनेनें

आलिंगन दिल्यास व्यभिचार दोष घडला, अर्थात् मन भ्रष्ट झालें. तें शुद्ध करण्याची जरूर आहे. ज्या ज्या काळीं ज्या नियमांनीं चालल्यानें समाजाची सुखवृद्धि होते, त्या त्या काळीं त्या नियमांविरुद्ध आचरण करण्याची मनास बुद्धि झाली ह्मणजे, मन भ्रष्ट झालें असें समजण्याची रीत सुरू झाली. समाजसुख विघातक नियम आचरणें ह्मणजे व्यभिचार करणें होय. ह्मणून सुखभंजक वृत्ति ताळ्यावर आणण्याकरितां प्रायश्चित्त विधि प्रचारांत आला. पश्चात्तापानें असल्या वृत्ति नष्ट होतात ह्मणून पश्चात्ताप हेंच खरें प्रायश्चित होय. देहाचा व मनाचा निकट संबंध असल्यामुळें अपवित्र देहानें मन अपवित्र होतें, ही गोष्ट पुढें कळून आली. खाण्यापिण्याचे देहावर सुष्ट दुष्ट परिणाम घडत असल्यामुळें, खाण्यापिण्याच्या पदार्थांच्या शुद्धाशुद्धतेकडे मानवांचें लक्ष गेलें. खाण्यापिण्यांत पूर्वीं दोप मानीत नव्हते.

" न मांस भक्षणे दोपो । न मद्ये नच मैथुने. "

मनु अ. ५ श्लोक. ५६

परंतु पुढें या तिन्ही गोष्टींच्या अतिरेकानें समाजसुखास व्यत्यय येऊं लागल्यामुळें यासंबंधानें कांहीं नियमन करणें भाग पडलें. तेव्हां यज्ञ याग करून मांस मद्य भक्षावें व लग्न करून तिसऱ्या गोष्टीचें सुख भोगावें असा परिपाठ पडला. पुढें या गोष्टींच्या संबंधानें फारच बारीक निर्बंध करण्यांत येऊं लागले. वस्तुतः खाणें पिणें या सामाजिक गोष्टी होत. यांचा ईश्वराशीं संबंध नाहीं. तथापि मद्य मांसानें देह तामस वृत्तीचा होतो व त्यामुळें चित्त भ्रष्ट होऊन तें ईश्वरापासून बहकतें, असें वाटूं लागल्यामुळें खाणें पिणें या धार्मिक गोष्टी होऊन बसल्या. इतकेंच नव्हे तर या गोष्टींतच कायतें धर्माचें सार आहे असें वाटूं लागलें! नुकत्याच झालेल्या पुणें प्रायश्चित्त प्रकरणा वरून ही गोष्ट स्पष्ट कळण्या सारखी आहे. विधर्म्यांच्या हातचा चहा पिणारे ४२ जण धर्मभ्रष्ट झाले असें जें कर्मठांस वाटलें व आपल्या समजुती प्रमाणें प्रायश्चित्त देऊन त्यांस, पवित्र करून घेतलें

असें त्यांनीं मानिलें, यांत कितीसा अर्थ आहे तें पाहूंया. विधर्म्याच्या हातच्या चहानें देहावर जर कांहीं दुष्ट कार्य घडेल व त्यामुळें चित्तभ्रष्ट होईल तरच प्रायश्चित्ताचा उपयोग. थोड्याशा विचारानें कळून येईल कीं त्या चहानें देहावर कांहीं फारसा वाईट परिणाम झाला नाहीं. चहा काफी इत्यादि उष्ण पेयें सतत प्राशन केल्यानें शरीरावर वाईट परिणाम होतात असें निदर्शनास आलें आहे. परंतु ब्राह्मणा कडील चहा पेक्षां तशाच कृतीनें इराण्यानें केलेल्या चहांत अधिक घात कर- ण्याचा गुण आहे असें कांहीं नाहीं ह्मणून, अत्यंत पवित्र ब्राह्मणाच्या हातच्या चहा पिण्या इतकाच या चहाचा परिणाम झाला असावा. आतां विधर्मी हे गोमांस भक्षक असल्यामुळें ज्या हातांनीं त्यांनीं मांस खाल्लें त्या हातचा चहा पिणें मनास किळस आणणारें अर्थात मनभ्रष्ट करणारें आहे असें, चहा पिणाऱ्यांस वाटत असल्यास त्यांस प्रायश्चित देणें जरूर आहे परंतु, त्यांस तसें वाटत असल्याचें दिसत नाहीं. मग जें मनभ्रष्ट झालें नाहीं त्यास प्रायश्चित्त काय द्यावयाचें ! प्रायश्चित्त दोन प्रकारचें आहे एक सद्यःशुद्धि व दुसरें वृत्तिशुद्धि. एखाद्यानें मद्य प्राशन केलें तर त्यास उन्माद येऊन त्याचें मन भ्रष्ट होईल. ही भ्रष्टता नाहींशी करण्यास, त्याच्या शरीरावर मद्याचे दुष्ट परिणाम न होण्यास जे तात्कालिक उपाय योजणें, ती सद्यःशुद्धि होय. तसेंच त्याच्या तों- डांत शेणमूत इत्यादि गलिच्छ पदार्थ घालून त्यास कृतकर्माचा पश्चात्ताप उत्पन्न होऊन तो मद्यप्राशन करणार नाहीं असे उपाय योजणें हें, दुसऱ्या तऱ्हेचें ह्मणजे वृत्तिशुद्धि प्रायश्चित्त होय. विधर्म्याच्या हातचा चहा पिणाऱ्यांस दिलें गेलेलें प्रायश्चित्त या दोन्ही प्रकारच्या प्रायश्चि- त्तांत येत नाहीं. कारण त्या प्रायश्चित्तानें चहाचे दुष्ट परिणाम किंवा तो पिण्याची निवृत्ति यांपैकीं कोणतेंच काम केलें नाहीं. ह्मणून, पुण्या- च्या कर्मठांनीं पेल्यांतल्या चहाचें मोठें वादळ उठविलें व चहा प्राशकांस प्रायश्चित देऊन, पवित्र करून घेतल्याचें मानलें, हें धर्मभोळेपणाचेंच

एक उदाहरण होय. त्याचप्रमाणें प्रायश्चित्त घेणाऱ्यांचेंही भोळेपण सांगितलें पाहिजे. कर्मठांच्या मनाप्रमाणें थोडेंसें प्रायश्चित्त घेतल्यानें व हा परिपाठ असाच चालल्यानें बऱ्याच सुधारणेच्या गोष्टी होतील अशी जी भ्रामक कल्पना उत्पन्न झाली ती व्यर्थ आहे. कारण, प्रायश्चित्त-रूपी दंड भरून सुधारणेच्या गोष्टी करूं लागणारे लोकांपेक्षां, ज्या गोष्टींस मोठमोठ्या नांवाजलेल्या लोकांनीं प्रायश्चित्त घेतलें, त्या गोष्टी खरोखरच फार वाईट असल्या पाहिजेत, व त्या आपण कदापि करूं नयेत, असें मानणारे लोकच आह्मां सारख्या धर्म भोळ्या लोकांत फार आढळतील. ह्मणून प्रायश्चित घेतल्यानें सुधारणा लौकर होईल ही सुधारकांची कल्पना, भोळे पणानें उत्पन्न झाली आहे यांत संशय नाहीं.

आमच्या प्रायश्चित विधींत पुष्कळ गोष्टी शुद्धिकरणार्थ योजिलेल्या आहेत. त्यांपैकीं गोमूत्र व शेण या दोन वस्तु होत. या प्रथम देह शुद्धि करितां, किंवा पश्चात्तापासाठीं प्रचारांत आल्या हें खात्रीनें सांगवत नाहीं. परंतु पश्चात्तापासाठींच या प्रथम उपयोगांत आल्या असाव्या व नंतर त्यांनीं देह शुद्धीही होते ही गोष्ट कळली असावी ( गोमूत्र या विषयावर मी स्वतंत्र निबंध लिहिला आहे त्यांत गोमूत्राचा स्वच्छतेकडे किती उपयोग होतो याचें सविस्तर वर्णन आहे. मूत तेथून सर्व घाण, गोमूत्र हें मूत आहे, ह्मणून तेंही घाण, अर्थात् अपायकारक असें कित्येक अल्लड सुधारकांस वाटतें हा त्यांचा भ्रम होय ) कारण ज्या काळीं मांसच नव्हे परंतु गोमांस देखील लोक भक्षण करीत त्या काळीं, गाईचें शेणमूत अपवित्र मानलें जाणें साहजिक आहे. गोमेध कालांत गोमूत्राचा उपयोग केल्याचें आढळत नाहीं. ह्मणून हल्लीं ज्याप्रमाणें एखादें निंद्य कृत्य करणारास खंति वाटण्यासाठीं त्याच्या तोंडांत थोडेंसें शेण घाला असें ज्या हेतूनें आपण ह्मणतों, तोच हेतु पूर्वीं गोमूत्र व शेण यांचा होता. हल्लीं 'गोमयं गृह मार्जयेत्' या अनुज्ञेंत गोमय मंगल वस्तु मानली जात आहे व, हें मानणें कांहीं गैर नाहीं

कारण, त्यांत तसेच गुण आहेत. आतां गोमयांत पवित्री करणा चीजें आहेत असें लोकांस माहीत नसतां ते, त्याचा पवित्रतेच्या दृष्टी भक्षणाकडे उपयोग करितात हा प्रकार, पाप निवेदनाप्रमाणें झाल असावा. बुद्ध धर्मांतून रोमन क्याथलिक धर्मानें ज्या कित्येक गोष्टि उचलल्या त्यांपैकींच पाप निवेदन ही एक होय. आचार्याजवळ केले ल्या पापांचा फाडा वाचण्याची पद्धत अशासाठीं पडली कीं, पाप निवेदन करणाराला त्यापासून खंति उत्पन्न व्हावी. कांहीं काल ही गोष्ट सुरळीत चालल्यावर असा ग्रह होऊं लागला कीं, पाप निवेदनानें पश्चात्ताप होतो व पश्चात्तापानें शुद्धि होते ह्मणून कोणतेंही का पाप असेना तें आचार्याजवळ सांगितलें ह्मणजे त्याचा सर्व दोष मग नाश होतो! क्याथलिक धर्माचार्यांच्या एका शिष्यानें त्यांचेंच घड्याळ चोरून हें पाप त्यांजवळ सांगून आपण पवित्र झालों असें मानणाऱ्या एका शिष्याची गोष्ट वाचण्यांत आली आहे. हें घड्याळ गुरु मागत असतां शिष्य देईना कारण पश्चात्तापानें दोष मुक्तता पूर्वी झाली असे ल्याचें त्याचे ध्यानीं आलें होतें. असाच प्रकार गोमयाचा झाला असा वा. खंति वाटण्याकरितां गोमय वापरिल्यानें खावविण्याचा प्रकार सुरु झाला पुढें, गोमय भक्षणें ह्मणजे पवित्र होणें असें वाटूं लागलें!

आतां पर्यंत प्रायश्चित्ताचे २ प्रकार सांगितले. त्याचा आणखी एक तिसरा प्रकार आहे त्यास देहांत प्रायश्चित्त असें ह्मणतात. हें प्रायश्चित्त व्यक्तीच्या सुधारणेकरितां नव्हे तर समाजाच्या वृत्ति सुधारण्याकरितां असतें. अमें बचा जीव घेतल्यास अस फांशीं दिल्यानें अ ज्या समाजांत आहे त्यास जीव घेण्याची धास्ती पडून तसली गोष्ट करण्यापासून त्यानें निवृत्त व्हावें हाच उद्देश आहे. रानटी लोकांत लहान सहान अपराधासही देहांत प्रायश्चित्त मिळतें. धर्मांतर करणारास आमच्या लोकां पूर्वी देहांत प्रायश्चित्त देत असावे असें वाटतें. हल्लीं असलें प्रायश्चित्त देणारास इंग्रजी राज्यांत तेंच परत मिळण्याची खात्री असल्यामुळें,

प्रायश्चित धर्मांतर करणारास कोणी बहुशा देत नाहीं. परंतु धर्मांतर करणारा मेला असें समजून त्याची क्रिया करण्यांत येते. आतां हा धर्मांतर करणारा बाटला ह्मणजे भ्रष्ट झाला असें जें लोकांस वाटतें यांत कितीसा अर्थ आहे तें पाहूं. धर्मांतर करणाराचे विचार भ्रष्ट असतात ह्मणून त्यास लोक भ्रष्ट समजतात असें नाहीं कारण, धर्म ह्मणजे मनुष्याचीं ईश्वराशीं कर्तव्यें होत. धर्मांतर करणारा ईश्वर संबंधीं कर्तव्यें पाळीत असतो मग, त्यास भ्रष्ट कां ह्मणावें? परंतु चमत्कार पहा काय तो एखादा नास्तिक भर सभेंत ईश्वराचे अस्तित्वाविषयीं शंका घेतो—खऱ्या धार्मिकांच्या दृष्टीनें हा अत्यंत मोठा अपराध होय.—तरी त्यास कोणी भ्रष्ट समजत नाहीं. त्याशीं बेटी रोटी व्यवहार करण्यास समाजास कांहीं दिक्कत वाटत नाहीं, परंतु जो ख्रिस्ती झाला त्याशीं मात्र समाज व्यवहार बंद करितो. फार काय सांगावें एखाद्याचे विचार ख्रिस्ती धर्ममय होऊन तो, ते लोकांत उघड सांगूं लागला तरी त्यास कोणी अपंक्त करीत नाहीं परंतु, जो मनापासून हिंदु आहे परंतु कांहीं कारणानें त्यानें बाप्तिस्मा घेतला आहे त्यास लोक बाटला असें समजून त्याशीं अन्नोदक व्यवहार बंद करितात. तेव्हां विचार व उच्चार यांत लोक भ्रष्टपणा समजत नाहींत. तर दिखाऊ आचारांत तो समजत आहेत, असें ह्मणावें तर तसेंही नाहीं. ख्रिस्ती होणारा मनुष्य ख्रिस्ती लोकांबरोबर मद्यमांस सेवन करीत असेल ह्मणून तो अपवित्र, लोक मानितात असें नाहीं कारण, ज्यानें बाप्तिस्मा घेतला नाहीं असा मनुष्य ख्रिस्ती लोकांकडे मद्यमांस भक्षितो असें समजलें तरी तो समाजांत खपला जातो. परंतु वनस्पत्याहारी मनुष्य कां असेना त्याच्या डोक्यावर मिशनेरीच्या हातचा संस्कार रूपानें जल बिंदु पडला कीं तो मनुष्य बाटला असें मानण्यांत येतें. मद्यमांसापेक्षां संस्कारजलांत अधिक भ्रष्टता आहे हा भोळेपणानें समज झाला आहे. एकानें बाप्तिस्मा घेतला आणि त्यास शिक्षा झाली नाहीं तर पुष्कळ लोक तसें करतील

व हिंदुधर्माचें नांव सांगणारांची संख्या कमी होईल ह्मणून बाप्तिस्म घेणारास बहिष्कार घालणें जरूर असें कोणी ह्मणेल तर त्याचें ह्मणणें कांहीं गैर नाहीं. परंतु असला मनुष्य पश्चात्ताप पावून परत हिंदु धर्माकडे येऊं लागल्यास समाज त्या गोष्टीस कबूल होत नाहीं. नाहीं ह्मणावयास मद्रासेंत मात्र नुकतेंच एक उदाहरण घडलें आहे. बाप्तिस्मा घेणारा मनुष्य बाटला असें जें समाजास वाटतें तें केवळ त्याच्या खाण्यापिण्यावरून असेल तर, त्याच्यापेक्षां मद्यमांसावर ताव झोडणारे धर्मांत खपत आहेत हा विसंगतपणा दिसतो. धार्मिक दृष्ट्या धर्मांतर करणाऱ्यापेक्षां नास्तिक अधिक दोषी आहे ह्मणून, त्यापेक्षां नास्तिकास अधिक शासन झालें पाहिजे. तिकडे कोणीच लक्ष देत नाहीं. नास्तिकास शासन करावयाचें ह्मणजे त्यास ठार मारावयाचें किंवा त्याचे अवयव छिन्न भिन्न करावयाचे, किंवा ज्या गोष्टींनीं त्यास त्रास होईल त्या त्या गोष्टी करावयाच्या, असें कांहीं नाहीं. तर नास्तिक्य बुद्धि जी त्याच्या मनांत उत्पन्न झाली ती, योग्य व समजुतीच्या मार्गानें नष्ट केली पाहिजे. जुलमानें कोणतीही गोष्ट करणें सुधारलेल्या देवीस पसंत नाहीं. ह्मणून नास्तिक्य घालविण्यास समजुतीचा व सामोपचाराचाच उपयोग करणें अवश्य आहे.

सारांश आपल्या अलौकिक बुद्धीच्या प्राचीन ऋषि पूर्वजांनीं, प्रायश्चित्तविधि ज्या हेतूनें पूर्वीं प्रचारांत आणिला तो हेतु, हल्लीं कोणीकडच्या कोणीकडेसच लोपून गेला आहे. धार्मिक दृष्टीनें प्रायश्चित्ताचा विचार केल्यास हल्लीं ज्या लोकांनीं नास्तिक्याचा स्वीकार केला आहे त्यां संबंधानें विशेप काळजी बाळगिली पाहिजे. तिकडे कोणीच लक्ष देत नाहीं. खाण्या पिण्यांतच काय तो धर्म अधर्म आहे असें बहुतेक समाजास वाटत असल्यामुळें, मद्यमांसादि भ्रष्ट पदार्थ भक्षणारे धर्मच्युत झाले असें त्यांच्या मनानें घेतलें आहे. यांत जरी कांहीं अर्थ आहे ही गोष्ट खरी परंतु या प्रत्यक्ष धर्माच्या बाबी नव्हत. या सामाजिक गोष्टी होत. परंतु यांत तरी किती भोकेपणा शिरलें आहे तें प

इराण्या कडल्या चहापेक्षां दारूचे दुष्ट परिणाम शरीरावर घडतात ह्मणून, मद्यासंबंधानें कडक निर्बंध पाहिजेत परंतु, मद्यपिणाऱ्यापेक्षां इराण्याकडील चहा पिणारे अधिक भ्रष्ट वाटतात, हें योग्य नव्हे. प्रायश्चित्त विधि चित्तशुद्धिकरितां आहे. एखादा मनुष्य मद्य पिऊन झिंगला तर त्यास योग्य प्रायश्चित ह्मटलें ह्मणजे त्याच्या शरीरांतील दारूचा उत्सर्ग होईल, दारू पिण्यापासून तो पराङ्मुख होईल अशा प्रकारचें तें असलें पाहिजे. ब्राह्मण भोजन किंवा गोप्रदान असल्या प्रायश्चित्तांनीं त्याच्या शरीरांतील दोषांची निष्कृति होणें नाहीं. प्रायश्चित्तांनीं चित्तशुद्धि, निदान शरीरशुद्धीही होत नाहीं, तीं प्रायश्चित्तें कुच कामाचीं होत. अशा प्रकारचींच प्रस्तुतचीं आमचीं बहुतेक प्रायश्चित्तें आहेत. हितकर प्रायश्चित्तें कोणतीं याचा विचार होऊन, तीं तीं प्रायश्चित्तें प्रचारांत आलीं पाहिजेत. खाणें पिणें लग्नें इत्यादि गोष्टींत पूर्वजांनीं जे निर्बंध केले ते, समाज सुखासाठीं होत. त्यांत स्वच्छतेकडे व आरोग्याकडे विशेष लक्ष दिलेलें होतें. परंतु हल्लीं ते नियम आह्मी धर्माची बाब समजत आहों. त्यांत आमच्या भोळेपणाचा कडेलोट कसा झाला आहे, याचा विचार पुढील भागांत केला आहे.

---

## भाग २ रा.

—:०*०:—

### सामाजिक भोळेपण.

**सामाजिक गोष्टींत जे सुधारणा करूं लागतात ते, वेडे किंवा माथेफिरू असावे असें बहुशा साधारण लोकांस वाटतें.**

खाणें पिणें लग्नें इत्यादि विषय सामाजिक होत. धार्मिक विषयांत व्यक्तीचा व ईश्वराचा संबंध फार करून असतो परंतु, सामाजिक विषयांना संबंध व्यक्ति व्यक्तींशीं असतो. खाण्यापिण्याचे सुष्ट दुष्ट परि-

णाम समाजावर घडतात व तद्नुरूप त्याची उन्नति किंवा अवनति होते. सामाजिक बंधारणें लोकांनीं काळजी पूर्वक पाळावीं ह्मणून, त्यांचा धर्माशीं संबंध जोडून दिला होता. तीं बंधारणें पाळण्यांत समाजानें इतकी कांहीं तत्परता दाखविली कीं, खऱ्या धार्मिक गोष्टींहून याच सामाजिक गोष्टी विशेष धर्माच्या वाटूं लागल्या व या गोष्टी आचरण्यांत परलोकीं उत्तम गति मिळेल अशी त्याची मिथ्या भावना झाली. हें भोळेपण कसकसें वाढत गेलें हें पुढील विवेचना वरून ध्यानांत येईल.

## केश.

केशासंबंधी भोळेपणा हल्लीं आह्मांत फारच वाढला आहे. आमच्या पूर्वजांनीं धर्माचें तत्व गुहेंत आहे असें मानिलें होतें परंतु, हल्लीं आह्मीं केंसांच्या मुळांत धर्मतत्व घुसडून दिलें आहे. मनुष्याच्या डोक्यांत इतर प्राण्यापेक्षां मेंदु विशेष असल्यामुळें त्याच्या संरक्षणार्थ निसर्गानें मनुष्य शीर्षावर लांब केश उत्पन्न केले. परंतु मनुष्यानें त्यांची कशी अवस्था करून टाकली आहे पहा.

## पुरुषाचे केश.

(१) मनुष्याच्या आद्यस्थितींत स्त्रिया व पुरुष सारखेच केंस राखीत होते. परंतु पुढें स्त्रियांहून आपण भिन्न दिसावें ह्मणून पुरुष केंस काढू लागले.

(२) पुढें दंडा दाखल पुरुषाचे केश काढण्यांत येऊं लागले, ज्यूलियस सीझरनें गाल देशावर स्वारी करून तेथल्या लोकांचीं मुंडणें करून त्यांस आपले गुलाम केले, तेव्हां पासून केंस काढणें ह्मणजे नम्र होणें असें त्या लोकांस वाटूं लागलें. ईश्वरास नम्र होणारे साधुसंत तेव्हां पासून आपलीं मुंडणें करूं लागले असा इतिहासांत दाखला मिळतो. आमच्या अत्यंत पवित्र मानलेल्या मनुस्मृतींत दंडा दाखल वपन सांगितलें आहे.

**मौंड्यं प्राणांतिको दंडो ब्राह्मणस्य विधीयते**
**इतरेषां तु वर्णानां दंडः प्राणांतिको भवेत्**
अ. ८ श्लो. ३७९

**अर्थः**—ब्राह्मणाचें मुंडण करावें हाच त्याला प्राणांतिक दंड, साक्षात् वधदंड ब्राह्मणास नाहीं. इतर वर्णांस साक्षात्प्राणांतिक दंड आहे.

पुराणांत पांच पाट काढल्याच्या ज्या गोष्टी लिहिलेल्या आहेत त्यांवरूनही, वपन हें दंडा दाखल असल्या बद्दल खात्री होते.

(३) संस्कार संबंधानें केश काढूं लागले.

**गार्भै र्होमैर्जात कर्म चौल मौंजी निबन्धनैः ।**
**बैजिकं गार्भिकं चैनो द्विजा नामपमृज्यते ॥** मनु. २, २७.

या श्लोकावरून स्पष्ट दिसेल कीं, बैजिक ह्मणजे पित्याच्या रेतो दोषा पासून व गार्भिक ह्मणजे अशुचि मातृगर्भवासानें प्राप्त झालेलें पातक नष्ट करण्यासाठीं, चौल इत्यादि संस्कार करण्यास सांगितलें आहे. चौलांत केश काढतात हें सर्वांस विदितच आहे परंतु, संस्कार हे प्रायश्चित्त रूप नव्हत. माता पित्यां पासून आपल्या शरीरा बरा-बर जे दोष आले, त्यांची निवृत्ति करण्यासाठीं संस्कार आहेत. व प्रायश्चित्त हें स्वतः केलेल्या दोषांच्या परिहारार्थ आहे.

(४) पुढें शुद्धते करितां केश काढूं लागले असावे असें दिसतें.

देहशुद्धीनें चित्त शुद्धि होते. केंसांत मळ राहतो ह्मणून केंस काढल्यानें देहशुद्धि व त्या पासून चित्तशुद्धि होत असावी असा लोकांचा ग्रह झाला.

**यानि कानिच पापानि । ब्रह्महत्यासमानिच**
**केशानाश्रित्य तिष्ठंति । तस्मात् केशान् वपाम्यहं**
व्यास स्मृति.

वरील श्लोकावरून शुद्धते करितां केश काढूं लागले हें उघड होत आहे. ‘ नछिंद्यान्नखलोमानि ’ नखें व रोम छेदूं नयेत.

मनु अ. ४ श्लोक. ६९.

हें वाक्य आरोग्य रक्षण दृष्टच्या लिहिलें असून शुद्धते करितां केंस काढण्यास पुढें सांगितलें आहे.

" क्लृप्तकेश नख श्मश्रु दांतः शुक्लांबरः शुचिः "

मनु. अ. ४ श्लो. ३५

संन्याशांचे जे ४ प्रकार उत्तरोतर अधिक योग्यतेचे मानले आहेत त्यांपैकीं १ कुटीचक २ बहूदक ३ हंस यांस शिखा टेवण्याविषयीं अनुज्ञा असून ४ था जो परमहंस त्यानें सर्वथैव मुंडण करावें असें सांगितलें आहे. प्रत्येक प्रायश्चित्तांत मुंडण आहेच. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास शुद्धतेच्या दृष्टीनें केश काढूं लागले हें स्पष्ट होत आहे.

## आतां भोळेपणा काय आहे तें सांगतों.

( अ ) पूर्वीच्या ऋषींचे जटाभार आपण चित्रांत व हल्लींच्या बैराग्यांच्या डोक्यांवर पाहतों. यावरून स्त्रियांप्रमाणें पुरुष केश राखीत असावे असें आपणांस कळतें. पुढें शुद्धतेकरितां केश काढण्याचा प्रचार धर्माची बाब होऊन बसली. शंकराचार्यांच्या अनुयायांशिवाय हजामत करणारे लोक फारच थोडे आहेत. हजामत करणें ही हिंदु धर्माची आह्मी खूण समजतों. केंस वाढविणारा वाऱ्या व तो लौकरच ख्रिस्ती होणार असें आमच्या मनांत येतें. केंसांचा धर्माशीं कांहीं संबंध नाहीं परंतु तो तसा असल्याचें आह्मी कल्पिलें आहे. हा आमचा भोळेपणा पाहून मुक्तिफौजवाले हजामती करूं लागले आहेत. यांच्या हजामत करण्यानें आमच्या मनावर त्यांच्याविषयीं चांगला ग्रह झाला आहे हें आमचें भोळेपण होय.

( ब ) अंवसे पौर्णिमेस क्षौर निषेधः—सांगितला आहे. याचें कारण फारच थोड्या लोकांस माहीत असेल. या दोन तिथींस भरती ओहोटी नित्यापेक्षां विशेष जोराची असते. चंद्र सूर्याच्या आकर्षणानें समुद्रास भरती येते. या आकर्षणाचा मनुष्याच्या शरीरांतील रसांवरही परिणाम होतो. पूर्वोक्त २ तिथींस वेड्या लोकांस वेडाच्या मोठ्या जी

राच्या लहरी येत असतात, ही गोष्ट सर्व श्रुत आहे. भरतीच्या वेळीं जखमेंतून जोरानें रक्त वाहतें असें ह्मणतात. पूर्व काळच्या न्हावी लोकांजवळ हल्लींप्रमाणें तीक्ष्णधारेचे वस्तरे नसावे ह्मणून त्यांच्या वस्तऱ्यानें डोकें कापण्याचा विशेष संभव ह्मणून क्षौर केल्यानें जखमेंतून रक्त निघण्याचा प्रकार न घडावा यास्तव, या तिथींस क्षौराचा निषेध केला असावा.

पुढें पुढें तरः— भ्रातुश्चतुर्थी भगिनिश्चतुर्दशी ।
कुटुंबहानि क्षय अष्टमीच ॥

इत्यादि विधि प्रचारांत येऊं लागले. हें भोळेपण होय. हल्लीं चांगल्या पाण्याचे वस्तरे निघाले आहेत. तेव्हां ज्यांस हजामत करणेंच असेल त्यांनीं ती जपून केल्यास कोणत्याही तिथीस करण्यास हरकत नाहीं. अंवसे पौर्णिमेस हजामत करण्यास भिण्यापेक्षां घसडून उलट सुलट हजामत करण्यास भिणें अधिक शहाणपणाचें आहे. कारण या गोष्टींनीं डोळ्यांस व डोक्यास फार दुःख भोगावें लागतें. पंचांगांतून बऱ्याच तिथी क्षौरास वर्ज सांगितल्या आहेत परंतु अमुक तिथीस क्षौर केलाच पाहिजे असें कांहीं सांगितलें नाहीं ह्मणून. होतां होईपर्यंत उशीरानें हजामत करावी. 'न्हावी उठला केंस फुटला' असा प्रकार असतां कित्येक लोक दररोज हजामत करतात. रोज कापण्या इतके केंस फुटत नाहींत तरी, चामडी टुरमडून तिजवर वस्तरा घांसण्यास सांगणाऱ्यांची धन्य असो. स्वच्छतेकरितां केंस काढणारांनीं आंगाची चामडीही काढली तर बरें. कारण चामडी हाही मळच होय. कारण ज्या द्रव्याचे केश बनतात त्याच द्रव्याची चामडी व नखें बनतात असें शारीर शास्त्रावरून दिसतें. परंतु चामडी काढल्यानेंही शुद्धता होणार नाहीं. कारण,

'देह विटाळाचा गोळा । कैसा होतोसी सोंवळा' ॥

असें साधुवाक्य आहे, ह्मणून वेडेपणानें स्वच्छतेकरितां मुंडणाची

जरूरच आहे असें नाहीं. केंस राखूनही ते स्वच्छ ठेवितां येतील.

फोडाचें खवळ जितके वेळां काढावें, तितके वेळ तें शरीरांतं रसांचें पुन्हा बनतें. हें खवळ काढणें आरोग्य दृष्ट्या अहितकार होय. जसजसे केंस काढावे तसतसे ते अधिक येऊं लागतात. ३० र्षांच्या पुरुषाची शेंडी फार झालें तर २ फूट लांब असते. आतां ज डोक्याच्या भागावरील केसांची तो हजामत करतो, ते केस फार ज रानें वाढलेले असतात. प्रत्येक हजामतीस पाव इंच प्रमाणें महिन्या १ इंच केस वाढले. १२ महिन्याचे १ फूट व २ वर्षां पासून हजाम करतो असें धरलें तर, ३० वर्षां पर्यंत २८ फूट केंस वाढले असें हो परंतु शेंडी दोनच फूट असते. तेव्हां सर्व डोक्याभर जर तो केंस रा ता तर ते २ नच फूट राहिले असते तेव्हां ही २६ फूट केंसांची वा भराभर केंस काढल्यामुळें झाली. ह्या २६ फूट केंसांच्या वाढीस डो क्यांतील महत्वाचीं द्रव्यें खर्चीं पडलीं आहेत. हे २६ फूट केंस हजा मतीनें व्यर्थ गमावले इतकेंच नुकसान झालें आहे असें नाहीं. प्रत्ये हजामतीस डोक्यावरून वस्तरा फिरल्यामुळें डोळ्यांस त्रास झालेल आहे व प्रत्येक हजामतीस मंदोष्णवाहक केंस ( ज्यांची डोक्यास फार जरूर आहे ) काढल्यामुळें डोक्याच्या उष्णमानांत फरक पडलेल आहे. हजामती पासून किती नुकसान होतें व, केंस कसे व किती रा खावे इत्यादि गोष्टींचा खुलासा कळण्याची ज्यांस इच्छा असेल, त्यांनं माझा **शीर्षाच्छादन** नांवाचा विस्तृत निबंध पहावा.

( क ) **सुधारकांचें भोळेपणः**—सुधारक मोठ्या जोरानें विधव वपना बद्दल खेद प्रदर्शित करितात. परंतु चमत्काराची गोष्ट ही कीं त्यापेक्षां फार महत्वाच्या बालकेशवपन या गोष्टीकडे त्यांचें लक्ष गेल्याचें दिसत नाहीं. तें जावें ह्मणून लहान बालकांनीं सुधारकांस कं विता बद्ध केलेल्या अर्जाचा येथें उल्लेख करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

# बालकेश–वपन–विलाप.

## आर्या.

विधवांचें वपन पहा, करिती त्या वाढतात थोर जधीं
येती सुधारकांच्या नेत्रांतुनि अश्रुपूर फार तधीं १
त्यांच्या हृदया रुततीं कंटक पाहोनि निष्ठुरपणा हा
लेखीं वक्तृत्वींही करिती बहु धाय मोकलुनि हाहा ! २
ह्मणती " मूर्ख जनांनो ! विधवांचे केश कां ह्मणुनि हरिता
सुमनें खुडोनि वल्ली कांहो ही भणभणीतशी करिता ३
स्वाभाविक शोभाही त्यांची कां नावडे तुह्मां दुष्टां
दुःखींच डाग देतां काय ह्मणावें तुह्मांस पापिष्टां ४
चरचर वस्त्र्यानें जैं विधवेचा केशपाश उतरवितां
चित्तीं दया नसे मुळिं कां न करी दग्ध हस्त तो सविता ५
हरहर ! वैऱ्यालाही धीर न होईल घात करण्याचा
तो घात आप्त बांधव करिती निःशंक दीन विधवांचा " ६
इत्यादि विलापांच्या राशी लेखांत भाषणीं तैशा
पडल्या सुधारकांच्या, आह्मां बालांस वदवती कैशा ? ७
हें तों सुधारकांचें कृत्य भलें वा बुरें अह्मां नकळे
परि विधवा वपानें जसें चिग्न तसें बालवपनिं कां न वळे ? ८
आह्मां बाळांचा तो वाली नाहींच का कुणी जगतीं
विधवांस साह्य देते असति सुधारक अनंत दीनपती ९
रे रे सुधारकांनो विधवांचें साह्य ज्या परी करिता
अमुचें साह्य कराना कां आह्मां बालकांस हस्तरिता १०
विधवावपन विरोधी, व्हावा तुह्मांस कायदा वाटे
अमुच्या वपना विषयीं कां न तशी भावना मनीं दाटे ११
हें काय दुःख अमुचें विधवांहुनि क्षुद्रसें तुह्मां गमतें
वाटेल तरि पहावीं तुह्मीं धुंडोनि सकल बालमतें १२

द्वादश वरुषां नंतर विधवांची कापणी करी न्हावी
मुलगा द्वादशमासी* होय न तों काय ही दशा व्हावी ! १३
विधवा शोभेसाठीं रडती, दुःखामुळें अह्मी रडतों
मुसमुसति मात्र केवळ आह्मीं दीर्घस्वरेंच ओरडतों १४
तत्शीर्ष चर्म लवकर निरघटतें पांच सात खेपांत
कोमल चर्म घटाया वरुषें आह्मांस लागती सात १५
विधवा मोठ्या ह्मणुनी त्यांला तो वस्तरा बहु न बाधे
आह्मीं लहान ह्मणुनी तो आह्मां फार देतसे गोधे १६
डोक्यास वस्तऱ्यानें विधवेला जखम जाहली न दिसे
अमुच्या डोक्यांवरती कोठें तरि सानथोर माव असे १७
'न्हावी आला' ऐसें ऐकुनि वच उर बहूत धडधडतो
पळतां त्रेधा उडते परि आह्मीं त्वरित पकडले जातों १८
शेंडी धरूनि हातीं वांकवि मुंडी भुईकडे न्हावी
पितरांस दया नाहीं त्या निष्ठुर नाभिका कशी यावी ! १९
चरचर खरखर भरभर क्षुर निष्ठुर फिरवि नाभिक कठोर
चुरचुर डोळ्यांस सुटे मानेला लागती कळा थोर २०
टपटप टिपें भुईवर ढाळवि नयनांतुनी जधीं न्हाऊ
तेव्हां वडील देती धमकी ' रडतां मिळेल बहु खाऊ ! २१
काय करावें आह्मीं अमुचे धरितात हस्त जखडून
न्हाव्या करवीं अमुचे कोमल कच टाकितात खरडून २२

---

* चूडाकर्म द्विजातीनां सर्वेषा मेवधर्मतः
प्रथमेऽब्दे तृतीयेवा कर्तव्यं श्रुति चोदनात्

मनु अ. २ श्लो. ३५

**अर्थः**—ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या सर्वांना चूडाकरण संस्कार धर्मासाठीं प्रथम वर्षीं अथवा तृतीय वर्षीं ( कुलधर्मानुसार ) करावा, अशी श्रुतीची आज्ञा आहे.

दुःखें शिर हालवितां शिरतो सत्वरच वस्तरा त्यांत
येतें रक्त भळाभळ भोगावें लागतें अह्मां बहुत २३
दीन जनाच्या शिशुंचें क्षौर उठवि तनुवरी बहु शहारे
नापित मुलास सांगे ' जा झट पोरास तासुनी येरे ! २४
जल डोळ्यांतुनि काढी केंसांना लावण्या पुरे इतुकें
अश्रुजल पहायाला डोक्यांतुनि रक्त येतसे तितुकें २५
द्विजसुत अक्षर शिकण्या खरडीं वांसावया सुरू करिती
क्षुरकर्म शिकूं लागति नापितसुत आमुच्या शिरां वरती २६
चुरडिति, फाडिति, विघडिति, खरडीं त्यांची क्षिती न कांहींच
कापिति, टोंचिति, बोचिति अमुच्या शीर्षांचि ही दशा तीच २७
अमुच्या इच्छे वांचुनि अमुचि हजामत कुणीहि न करावी
ऐशी सुधारकांनो द्वाही लोकीं तुह्मीच पसरावी २८
जें कायद्यांत येइल मुलगा; इच्छेस त्याचिया आलें
तें तो करिल हजामत ऐसें आह्मांस पाहिजे झालें २९
इंग्लिश राज्यांत असे स्वातंत्र्याचा बहू सुळसुळाट
त्याची बंद असावी आह्मां बाळांस काय हो वाट ३०

साक्या.

मेंदू अमुचा थंड रहाया । केश शिरीं ते व्हावे
तेथलेच ते खरडुनि टाकिति । जणू साधिती दावे
किति हा मूर्खपणा । सुधारक सांगु अह्मी अपणा ॥ ३१
विश्वरां–आधीं दाद आमची । लावाहो लावाहो !
बाळांचें हें दुःख सकलही । भंगुनि लयास जावो
जागे व्हा काका । मारूं तुह्मांस किति हांका ॥ ३२

शार्दूल विक्रीडित.

बाळांची जर काळजी नच तुह्मीं केलीत काका तरी
खिस्ती होउनि केश राखुं अपुले हें वागता अंतरीं

वाली तो न अह्मां जरी गवसला स्वज्ञाति लोकांमधीं
वाली येशु वदूं ह्मणे " मजवळी बाळांस आणा अधीं " ३३

**श्लोक.**

बालकांवरि जुलूम अपार
होतसे, तरि करा प्रतिकार
कायदा गतधवां मग मागा
बालकार्य करण्या अधि लागा ३४
विनति ही असुची मनिं वागवा
कायदा शिशुहितास्तव मागवा
गतधवांहुनियां शिशुंची निगा
राखितां अधिक सौख्य तुह्मां वदा ३५

---

सदर्हु बाल—केश वपन—विलापांत पोरकटपणा झाला आहे असें कि त्येकांस वाटेल. पोराचे उद्गार पोरकटपणाचे निघाल्यास त्यांत आश्च मानावयास नको. परंतु जे विद्वान सुधारक, प्रौढ विधवांच्या केशवप संबंधीं फार दुःख दाखवितात, त्यांनीं कोंवळ्या अर्भकांच्या वपना बद्द चकार शब्दही काढूं नये ही फार दुःखाची गोष्ट आहे. पुष्कळ नुकसा नाकडे दुर्लक्ष करून क्षुल्लक नुकसानासाठीं तिळतिळ तुटणारा मनुष्य भोळा नव्हे तर कोण! सुधारकांनीं बालवपना बद्दल होईल तितकं लौकर चळवळ करणें अत्यंत जरूर आहे.

( ड ) भोळेपणाच्या कमालीचें एक उदाहरण, स्वतःची दाढी रण्यास शंका वाटणें हें होय. जर एखादा मनुष्य स्वतः दाढी क लागला तर आह्मीं त्यास ह्मणतों कायरे तूं न्हावी कीं काय ? ब्राह्मण केश काढणें बरें काय ? स्वतः दाढी करणें धर्म दृष्टीनें आह्मीं त्या समजतों, परंतु विशेष प्रसंगीं केशकर्तन आह्मीं स्वतः हातानें करीत मून त्यांत दोष मानीत नाहीं, आणि दाढी करण्यांत मात्र दोष मान हें आमचें भोळेपण अवर्णनीय होय !

## स्त्रीचे केश.

स्त्री जाती पासून भिन्नता दर्शविण्या करितां पुरुष प्रथम केश काढूं लागला परंतु स्त्रिया आपले केश तसेच राखीत पुढें:—

१ दंडा दाखल स्त्रियांचें मुंडण करूं लागले:—मनुस्मृतींत विधवेचें वपन करण्या विषयीं कोठे वचन आढळत नाहीं परंतु दंडा प्रीत्यर्थ त्याचा विधि सांगितला आहे.

यातु कन्यां प्रकुर्यात्स्त्रीसासद्यो मौंड्यमर्हति
अंगुल्योरेव वा छेदं खरेणोद्वहनं तथा

मनु. अ. ८ श्लो. ३७०

**अर्थः**—जर जाणती स्त्री ( योनींत बोटें घालून ) कन्येला क्षत करील तर तिचें तत्काळ मुंडन करावें, किंवा तिचीं बोटें तोडावीं अथवा तिला गाढवावर बसवून तिची धिंड काढावी.

व्यभिचारे स्त्रिया मौंड्यं । अधःशयन मेवच ॥

याज्ञवल्क्य.

यावरून व अन्य देशांतील अपराधी स्त्रियांचें वपन दंडादाखल करीत असल्याचें प्रसिद्ध आहे. ह्मणून स्त्रियांस दंडादाखल प्रथम वपन सुरू झालें असावें.

२ **दुःखामुळें केशोत्पाटनः**—दुःखांत केंस उपटण्याची प्रवृत्ति स्वाभाविक आहे. अत्यंत प्रिय भर्ता मृत झाल्यामुळें स्त्रिया डोक्याचे केंस उपटूं लागल्या असाव्या नंतर हें केशोत्पाटन, वपनाचे रूपांत आलें असावें. पुष्कळ स्त्रिया असा प्रकार करूं लागल्यामुळें, धर्मानें सर्व विधवा स्त्रियांस वपन सांगितलें असावें असें कित्येक ह्मणतात. मनुस्मृति सारख्या अत्यंत प्राचीन स्मृतींत विधवा वपनाबद्दल चकार शब्दही नाहीं. ही फार चमत्काराची गोष्ट आहे.

३ **शुद्धतेकरितां विधवेचें वपन करूं लागले**:—पुरुषास जे ४ आश्रम सांगितले आहेत त्यांत संन्यास हा शेवटला होय. संन्याशांत ४ प्र-

कार, त्यांत परमहंस शेवटला. परमहंस डोक्यावरील सर्व केश काढि तात. केंस काढण्यांत पवित्रता आहे ही गोष्ट पुरुषांप्रमाणें विधवा स्त्रियांसही लागू करण्यांत येत. नवरा जिवंत असेपर्यंत स्त्रीनें डोक्यावर संपूर्ण केश धारण करणें अत्यंत पवित्र व मंगल समजण्यांत येतें. परंतु नवरा मेल्यावर तिला वैराग्य स्थितींत ठेवावयाची असल्यामुळें, तिचे केंस काढणें ह्मणजे तिला सोंवळी करणें असें समजतात. यावरून शुद्धतेकरितां वपन सुरू झालें असावें असें कोणी ह्मणतात.

४ **विद्युत् संबंधानें वपनः**—विधवेची काम वासना जागृत होऊं नये ह्मणून फार काळजी घेण्यांत येते, तिच्या खाण्या पिण्याविषयीं जे निर्बंध केले आहेत त्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होते. केंसांत विद्युत् असते व ती घर्षणानें उद्भूत होते. न्हाऊन माखून सुरेख रीतीनें केंस विंचरून जर त्यांवर हात फिरवला तर नाजुक प्रकृतीच्या मनुष्यास चेतना होण्याचा संभव आहे. हा प्रकार विधवेकडून घडूं नये ह्मणून तिचे केश काढूं लागले असावे.

५ **सुंदरतेच्या संबंधानें**:—केंसांनीं शोभा येते. शोभेनें काम वासना जागृत होते. ती पूर्ण करण्यास तिचा नवरा नसल्यामुळें ती व्यभिचार करील ह्मणून केंस काढण्याचा प्रघात पडला.

६ **पोरकट कारणः**—विधवांस बहुधा पाककृत्य करावें लागतें. त्यांत गुंतवळ पडूं नये ह्मणून तिचें वपन करूं लागले असें कांहीं वाचाट मंडळी ह्मणते. याप्रमाणें विधवा वपनाबद्दल लोकांनीं भिन्न भिन्न कारणें सांगितलीं आहेत.

## स्त्रियांचीं केंसां संबंधीं भोळींमतें.

१ **वेणी व बुचडाः**—ब्राह्मणाच्या बायका वेण्या घालतात व इतर जातींत स्त्रिया बुचडे बांधितात. इतर जातींत बुचड्याचा प्रघात आहे ह्मणून तो ब्राह्मणीस त्याज्य वाटतो. बुचडा बांधणारी ब्राह्मणी सुधारलेली किंवा बाटी असावी असें समजणाऱ्या बहुत बायका आहेत.

हें भोळेपण होय. बुचडा ज्यांस सुंदर दिसतो त्यांनीं तो खुशाल वाळावा.

२ रें, **भांग न फिरविणें**:—मस्तकावरील केंसांचे दोन भाग करून ते डावी उजवीकडे विंचरून फिरवितात. यामध्यें जो डोक्याचा भाग दृष्टीस पडतो त्यास भांग ह्मणतात. नेहमीं डावी उजवीकडे केंस विंचरीत गेल्यानें भांग वाढत जातो व त्यामुळें मस्तकाची शोभा कमी होते ह्मणून, विश्वयोषितांत किंवा हलक्या मानलेल्या स्त्रियांत हा भांग बदलण्याचा प्रघात आहे, ह्मणून एखाद्या ब्राह्मणीनें भांग फिरविल्यास ती हलकट व छिचोर आहे असें समजण्यांत येतें. हें भोळेपण होय. शोभा संरक्षणा करितां त्या बिचारीस तो फिरविण्यास प्रतिबंध कां असावा ?

३ रें, **टक्कल शोभेचें चिन्हः**—वेणी चाबका सारखी दिसावी ह्मणून कित्येक बाया दांत ओंठ चावून, चडचडणें सोसून, घट्टवेणी घालून घेतात. याचा परिणाम त्यांस भोगावा लागतो, घट्टवेणीमुळें त्यांस टक्कल पडतें. बुचडा बांधणारणीस ब्राह्मणी हंसतात परंतु टक्कल पडलेलीस हंसत नाहींत, इतकेंच नव्हे तर कित्येकांस हें टक्कल शोभेचें चिन्ह वाटतें. पुरुषांत केंस वाढवणाऱ्यास हंसतात. घसडून उलटी सुलटी हजामत करून डोळ्यांस इजा करून घेणाऱ्यांस हंसत नाहींत. यावरून असें दिसतें कीं आरोग्य रक्षणाची कोणी हेळसांड केल्यास लोकांस कांहीं वाईट वाटत नाहीं. परंतु सुखा करितां किंवा शोभे करितां इतर जातींतील लोकां सारखें आचरण केल्यास तें लोकांस खपत नाहीं. काय हा चमत्कार ! उंच नीच जातींचे भेद दर्शविण्या करितां केश रचनेंत फरक ठेवणें इष्टच असेल तर, ते फरक असे असावे कीं, त्यांमुळें दुःख सोसण्याचा प्रसंग येऊं नये.

४ **पुरुषाच्या केंसांची घाण वाटणें**:—आमच्या स्त्रियांस आमचीं डोकीं—शेंडी शिवायकरून—सोललेल्या नारळाप्रमाणें पाहण्याची संवय झालेली असते. ह्मणून पुरुषाच्या डोक्यावर केंस वाढलेले पाहून

त्यांस ओकारी येते. केंस राखणाऱ्या युरोपियनादिकांच्या बायकांस किंवा मडमास हजामत करणाऱ्याच्या शेंडीचा गोंडा पाहून कळमळू येतें. तेव्हां घाण वाटणें किंवा बरें दिसणें हें संवयीवर आहे. असा विचार करून केंस राखणाऱ्या पुरुषास हंसूं नये.

५ गंगाभागीरथीः—केंस काढण्यांत पवित्रता आहे व विधवेचे केंस काढले ह्मणजे ती पवित्र होते. ती इतकी कीं, अत्यंत धवलफेनयुक्त पवित्र जी गंगानदी, पवित्रतेचें माहेरघर तिची उपमा तिला द्यावयाची. आतां मार्गांत जर ती भेटली तर कोठून अवदसा बोडकी पुढें आली ह्मणून संतापावयाचें ! परंतु एखादी छिनाल बाई अत्यंत पापी कां असेना तिच्या डोक्यावर केंस असले व ती गमनकालीं पुढें आली तर उत्तम शकून मानावयाचा ! काय हें भोळेपण !

भगीरथानें मोठ्या कष्टानें ज्या नदीचा शोध केला, तिला त्याचें नांव प्राप्त झालें. दीर्घ प्रयत्नी मनुष्यास भगीरथाची उपमा देतात. भगीरथाचे शोधल्या करून गंगेस भागीरथी नांव मिळालें. विधवेचें वपन होतांच तिला गंगाभागीरथी संज्ञा प्राप्त झाली. विधवा बिचारी लाचार असते ती मुकु मुकु रडते ह्मणून भागीरथीची भागुबाई झाली. महाप्रयत्नी भगीरथाला आपल्या नांवाचा, पुढें भागुबाई अर्थ होईल असें स्वप्नीं तरी आलें असेल काय !

६ केशच्छेदन भयः—सुवासिनी स्त्रियांस केशच्छेदन अत्यंत अमंगल वाटतें इतकेंच नव्हे तर, केंश कापण्याचा, पति मरणाशीं संबंध आहे असें त्यांच्या मनानें घेतलें आहे. विधवेचे केंस काढतात ह्मणून केंस काढणें अपवित्र, न्हावी केंस काढतो तो अपवित्र, केंस काढण्याला वस्तऱ्याचा उपयोग करितो ह्मणून वस्तरा अपवित्र, वस्तारा लोखंडाचा असतो ह्मणून लोखंड अपवित्र. लोखंडाचें भांडें स्त्रिया कधीं केंसांस लावणार नाहींत, लोखंडाची फणी फिरणें ह्मणजे विधवा होणें अशी आह्मांस ह्मणच पडून गेली आहे. दिवसा व विशेषतः रात्रीं आम

च्यांतील कर्मठ पुरुष त्यांत विशेषतः स्त्रिया, न्हावी किंवा वस्तरा यांचें नांव घेण्यास धजणार नाहींत. काय हें भोळेपण ! केंस कापण्याचा व पति मरणाचा संबंध आहे असें भोळेपणानें समजण्यांत आलें आहे. युरोपियनांच्या मडमा कार्यवशात् आपले केंस कापतात, त्यांचे नवरे त्यामुळें मरतात असें कांहीं नाहीं. वेणीदान प्रसंगीं केंस कापल्यानें जर पतीवर अरिष्ट येत नाहीं तर, इतर प्रसंगीं तें येईल असें कांहीं नाहीं ह्मणून, हें भोळेपण घालविलें पाहिजे. मडमांचें व्रत आमच्या स्त्रियांनीं घ्यावें असें मी ह्मणत नाहीं. परंतु, मनांतील भोळेपण काढून टाकावें इतकेंच सुचवितों.

सारांश मुंडणानें पवित्रता येते हा जो आमचा ग्रह झाला आहे. त्यांत फारच थोडा अर्थ आहे. संरक्षणार्थ केंसांची जरूर आहे ते निदान बोटभर तरी डोक्यावर नेहमीं असावे. केंस राखल्यास डोक्यावरून स्नान केल्यानें सर्दी होण्याचें भय असल्यास डोक्यावरून स्नान करूं नये. डोक्यावरून स्नान न करणारास बाटगा ह्मणतात. हें भोळेपण आहे. कारण शुचिर्भुत ब्राह्मणास त्याची स्त्री डोक्यावरून स्नान न करितां स्वयंपाक करून वाढते. तथापि आपण बाटलों असें त्यास वाटत नाहीं. मुंडणानें मन पवित्र होईलच असें नाहीं. 'आधीं मन मुंडा मन मुंडा । व्यर्थ मुंडिता मुंडा '॥ किंवा ' आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्यां भटां झाली धनी ॥ ' या साधु वचनाचें रहस्य ध्यानीं आणावें. मन पवित्र असल्यास मुंडन झालेंच पाहिजे असें नाहीं. विधवेचें वपन केल्यानें तिच्या हातून व्यभिचार घडणार नाहीं हा समज भोळेपणानें झाला आहे. केंसांचे टोप वापरणाऱ्या विधवांच्या गोष्टी पुष्कळांनीं ऐकिल्या असतील.

स्त्री पुरुषांत केश राखण्याविषयीं एक विलक्षण भोळेपणाचा असा समज आहे कीं " ज्यांस केश राखावयाचे असतील त्यांनीं ते नेहमीं तरी राखावे नाहींतर नेहमीं हजामत तरी करावी. कांहीं दिवस ह-

जामत करणें कांहीं दिवस केंस राखणें ही गोष्ट बरी नव्हे ' ? याचें उत्तर असें आहे कीं प्रत्येकाची आपल्या केंसांवर पूर्ण सत्ता आहे त्याला वाटेल त्याप्रमाणें तो त्यांची व्यवस्था करील. एखाद्यानें कधीं कोट घातला, कधीं अंगरखा घातला तर त्यास हमण्याचा आपणास अधिकार नाहीं, तो पाहिजे तेव्हां अंगरखा घालील, पाहिजे तेव्हां कोट घालील. अंगरखा किंवा कोट कायतें एकच नेहमीं घालीत रहा असें सांगणें जसें चमत्कारिक होईल तद्वत केंस राखणें तर नेहमीं राख हें सांगणें चमत्कारिकपणाचें दर्शक होणार आहे.

तेव्हां शुद्धतेकरितां, जाति पंथ भेद दर्शविण्याकरितां, सौंदर्याकरितां, आरोग्याकरितां, केश रचना भिन्न भिन्न प्रकारांनीं करणें योग्य असल्यास त्यांत शरीरास इजा न होईल या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन काय फेरफार करणें असतील ते करावे.

---

## वस्त्राच्छादन.

या प्रकरणांत वस्त्रांशिवाय इतर गोष्टींचा समावेश करणें अवश्य आहे. वस्त्रांचा इतिहास थोडक्यांत सांगतों ह्मणजे त्यांत भोळेपणा कसा शिरला आहे हें सहज कळेल.

१ मनुष्याच्या आद्य स्थितींत इंद्रियांचा उघडेपणा त्यास लज्जास्पद वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर, जैन धर्मांतील दिगंबर पंथाचे लोक दिगंबर वृत्ति हीच उत्तम अवस्था मानितात. वस्त्राच्छादन कृत्रिम आहे त्यामुळें तें त्यांस त्याज्य वाटतें.

२ नग्नावस्थेंत आपला देह सुंदर दिसावा ह्मणून त्यावर मनुष्य नानाप्रकारचे रंग लावितो. विद्वानांनीं शोध करून असें ठरविलें आहे कीं, इतर सर्व रंगांत लाल रंग अंग रंगविण्यास मनुष्यानें मोठ्या आवडीनें निवडून घेतलेला दिसतो. जसजसा मनुष्य सुधारत जातो तसतसें रंगणें पण कमी प्रमाणानें होऊं लागतें. स्त्रियांचें कुंकुं रंगलेपनाचा अवशेष

होय. सुशिक्षित स्त्रियांचें कुंकूं बारिक होत चाललें आहे. दा० आनंदीबाई टांचणीच्या बुध्यानें कुंकूं लावीत. सर्वांगावरचा लाल रंग आमच्या स्त्रियांच्या अदृष्टांवर अत्यंत सूक्ष्म रूपानें चमकत आहे. अदृष्टावरून हा पुढें अदृश्य होईल असा विद्वानाचा तर्क आहे.

३ रंगलेपना मागून धूलिका व रक्षालेपन प्रचारांत आलें. भस्मलेपनाचें मूळ यांतच आहे.

४ पुढें उट्या प्रचारांत आल्या. गंध हें उटीचाच अवशेष आहे. गंध शब्दाचा अर्थ वास असा आहे.

५ उट्यां मागून गोंदणें आलें. स्त्रिया आपल्या कपाळावर व हातांवर चंद्र, स्वस्तिकें इत्यादि गोंदितात. हें त्याचें अवशेष होय.

६ पुढें तप्तमुद्राधारण प्रचारांत आलें. वैष्णवांत गुरूपासून तप्तमुद्रा घेणें हें मोठ्या खर्चाचें काम होऊन बसलें आहे. प्रत्येक मुद्रेस ११६ रौप्यमुद्रा गुरूस द्याव्या लागतात.

७ पुढें शरीर विंधणें प्रचारांत आलें. नाकाकानांस भोकें पाडण्याचा जो प्रघात आहे तो विंधण्याचें अवशेष होय. जे लोक आपले नाक कान विंधीत नाहींत, त्यांस आह्मीं अविंध ह्मणजे यवन किंवा भ्रष्ट समजतों.

८ पुढें मनुष्य चर्मपरिधान करूं लागतो. मुंज्याच्या गळ्यांत हरणाच्या कातड्याचा तुकडा बांधलेला असतो. तें त्याचें अवशेष होय.

९ पुढें झाडांचे टाळे शरीरावर गुंडाळूं लागतो. नाटकांतील वनचर उर्फ विदूषक याच्या शरीरावर त्याचें अवशेष अद्याप आढळतें.

१० पुढें झाडांच्या सालींनीं देह आच्छादितो. वल्कलांचें पुराणादिकांत वर्णन आलेंच आहे. साली कुटल्या ह्मणजे त्यांचे जे तंतु तीं वल्कलें होत. जानवें हें त्याचें अवशेष होय.

११ उभ्या तंतूंत आडवे तंतु भरून, मनुष्यें जाडीं भरडीं वस्त्रें नेसूं लागलीं. आरंभीं तीं गोणपाटासारखीं जाड असून पुढें कौशल्यानें

मनुष्यें इतकीं बारीक वस्त्रें विणूं लागलीं कीं तीं पारदर्शक आहेत अ
भास होऊं लागला.

आद्य स्थितीपासून आतां पर्यंत ज्या ज्या अवस्थांतून आह्मीं सं
करीत आलों, त्या अवस्थांतले अवशेष थोड्या बहुत प्रमाणानें अ
अद्याप धर्माच्या नांवानें पाळीत आहों. इतकेंच नव्हे तर, या
शेषांत ह्मणजे कुंकू किंवा गंध किंवा जानवें यांतच आमचा
आहे असें भोळेपणानें आह्मांस वाटतें ' भटा तुझें वर्म काय तर क
साचें जानवें ' ही ह्मण सर्व श्रुत आहे. कुंकू किंवा गंध पूर्वी शों
व सुगंधाचा भाग होता परंतु, हल्लीं कुंकवावरून नवरा जिवंत अ
ण्याचा व गंधावरून हिंदु धर्माचा बोध होत आहे. गंध किंवा कुंकू
लावणाऱ्यास बाट्या ही संज्ञा मिळत आहे, किंवा सुतकी अर्थात अ
गळ किंवा भ्रष्ट या संज्ञेनेंही त्याचा निर्देश होत आहे.

## यांत भोळेपणा कसा मातला आहे पहा.

१. रंग लेपनादिकां विषयीं:--आद्यस्थितींत मनुष्य सशक्त
सल्यामुळें, वस्त्रांशिवाय कुत्र्या घोड्यां प्रमाणें थंडी वाऱ्याचें स
करण्यास समर्थ असतो. केवळ शोभेखातर रंगलेपना पासून विष
पर्यंत तो कृति करितो. या कृति सर्वांनीं अवश्य कराव्या ह्मणून
धर्माच्या बाबी होऊन बसतात. आतां प्रश्न असा कीं कुंकू किंवा
हे जर शोभेचे विषय तर त्यां बद्दल सक्ति कां ? शोभेखातर कं
कडीं, भिकबाळी इत्यादि अलंकार घालणें न घालणें ज्याच्या त्या
खुशीवर असणें बरें तद्वत, गंध किंवा कुंकू लावलेंच पाहिजे, नाहीं
तो भ्रष्ट होतो असा स्मृत्यादिकांत कितीसा आधार सांपडेल. हिंदु
र्माची ही निशाणी ह्मणावी तर मुक्तिफौजवाले ख्रिस्ती अस
यांचा स्वीकार करूं लागले, त्यांस अटकाव करण्याचें आपण
सामर्थ्य नाहीं. मग ही खूण काय कामाची ? पुन्हां ही खूण तरी कश
हवी ? यवना प्रमाणें आचार विचार असलेल्या मनुष्यासही, ही

असली ह्मणजे त्यास आह्मीं हिंदु समजणें हें आमचें भोळेपण नव्हे काय? मुद्रा धारण चालीचा एक उपयोग करून घेतां येणार आहे. प्रत्येक व्यक्तीचें नांव जर तप्तमुद्रेनें डोक्यावर काढलें तर इतरांस त्यापासून पुष्कळ फायदा होईल कारण तुमचें नांव काय हा प्रश्नच करण्याची मग जरूर राहणार नाहीं. नवऱ्याच्या डोक्यावर स्त्रीचें व स्त्रीच्या डोक्यावर नवऱ्याचें नांव गोंदल्या पासूनही पुष्कळ हित होईल. कित्येक लबाड मनुष्य आपल्या ख्रिस्ती धन्यास खुष करण्या करितां गंध पुसतात, व घरीं आल्यावर पुन्हा लावतात. त्यांच्या डोक्यावर हिंदु धर्माचा छाप बसल्यास लबाडी करण्यास त्यांस सवड राहणार नाहीं. पागोटें खराब होण्याची भीति नसल्यास गंध खुशाल लावावें परंतु, त्यांतच धर्म आहे हें वेडगळ पणाचें मत सोडावें.

२ चर्मपरिधानादिकां विषयीं:—सुधारलेल्या मनुष्यास थंडी वाऱ्या पासून बचाव करून घेण्यास आच्छादन करावें लागतें, वस्त्रें लज्जे करितां नव्हेत पण शोभा व संरक्षणा निमित्त प्रचारांत आलीं असें विद्वानांचें मत आहे.

वस्त्रें लज्जा रक्षणार्थ प्रचारांत आलीं असें वाटणें चुकीचें आहे. लज्जेचें तत्व मागून त्यांत शिरलें आहे. बाणकोटी बाल्या लंगोटी लावून उघडा बोडका घरांत वावरतो, त्याची लाज वाटत नाहीं परंतु घरचा यजमान धोतर नेसणारा असून त्यानें लंगोट लावल्यास त्यास पाहण्यास लाज वाटते! लाज ही मानीव आहे. डोळ्यांना ज्या प्रकारच्या गोष्टी पाहण्याची संवय असते तिच्या विरुद्ध प्रकार दृष्टीस पडल्यास लाज वाटते. बुरखा घेणारणीस उघडें तोंड ठेवणें लज्जेचें वाटतें, न घेणारणीस बुरखा घेणें लज्जास्पद वाटतें. तेव्हां लज्जा मानीव आहे ही गोष्ट सिद्ध झाली.

शीर्षाच्छादनांत किती भोळेपणा शिरला आहे पहा. स्त्रियांस पागोटीं किंवा टोप्या—बाळंतपणा खेरीज—घालण्याची कधीं जरूर पडली आहे काय?

कां पडेल त्यांचें स्वाभाविक आच्छादन जे केश, ते डोक्यावर असल्या त्यांस कृत्रिम आच्छादनाची जरूर नाहीं परंतु आह्मी पुरुष शहाणे। नव्हे, आह्मी सरंक्षक केसांची धांमून पुसून, साफ गुळगुळीत सोलले नारळाप्रमाणें हजामत करून शिर संरक्षणार्थ १००।१५० हात लां पागोटीं डोक्यावर ठेवितों. पागोट्याचें क्षेत्र जितकें मोठें तितका पणा अधिक असें आह्मांस वाटतें ! स्वाभाविक नाक कापून मे नाक लावण्यासारखा हा प्रकार नव्हे काय ? इंदियन लोक आ नाकाच्या बोंडशा मधोमध चिरून त्यांत लांकडांचा तुकडा बस सभ्यतेचें दर्शक समजतात. त्यांतलाच आमचा हा प्रकार होत नाहीं क सुशिक्षित गौरकाय अमेरिकन स्त्रिया स्वाभाविक दांत उपटून व दांत लावितात, ह्मणून त्यांस आह्मीं हंसतों परंतु, त्यांपेक्षां अ कृति अधिक हास्यास्पद होय. कृत्रिमदांत जबड्यांतून काढून स धुतां येतात ह्मणून त्यांमध्यें हा प्रघात पडला आहे. हजामत केले डोक्यावर रंगित पागोटें घातल्यास रंगांतील विषारी द्रव्यें डोक्यांत तात ह्मणून, ही चाल फार घातुक होय. अबबब ! ढालींसारखीं पा डोक्यावर घालण्याची तऱ्हा कां पडली असावी बरें. नारळ वि पडून डोकें न फुटावें याकरितां तर नसेलना ! पागोटें घालणारा स टोपी घालणारा असभ्य असा आमचा समज कां झाला ? हलकट टोपी घालतात, ह्मणून टोपी घालणें हलकटपणाचें होत असेल हलकट लोक जेवतात तेव्हां जेवणें हलकटपणाचें व्हावें, तसें नाहीं. हजामत करणें व वजनदार पागोटें घालणें सभ्यपणा व राखणें व टोपी घालणें असभ्यपणा आह्मांस वाटतो यावरून, शरी अपायकारक, बोजड, व खर्चाच्या वस्तूंत सभ्यपणा आहे असें आ भोळेपणानें वाटत आहे.

३ **सोंवळ्याविषयीं**:—हल्लीं आह्मांत सोंवळ्याविषयीं वि कल्पना आहे. ज्या प्रकारचें सोंवळें प्रस्तुत आह्मीं मानितों तसें

काळांत मानीत नव्हते. सुमंगळ शब्दाचें सोंवळें व अमंगल शब्दाचें ओंवळें रूप झालेलें आहे. स्नानानें स्वच्छ देह करून, स्वच्छ किंवा मंगल वस्त्रें नेसल्यानें मन प्रसन्न होतें व त्या स्थितींत भक्षिलेल्या अन्नाचें सुष्ट कार्य होतें. ह्मणून अन्न भक्षण प्रसंगीं सोंवळ्या वस्त्रांची जरूर आहे. बुद्धाच्या अहिंसा तत्वाचा आह्मीं आपल्या धर्मात समावेश केल्यावर, सोंवळें कडक रीतीनें अमलांत येऊं लागलें. शंकराचार्यांच्या काला पासून त्याचें रूप फारच उग्र झालें आहे. लोकरीचीं व रेशमाचीं वस्त्रें विशेष सोंवळीं मानण्याचा परिपाठ आहे. पीतांबर हें रेशमी वस्त्रांत उंच प्रतीचें आहे. याचा मूळ अर्थ पिंवळ्या रंगाचें वस्त्र असा आहे. मुगटा व कद हे यावनी शब्द होत. मुसलमानी अमदानी नंतर याचा आह्मीं स्वीकार केला आहे. आमच्या सोंवळ्यांत यवनी शब्द कसे शिरले याचा विचार मोठा गमतीचा होणार आहे. लोंकरीच्या वस्त्रांत धावळी प्रमुख आहे. मुगटा किंवा धावळी, जेवतांना नेसण्याची रीत उत्तम आहे कारण, जेवतांना शरीरांतील उष्णतामानांत फेरफार होतात. शरीरांतील उष्णतामानांत फेरफार होत असतां आंगावर मंदोष्ण वाहक वस्त्रें असावीं असें आरोग्य शास्त्रज्ञ सांगतात. कापूस व ताग शीघ्रोष्ण वाहक आहेत लोंकर व रेशीम मंदोष्ण वाहक होत. ह्मणून जेवतांना तीं वस्त्रें नेसणें उत्तम खरें. परंतु मूळ योजकाच्या उद्देशास आह्मीं हल्लीं दूर फेंकून दिलें आहे. लोंकर रेशीम, कापसापेक्षां गुणांनीं उत्कृष्ट असल्यामुळें प्रत्येक भोजन प्रसंगीं त्यांचीं वस्त्रें धुतलेलीं नसलीं तरी चालतील, असा प्रथम नियम केला असावा. त्याचा फायदा हल्लींची कर्मठ मंडळी फारच घेऊं लागली. दोन दोन चार चार महिनें सकाळ संध्याकाळ सोंवळ्यास रेशमी मुगटा लावणारी मंडळी आह्मांत कांहीं थोडी थोडकी नाहीं. खाणावळींतील कित्येक गृहस्थांच्या मुगट्यांस सहा सहा महिन्यांत तरी पाणी लागत असेल कीं नाहीं याची भ्रांतच !

जेवल्या नंतर हस्तप्रक्षालन केल्यावर ते हात नेसूंच्या मुगट्यासच पु
सण्यांत येत असल्यामुळें, तुपाच्या ओशटपणामुळें हे मुगटे इतके
कांहीं जलभेद्य होतात कीं यांच्या वाटरप्रुफ छत्र्या करण्याविषयं
एकानें सूचना केली आहे ! असल्या चिकटा पडलेल्या मुगट्यापेक्षा
ओंवळ्याचा स्पर्श झालेलें धौतवस्त्र उत्तम असतां, कर्मठांस तें पसं
पडत नाहीं. वस्तुतः हा वाणेरा मुगटा अमंगल, अर्थात ओंवळ्याचा
स्पर्श झालेल्या धौत वस्त्रापेक्षां ओंवळा होय परंतु ही गोष्ट भोळेप
णानें सत्य वाटत नाहीं. धौतवस्त्र जेवणास चालतें परंतु ओंवळ्या म
नुष्याचा त्याला स्पर्श होतांच तें ओंवळें होते हा समज भोळेपणानें
झाला आहे. केवळ स्पर्शानें तें अमंगल होणें अशक्य आहे. म्हणून
रामदास म्हणतातः---

ऐसें कैसेंरे सोंवळें ! शिवतां होतसे ओंवळें ! !

भोळेपणाची कमाल सांगावयाची ती पुढेंचआहे. ताग हा अत्यंत
अपवित्र मानलेला आहे. एखाद्या मुसलमानानें ताग पेरण्यास शेत
मागितलें असतां तें देण्यांत येत नाहीं कारण, ताग कुजत घातल्या
खेरीज त्याचा वाख निघत नाहीं व तो कुजत असतां अत्यंत दुर्गंधी
सुटते. म्हणून ताग अपवित्र मानण्यांत आला व तो उत्पन्न करूं देणें
पाप असें वाटूं लागलें. परंतु चमत्कार पहा काय तो. या तागाचे*
मुगटे विणून त्यांस पिंवळा रंग दिला कीं रेशमाप्रमाणें कित्येक दिवस
न धुतलेले हे मुगटे कर्मठ भोजन प्रसंगीं वापरतात. पीतांबर म्हणजे
पिंवळें वस्त्र असा अर्थ पूर्वी सांगितला आहे पीतांबर शुद्ध म्हणून
त्याच्या वर्णासारखा हा पिंवळा तागी मुगटाही शुद्ध असें वाटूं ला
गलें. सोनें पिंवळें असतें म्हणून पिंवळ्या रंगाच्या पितळेस सोनें

* विष्णु पुराणांत कलियुगाचें भविष्य कथन करीत असतां मोठा तिरस्कार दर्शवून कलियुगांत मनुष्य अगदीं नीचत्वास पावेल हें दाखविण्यासाठीं तो शाणीवस्त्र परिधान करील असें भाकीत केलें आहे हें शाणीवस्त्र म्हणजे तागाचेंच वस्त्र होय.

समजणारास लोक भोळा समजतात त्यांतलाच हा प्रकार नव्हे काय ? कापसाच्या किंवा तागाच्या वस्त्रांपेक्षां लोंकरीचीं किंवा रेशमी वस्त्रें जेवतांना नेसणें हा उत्तम पक्ष होय. तीं जितकीं शुद्ध ठेववतील तितकीं ठेवणें अगत्याचें आहे. आतां जोतिबा प्रभृतींनीं 'कीटक विष्ठेचें नेसला वसन' इत्यादि विधानांत रेशमी वस्त्राची थट्टा केली आहे हें त्यांचें अज्ञान होय. रेशीम ही किड्याची विष्ठा नव्हे, तर कोळ्याप्रमाणें त्यानें आपल्या आंगांतून काढलेले तंतु होत. शिंपल्यांतील किडे आपल्या आंगांतील बलसासारखा चिकट पदार्थ शरीरा बाहेर टाकतात त्याचीं मोत्यें बनतात. त्या मोत्यां इतकेंच रेशीम शुद्ध आहे. आतां एक रेशमी वस्त्र पैदा होण्यास लक्षावधि कीटकांची हत्या करावी लागते ह्मणून कर्मठांच्या दृष्टीनें पाहिल्यास रेशिम अपवित्र आहे असें ठरेल परंतु 'दिखल्या पातक' नाहीं तर कांहीं दोष नाहीं असा कर्मठांचा प्रघात आहे. रेशमी किडे मारले जातात ते त्यांच्या नजरेस पडत नाहींत ह्मणून रेशमाच्या शुद्धतेविषयीं त्यांच्या मनास दिक्कत वाटत नाहीं. लोंकर पशूच्या आंगावरील केंस होत. लोंकर व रेशीम हीं प्राणिज द्रव्यें आहेत ह्मणून तीं कापूस किंवा ताग या वनस्पतिज द्रव्यांहून कमी शुद्ध असावीं असें कित्येक अछड सुधारकांस वाटतें परंतु ही त्यांची चूक आहे. भेल्याच्या फुलांची घाण नकोहून अधिक आहे व एका मृगापासून कस्तुरी उत्पन्न होते तिच्या सुगंधास गंधराज हें नांव मिळालें आहे. ह्मणून वनस्पतिज द्रव्यांपेक्षां प्राणिज द्रव्यें अशुद्ध असलींच पाहिजेत, हें मत भोळेपणाचें. व्याघ्रांबर व मृगाजीन, सुंदरता व गुळगुळीतपणानें सुमंगल मानण्यांत आलीं आहेत. तसेंच शामीलेदर मानण्याकडे प्रवृत्ति झाली पाहिजे. डुकर घाणीत लोळतें, गाढव उकीरड्यावर असतें ह्मणून त्यांचें चर्म सोंवळ्यांतच नव्हे तर ओंवळ्यांतही स्पर्शास योग्य नाहीं असें मानलेलें आहे. धावळीची लोंकर चांगली कमावली असल्या-

मुळें ती शुद्ध वाटते परंतु तितक्या उत्कृष्ट लोंकरीचीं कांबळीं पवित्र वाटत नाहींत. कारण कांबळीं कुळवाडी वापरतात ते गलिच्छ असतात ह्मणून, कांबळ्यास अपवित्रता आली आहे. पण व्याघ्रमृगांच्या सकेश कातड्यानें सोंवळें वाटत नाहीं. मुंजाच्या गळ्यांत हरणाचें कातडें शुद्ध ह्मणून बांधलेलें असतें. परंतु अत्यंत पवित्र ब्राह्मणाचा केश किंवा नख किंवा दंत शरीरापासून पृथक होतांच त्याच्या स्पर्शानें सोंवळें बाटतें. हें भोळेपण होय. व्याघ्रांबरावर बसलेल्या ब्राह्मणास ओंवळ्या धौतवस्त्र नेसणाऱ्याच्या स्पर्शानें विटाळ झाला असें वाटतें हें भोळेपणाच आहे. हें भोळेपण काढून टाकण्यांत आलें पाहिजे कारण स्पर्श होतांच जें ओंवळें होतें तें सोंवळें कसलें ? हा रामदासांचा प्रश्न सयुक्तिक आहे. सोंवळें बाटण्याच्या कडेलोटाचें एक उदाहरण सांगतों. एक विधवाबाई स्नान करून, धौतवस्त्र नेसून, रामविजयाची पोथी वाचीत होती. तींत तिच्या मुलानें ह्मारांच्या नांवाची याद ठेविली होती. ह्मारांचीं नांवें तिच्या दृष्टीस पडतांच तिनें स्नान केलें. त्या नांवांनीं आपलें सोंवळें बाटलें असें तिला वाटलें. कारण ह्मार मृतगोमांस भक्षक व अत्यंत गलिच्छ असल्यामुळें त्यांचें नांव वाचणें अपवित्र असें तिच्या मनानें घेतल्यामुळेंच तिनें पुन्हां स्नान केलें ! याप्रमाणें सोंवळ्यांत भोळेपणाचा कळस झाला आहे. हल्लींच्या विचार युगांत कोणत्या वस्तूंनीं साक्षात देह अपवित्र होतो याचा विचार झाला पाहिजे व आमच्या आचारांतला भोळेपणा काढून टाकला पाहिजे.

**४ अमंगळांचे सोंवळ्यासंबंधीः**—कित्येक मांसभक्षक ब्राह्मणेत रांस हल्लीं ब्राह्मण होण्याची हुक्की आली आहे. ब्राह्मण श्रेष्ठ हा त्यांच्या मनावर ग्रह झालेला असल्यामुळें श्रेष्ठांचे आचारानें आपण गलिच्छपणा राखून ही श्रेष्ठ होऊं असें त्यांस वाटतें ! ब्राह्मण विधवां केश काढितात ह्मणून हे केश काढूं लागले, ब्राह्मण जानवीं घालतात

ह्मणून हे जानवीं घालूं लागले. ब्राह्मण सोंवळें लावितात ह्मणून हे सोंवळें लावूं लागले आहेत. परंतु ब्राह्मणांनीं मांस सोडलें तें मात्र यांच्यानें सोडवत नाहीं. एक सासू आपल्या सुनेस रागानें ह्मणाली 'अगे या मुकटांत सूत दिसतें हीं वंवळीं झालीं हीं टाक फयेंकून !' स्वच्छेतकरितां सोवळें करावयाचें असेल तर तें सर्वांग सुंदर असेल तरच अर्थ नाहीं तर कांहीं अर्थ नाहीं.

**५ परीट घडीच्या वस्त्रांविषयीं**:—सोहेर, सुतक, शिमगा इत्यादिकांतील अपवित्रपणानें वस्त्रें अमंगल होतात. तीं, स्वच्छ करण्याकरितां आह्मीं परटाकडे देतों. गोरें गोरें पान अशीं तो आमचीं वस्त्रें धुऊन आणतो. गंगेच्या फेणाप्रमाणें शुभ्र वस्त्रांत विटाळ असल्याविषयीं आह्मांस शंका येऊं नये परंतु शुद्धतेविषयीं आमचें मन इतकें साशंक आहे कीं त्या वस्त्रांवर शुद्धी करणाचा प्रयोग केल्या खेरीज तीं आह्मीं शुद्ध मानीत नाहीं.

**"घड्या कीं वस्त्रांच्या रजक कर धूताहि जितुक्या ।**
**जलस्पर्शें होती वरिल घडिनें शुद्ध तितुक्या" ॥**

परटाकडून धुऊन आलेल्या वस्त्रांच्या ५।१० वड्या पाटावर ठेवून कर्मठ त्यावर थोडेसे जलबिंदु टाकितात व त्या घड्या मग शुद्ध झाल्या असें मानितात. परटाचें काम घाण काढण्याचें आहे. तो मांस भक्षक आहे व 'राजाचें नेसणें तें परटाचें × × पुसणें' असा प्रकार असल्यामुळें व तो दुसऱ्यास कपडे वापरावयास देत असल्यानें स्पर्शजन्य रोग होण्याचा संभव आहे, ह्मणून त्याकडील स्वच्छ धुतलेलीं वस्त्रें जलसिंचनाशिवाय शुद्ध होत नाहींत असें त्यांस वाटतें, परंतु परीट घडल्या वस्त्रांत कर्मठांच्या दृष्टीनें अस्वच्छता असते ती जलसेचनानें निवर्णें अशक्य आहे, कपड्यांस चिस्तरी करण्यास परीट त्यांस खळ लाविती ही खळ खरकटच्या भाताइतकी अपवित्र आहे. खरकट्यावर पाय देणारा कर्मठ ब्राह्मण स्नानाशिवाय पवित्रता मानीत नाहीं. तेव्हां ख-

ळीनें चोपडलेलीं वस्त्रें प्रत्यक्ष जलांत धुतलीं पाहिजेत, त्यांखेरीज तीं
शुद्ध होणें नाहींत. परंतु इतका विचार कोण करीत बसला आहे. जे
प्रघात चालत आले आहेत ते डोळे मिटून चालवावयाचे हें प्रस्तु
तच्या आमच्या धर्माचें तत्व आहे. फार काय सांगावें, चांभाराकडून वा
हणा किंवा जोडे बांधून घेतल्यावर पाण्याचे २ थेंब त्यांवर टाकल्या खेरीज
तीं परिधानास पात्र नाहींत असें कर्मठांस वाटतें. आमच्या धर्माची
इमारत पवित्रतेच्या पायावर उभारली आहे हें या गोष्टीवरून चांगले
ध्यानांत येण्यासारखें आहे. जलसिंचनादि प्रघात आमच्या अज्ञा
वर्गांत असेच चालू राहण्यापासून एक फायदा आहे तो हाकीं आ
नाहीं उद्यां जर कोणी शोधक यांच्या मुळाचा तपास करूं लागेल ता
त्यास हे विधि ऐतिहासिक पुराव्यास फार उपयोगीं पडतील. ज
सिंचनादि विधींचे खरे हेतु विद्वानांनीं लोकांस समजावून सांगि
पाहिजेत, तिकडे कोणीच लक्ष देत नाहीं. गतानुगतिकत्वानें हे वि
आह्मीं धर्म ह्मणून पाळीत असतों. धर्म धर्म ह्मणून मोठाल्या बा
झोंकतों परंतु, धर्माचें वर्म आमच्या कर्मांत बहुतेक अदृश्य झाले
आहे. जलसिंचन विधिवरून इतकी गोष्ट सिद्ध होते कीं तिळमात्र अ
च्छतेस आह्मीं स्थल देऊं नये, परंतु उंट गिळून मुकुट गाळण्यासार
आह्मी प्रकार करितों. कित्येक कर्मठ जलसिंचनानें पवित्रपणा अ
ल्याचें मानितात, त्यांच्या आंगावरील व बिच्छान्यांतील वस्त्रें इत
घाणेरीं असतात कीं, तीं पाहतांच कळमळूं लागतें. पांढरेपणांत स्वच्छ
आहे असें समजून आह्मीं ब्राह्मण पांढरीं वस्त्रें नेसतों. पांढरपेशा
नांव पांढऱ्या वस्त्रांवरून लोकांस प्राप्त झालें आहे. ह्मणून आपल
कल्याणाची इच्छा असेल त्या ब्राह्मणानें किंवा ब्राह्मण होऊं पाहण
ऱ्यांनीं अत्यंत शुद्धतेकडे लक्ष द्यावें. ज्या गोष्टींनीं खरोखरीच शरी
अपवित्र होईल त्या गोष्टींचीच विशेष काळजी बाळगावी. क्षुद्र
गोष्टींत व्यर्थ काल गमावून महत्वाच्या गोष्टी संपादन करण्यास मो
पणानें अंतर करूं नये.

६ स्पर्शास्पर्शः—केवळ सोंवळ्यांतच आह्मीं अत्याचार करतों असें नव्हे तर ओंवळ्यांतही तो आह्माकडून होतो. याचें मूळ शोधूं लागल्यास आरोग्यरक्षणार्थच पूर्वीच्या स्मृतिकारांनीं याविषयीं निर्बंध केले आहेत असें ध्यानांत येईल. अन्य जातींतच नव्हे परंतु सजाति-याच्या परिधान वस्त्राविषयीं मनु काय ह्मणतो तें पहा:—

**उपानहौच वासश्च । धृतमन्यैर्न धारयेत् ॥**
**उपवीतमलंकारं । स्रजं करकमेवच ॥**

अ. ४ श्लोक ६६

**अर्थः**—उपानह, वस्त्र, यज्ञोपवीत, अलंकार, पुष्पमाला आणि कमंडलू हे दुसऱ्यानें धारण केलेले ते आपण धारण करूं नयेत.

हा निषेध फार विचारानें केलेला आहे. अल्लड सुधारकांस यांत कांहीं अर्थ नाहीं असें वाटतें परंतु ही त्यांची चूक होय. मनुष्याच्या आंगांतून घर्म व अस्वच्छ द्रव्यें प्रतिक्षणीं निघत असतात, तीं वस्त्रांस चिकटतात यामुळें दुसऱ्यानें परिधान केलेलीं वस्त्रें आपण वापरल्यास त्यांतील अशुद्ध द्रव्यें आपल्या शरीरास चिकटण्याचा संभव आहे ह्मणून वरील श्लोकांतील मनुवचनान्वयें चालण्याचा परिपाठ ठेवावा. खाणावळींत दुसऱ्याचे मुगटे नेसून आपणास उपदंश विकाराची बाधा करून घेणारे बहुत लोक आढळले आहेत, त्यांनीं वरील श्लोकानुरूप वर्तन ठेवावें. ओंवळ्यानीं जेवावयास बसण्यांत कित्येकांस सुधारणा वाटते परंतु जर हीं वस्त्रें स्वच्छ धुतलेलीं नसतील, गलिच्छ असतील तर त्यांस वाटणारी सुधारणा, कुधारणा होय. चोर बाजारांत मोठ्या किंमतीचीं, लोकांनीं वापरलेलीं वस्त्रें अल्प किंमतीस मिळतात ह्मणून तीं वापरण्यास विकत घेऊं नयेत. अशा वस्त्रांपासून रोग पसरल्याचीं उदाहरणें निदर्शनास आलीं आहेत. आगबोट, आगगाडी वगैरे वाहनां-तून प्रवाशांची फार गर्दी असते, त्यांत पुष्कळ अमंगल लोक असतात त्यांच्या स्पर्शानें विटाळ होतो असें मानलें आहे तें शहाणपणाचें आहे.

विटाळ पाळण्याची जुन्या लोकांची पद्धती अलड सुधारकांस पसंत नाहीं हा प्रकार बरा नव्हे. प्रवासांतील कपडे साफ धुणें अत्यंत हितकर आहे. वस्त्रांच्या संबंधानें कर्मठ लोक जे नियम पाळतात ते बहुतेक विचाराचे आहेत. परंतु कित्येक गोष्टींत त्यांनीं भोळेपणाची कमाल करून सोडली आहे. कोकणांत म्हाराची सावली आंगावर पडली असतां सचैल स्नान करण्याचा प्रघात आहे हा प्रघात कां पडला याचें कारण फारच थोड्यांस कळत असेल. मेलेल्या गुरांढोरांचें, विशेषतः गाईचें मांस हे लोक खात असल्यामुळें यांच्या सावलीस उभें राहूं नये असा प्रघात पडला. वस्तुतः सावली हा कांहीं भावरूप पदार्थ नव्हे. सावली म्हणजे प्रकाशाचा अभाव होय. सावलींत कांहीं विटाळ भरलेला नाहीं परंतु निर्बंध करणारांचें धोरण असें दिसतें कीं म्हारादिकांशीं, सावली पडेल इतकें नजिक जाऊं नये. भर दोन प्रहरीं ही सावली वीतभरही पडत नाहीं. सायंकाळीं सूर्य मावळतांना १०० हातांहून अधिक लांब सावली पडण्याचा संभव आहे. तसेंच पश्चिमेकडे सूर्य असतां पूर्वेकडे जरी १०० हात सावली पडली तरी पश्चिमेकडे व उत्तर दक्षिणेकडे ती मुळींच नसते म्हणून सूर्यास्तसमयीं भोळे लोक म्हारापासून पूर्वेकडील बाजूची सावली टाळण्यास १०० हातांचा हिसका घेतील, परंतु पश्चिमेस व उत्तर दक्षिणेस अगदीं जवळून जातील परंतु आपण भ्रष्ट झालों असें त्यांस वाटणार नाहीं. सावलींत दोष आहे हा त्यांचा समज अत्यंत भोळेपणानें झालेला आहे. म्हाराच्या सावलीचें बंड कोकणांत फार, पेशवाईंत पुण्यांतील रस्त्यांत म्हार चालूं लागल्यास त्यास आपली थुंकी रस्त्यावर न पडावी म्हणून कमरेला मडकें बांधावें लागत असे. गुजराथ प्रांतांत म्हाराच्या सावलीचा कोकणाप्रमाणें विटाळ कडक नाहीं. म्हाराची सावली पडल्यास—नव्हे त्याचा प्रत्यक्ष स्पर्श झाल्यास दोन पाण्याचे शितोडे आंगावर घेतले कीं विटाळ गेला असें समजण्यांत येतें. जेथें पाण्याचे थेंब मिळण्याचा संभव नसतो तेथें मुसलमानास शिवल्यानें म्हारा

च्या स्पर्शाचा विटाळ नष्ट होतो! कां आहे कीं नाहीं कमाल! रोगानें रोग हटविण्याचा जसा वैद्यकांत एक प्रकार आहे तसा विटाळानें विटाळ नाहींसा करण्याचा प्रचात आमच्या मुर्जर बांधवांत आहे. कोणत्या ऋषीनें हा प्रचात सुरु केला कोणास ठाऊक! आह्मा दक्षणी लोकांत ह्मारादिकांच्या सावलीनें सचैल स्नान करणारे केवळ जुन्या मताचे कर्मठच लोक आहेत असें नाहीं, तर विश्वविद्यालयांतील अत्युच्च प्रतीचें ज्यांस शिक्षण मिळून २।४ उपपदें ही ज्यांनीं लटकावलेलीं असतात, ज्यांचीं मनें विद्येनें संस्कृत झालेलीं असल्यामुळें धर्माचें रहस्य ज्यांस कळतें असें लोक समजतात, असे कित्येक लोक रूढ चालीस अनन्यभावें शरण जाऊन ह्माराची सावली पडली असतां स्नान करून शुद्ध झालों असें मानितात. हा चमत्कार नव्हे काय? जुन्या लोकांस खूश करण्याकरितां किंवा अजून या गोष्टीचा त्यांनीं विचारच केला नाहीं ह्मणून सावलींत ते दोष मानितात कीं काय नकळे. हे विद्वान कर्मठ, ह्मारास आपल्या दाराशीं येऊं देणार नाहींत परंतु गौरकायांचा हस्त स्पर्श करण्यांत यांस मोठें भूषण वाटतें. ह्मार कसा झाला तरी शेंडीवाला असल्यामुळें हिंदु आहे. मेलेल्या गाईचेंच कायतें तो मांस खात आहे, परंतु गौरकाय हिंदु नव्हत, व जिवंत कापलेल्या गाईचें मांस खाणारे आहेत ह्मणून ह्मारापेक्षां त्यांस अधिक दोषी मानलें पाहिजे परंतु, ते आमचे राजकर्ते असल्यामुळें त्यांस विटाळ नाहीं व ह्मार आमचा बंदा गुलाम असल्यामुळें गौरकायांहून तो अधिक दोषी असें भोळेपणानें आह्मीं मानतों. ह्मारास आह्मी आपल्या घरांत घेत नाहीं परंतु तो ख्रिस्ती झाला ह्मणजे आमच्या घरांत येण्यास आमची हरकत नसते. ह्मणून **वलंगकरादि** विचारी महार हिंदु पुढाऱ्यांस प्रश्न करितात कीं 'हिंदु धर्मांत आह्मांस शुद्ध करून घेण्याची ताकद नाहीं, ख्रिस्ती धर्मांत ती आहे, असें तुह्मीं आपल्या आचरणावरून भासविता तर आतां असें स्पष्ट ह्मणाना कीं अहो महारांनो प्रतिष्ठितपणें आह्मास

स्पर्श करावयाचा असेल तर तुह्मी ख्रिस्ती व्हा ! ' बिचाऱ्या विधवेचे वपन केलेलें नसेल तर तिला सोंवळी कधीं करिता अशी आमची सारखी टकळी चाललेली असते, बरें एकदांची सोंवळी केली ह्मणजे त्यांत तिचें मुखावलोकन आह्मी अशुभ मानितों ! आतां हीच विधवा केश वाढवून कसब करूं लागेल तर या जन्मसुवाशिणीचें मार्गांत झालेलें दर्शन आह्मीं शुभ मानितों ह्मणजे असें ह्मणानाकीं विधवेनें धर्मांत सांगितलेले आचार पाळणें वाईट व निंद्य कृत्य आचारणें उत्तम असें भोळे किंवा बावळेपणानें मानण्याची आमची चाल आहे. अंत्यज छाया व विधवा मुख दर्शन या दोन्ही गोष्टींत आमच्या भोळेपणाचा अगदीं कळस झालेला आहे. अहो आमच्या सूज्ञ ऋषि पूर्वजांनो ! तुह्मी आचार कोणत्या हेतूनें प्रचारांत आणलेत आणि आह्मीं तुमच्या मूर्ख वंशजांनीं त्यांची कशी हेटाळणी चालविली आहे. पहा !

विटाळाच्याकडे लोटाचें उदाहरण अजून पुढेंच आहे. विटाळाचा अतिरेक चांडाळांत आहे ही गोष्ट विटाळ चांडाळ शब्दावरून स्पष्ट कळण्यासारखी आहे. महार मांगादी जाती अत्यंत अपवित्र समजून त्यांस आह्मी अनामिक-ह्मणजे ज्यांचें नांव उच्चारणें अयोग्य असें समजतों. आतां या जाती चांडाळवर्गी आहेत यांचा केवळ स्पर्श नव्हे तर यांची सावली आह्मी अपवित्र मानिली या कल्पनेच्या भोळेपणाचा कसा कडेलोट झाला आहे पहा. ह्मार गोमांस खातो त्याच्या सावलीस आह्मी शिवत नाहीं परंतु वाघ गाय खातो, त्याचें चामडें आह्मी शुद्ध समजून त्याच्या आसनावर खुशाल गायत्री मंत्राचा जप करीत बसतों. मृदुत्वामुळें जर व्याघ्रांबर शुद्ध, तर जिचें अस्तित्व भावरूप नव्हे ती महाराची सावली त्याहून शुद्ध मानली पाहिजे. गोमांस भक्षक ह्मार वगैरे काळे ह्मणून अपवित्र परंतु वाघ व इंग्रज सुंदर व राजपुरुष ह्मणून पवित्र समजून त्यांच्या स्पर्शांत दोष नाहीं असें वाटूं लागलें !

काळेपणांत दोष आहे या कल्पनेच्या भोळेपणाचा कडेलोट कसा

झाला आहे पहा. पृथ्वीची छाया चंद्रावर पडून त्यास ग्रहण लागतें. त्या छायेस राहू समजतात. ही छाया काळी व चंद्रास लोपविणारी, अर्थात् भक्षणारी असल्यामुळें हिजकडे चांडालत्व आलें. चांडालाच्या सावलीत विटाळ आहे असें आमच्या मनानें घेतल्यामुळें ग्रहणकाल हा दोषकाल आह्मी समजूं लागलों. आकाशांतील चंद्रावर छाया पडली असतां जिची छाया त्यावर पडते ती पृथ्वी दोषयुक्त कशी झाली ! छाया कांहीं पृथ्वीवर पडत नाहीं परंतु पृथ्वीवरून पडलेली छाया दिसते ह्मणून दोष मानण्यांत आला असावा, किंवा ज्या चंद्रास राहू शिवला त्या विटाळलेल्या चंद्राचा प्रकाश पृथ्वीवर पडत असल्यामुळें पृथ्वी बाटली असें वाटूं लागलें. हा बाट केवळ आह्मा लोकांतच विशेष मानला आहे. या बाटानें आमचीं शरीरें व त्यांवरील वस्त्रें बाटतात असेंच केवळ नव्हे, तर दांड्यांवर वाळत असलेलीं वस्त्रें ग्रहण कालांत बाटतात असें आह्मी केवळ कर्मठच नव्हे, परंतु विश्वविद्यालयांत ग्रहणाची खरी कल्पना जाणणारे विद्वान लोकही समजतात. व दांड्यांवरील वस्त्रें बाटूं नयेत ह्मणून वेधकालापूर्वीं त्यांवर एक तुळशीचें पान घालून ठेविलें ह्मणजे त्यांस विटाळ बाधत नाहीं असें मानतों. हवा शुद्धीचा तुळशीचा धर्म आहे परंतु इवल्याशा पानांत वस्त्रांस चांडालाचा विटाळ होईल तो टाळण्याचें सामर्थ्य आह्मीं मानलें आहे. सगळेंच सूक्ष्म. विटाळ सुक्ष्म, तुळशीपत्रास शुद्धी करण्याची शक्ति सूक्ष्म ! सूक्ष्म दोषास सूक्ष्म शुद्धि आह्मीं ठरविली. रस्त्यांत फिरणाऱ्याच्या नाकांत एका गृहस्थाच्या पक्वान्नाचा वास गेला. तो वास त्यानें उपभोगिल्याबद्दल त्यावर फिर्याद झाली. तेव्हां न्याय करणाऱ्यानें सोन्याचीं नाणीं वासाच्या मालकाच्या कानांशीं जोरानें वाजवावीं व त्या नादानें वासाच्या नुकसानीची भरपाई करून द्यावी असें ठरविलें. त्यांतलाच हा प्रकार होय ! विद्वानानीं लोकांचें भोळेपण काढण्यास झटलें पाहिजे. खरोखर विटाळ कशांत आहे व त्याचा प्रतिकार करणें कितीं जरूर आहे हेंही लोकांस दाखविलें पाहिजे.

## आंग धुणें.

मानवेतर प्राण्यांपेक्षां मनुष्याच्या आंगाची कातडी फारच पातळ असल्यामुळें, अस्वच्छतेचे परिणाम तिजवर विशेष होतात ह्मणून मनुष्यास स्नानाची विशेष जरूर वाटूं लागली. जगांत कित्येक लोक कित्येक वर्षांनीं, कांहीं कित्येक महिन्यांनीं, कांहीं कित्येक आठवड्यांनीं स्नान करणारे आहेत. थंड देशापेक्षां हिंदुस्थानासारख्या उष्ण देशांत दररोज स्नानाची जरूर आहे अत्यंत पवित्र ब्राह्मण त्रिकाल स्नान करितात. स्नानाचा संबंध शरीर शुद्धीकडे आहे, परंतु मळ हेंच पाप असा समज असल्यामुळें स्नानास **अघमर्षण** ह्मणजे पाप नाहींसें करणारें अशी संज्ञा मिळाली. शुद्धतेच्या पायावर आमच्या धर्माची इमारत उभारली आहे ही गोष्ट स्नान प्रकरणावरूनच लक्षांत येण्यासारखी आहे. स्नान याचा आंग धुणें असा अर्थ आहे शुद्धतेकरितां विवक्षित काळीं व विवक्षित प्रकारांत सर्वांग धुवावें लागतें कधीं कांहीं नियमित अवयव धुतल्यानें ही चालतें शौचास जाऊन आल्यानंतर हातापायांस माती लावून ते धुण्याचा प्रकार गुरुचरित्रांत विस्तारानें वर्णिला आहे तो असाः—

> **आंवळ्याएवढे गोळे करावे । लिंगस्थानीं एक लावावें**
> **अपानद्वारीं पांच स्वभावें । एकैक हस्तांशीं तीन सवें. ४२**
> **एकैक पायाशीं सात गोळे । मृतिका लावावी सकळा इ०**
>
> अ. ३६

या गोष्टी शुद्धतेच्या संबंधानें सांगितल्या आहेत हें उघड आहे. शुद्धता आपणास पाहिजे आहे, परंतु तिच्या अतिरेकांत व्यर्थ काळ गमावणें योग्य नव्हे. पाय धुण्याबद्दल इतका बारीक विचार झालेला आहे कीं त्यावर एक स्वतंत्र निबंध लिहितां येईल, पायांस लावण्यास माती कोठून आणावी, तिच्या केवढ्या गोळ्या कराव्या, त्या किती कराव्या, ब्राह्मणानें किती लावाव्या, शूद्रानें किती लावाव्या, आजारी असतां किती लावाव्या, प्रवासांत असतां किती लावाव्या, अशा वा

ठीक बारीक गोष्टींचा अगदीं कीस काढलेला आहे. हात धुण्याबद्दल असेच फार सूक्ष्म नियम केलेले आहेत. चूळ भरण्यासंबंधें कसे नियम आहेत पहा.—

शौच झालिया नंतर । चूळ भरावी येणे परी ॥
ब्राह्मण आठ भरी । सहा भरावे क्षत्रियांनीं ॥ ४९ ॥
वैश्यें चार शूद्रें दोन वेळां । येणे विधी भरा चुळा ॥
शुद्ध स्थानीं बसोनि निर्मळा । कुळ दैवत स्मरावें ॥ ५० ॥
गु. च अ. ३६

आतां दंतधावना संबंधानें विधि निषेध पहाः—

आतां सांगेन विधान । करावया दंत धावन ॥
समस्त पर्वणी त्यजून । प्रतिपदा षष्ठी वर्जावी ॥ ७० ॥
न करावें नवमी द्वादशीसीं । शन्यर्क मंगळवारेसीं ॥
श्राद्ध काळीं विवाह दिवशीं । करूं नये दंत धावन ॥ ७१ ॥
कंटक वृक्ष शाखेशीं । ताड माड केतकीसीं ॥
खर्जूर नारिकेल शाखेशीं । केल्या जन्म चांडाल योनी ॥ ७२ ॥
खदिर करंज अघाडेसीं । औदुंबरार्क वटशाखेसीं ॥
अथवा वृक्ष करवंदेसीं । पुण्य वृक्ष ऐका तुह्मी ॥ ७३ ॥

आतां दंत धावनास कोणी किती लांबीच्या काड्या घ्याव्या हें सांगतातः—

विप्रें द्वादशांगुळेशीं । नवांगुळें क्षत्रियाशीं ॥
अष्टांगुळें वैश्य शूद्रासीं । दंत धावन काष्ट आणावें ॥ ७४ ॥
दंत धावन काष्ठाशीं । तोडितां ह्मणावें मंत्राशीं ॥
आयुर्बल नाम परियेशीं । ह्मणोनि काष्ठ तोडावें ॥ ७५ ॥

आतां दंत धावन काष्ठ कोणत्या दिशेस टाकावें तें सांगतात.

दंत धावन करोनि ऐसें । काष्ठ टाकावें नैऋत्यदिशे ॥
चूळ भरोनि द्वादश । द्विराचमन करावें ॥ ७६ ॥
गु. अ. ३२

दांत धुऊन, नैऋत्य दिशेस काष्ठ टाकून, १२ चूळ भरून, दोन आचमनें घेतलीं, ह्मणजे दंतधावनविधि पुरा झाला. अबबब ! काय ही यातायात. दंतधावनास कित्येक तिथी वर्ज केल्या आहेत त्या कां, हें कोडें सोडवणें, तसेंच ताडमाडांच्या शाखेशीं दंतधावन केल्यास चांडाळ योनींत जन्म होईल ह्मणून जी धमकी दिली आहे, तिचा उद्देश शोधून काढणें, हीं दोन्हीं कामें सारखींच कठिण आहेत. रिकाम्यावेळांत कांहीं तरी हे नियम करून ठेविले आहेत, असेंच पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे काय असेल तें असो, परंतु या सर्व खटाटोपींचा अंतर्हेतु केवळ देहशुद्धि हाच आहे आणि तो हेतु, काळाचा व शक्तीचा फारसा व्यय न करितां अल्पांत साधतां येण्यासारखा आहे. ५० वेळां पायांस माती लावणें काय आणि १ वेळ लावणें काय शुद्धतेच्या दृष्टीनें सारखेंच आहे. शौचास जाऊन आल्यावर पायांस मळ ( विष्ठा ) चिकटलेला असतो असें कांहीं नाहीं. बरें कदाचित् संशय असलाच तर, एकवेळ बरीचशी माती घेऊन ती पायांस घासवांसून लावून पाय धुऊन टाकावे ह्मणजे झालें. चळ लागलेल्या मनुष्याप्रमाणें पुन्हां पुन्हां पायांस माती लाऊन ते धूत बसणें ही भोळेपणाची कमाल होय. त्याच प्रमाणें चूळ भरण्याची ही गोष्ट समजावी. उंट गिळून मुर्कुट गाळण्याचा प्रकार या हस्तपाद प्रक्षालनांत दिसून येतो. कसा ह्मणाल तर पहा शौचाप्रीत्यर्थ पायांस २१ वेळा निदान एकवेळ माती लावणारास, नरकगंधीचा किती किळस असला पाहिजे, परंतु त्याचा तितका किळस मानण्यांत येत नाहीं. ओटीवर किंवा *गल्लींत आपल्या मुलांस मलविसर्जन करण्यास बसविणारी

* मुंबई सारख्या मोठ्या शहरांतील रस्त्यांत लोक लघुशंका करितांना आढळतात. या त्यांच्या कृत्यानें लज्जेचा व आरोग्य रक्षणाचा एकाच वेळीं भंग होत असतो. पाहिजे तितक्या मुतऱ्या बांधल्या न गेल्यामुळें लोकांस निरुपायास्तव भर रस्त्यांत हा विधि उरकणे भाग पडतें ही म्युनिसि ( मनुष्य ! ) पालटीची कसूर होय.

आईबापें या मुंबईंत शेंकडों आढळतील. आपल्या जागेंत आपल्या मुलांस घाण करूं देण्याचा आपला हक्कच आहे असें त्यांस वाटतें !

शौचास नेलेला तांब्या बाहेरून लकलकीत घांसून आंत बुळबुळीत ठेवणारे पुष्कळ लोक आढळतात त्यां पेक्षां, बाह्यदेहाच्या शुद्धीकडे फार लक्ष देऊन चित्त दूषित ठेवणारे अधिक लोक आहेत !

**नासिका क्षालनः**—हात पाय स्वच्छ धुऊन निवण्या करितां ज्यांनीं फार काळजी बाळगल्याचें दिसतें, त्यांणीं नासिका क्षालनाचा विधि सांगितला नाहीं याचें फार आश्चर्य वाटतें. आधुनिक आरोग्य शास्त्रवेत्ते ह्मणतात कीं, प्रत्यहीं एकवेळ तरी नाकाचा अंतर्भाग धुतला पाहिजे. कारण नाकांतील मळ सुकून त्याच्या ज्या खरपुड्या बनतात त्यांवर, श्वास आंत घेते वेळचा वायु लागून तो दुषित होऊन फुफ्फुसांत शिरतो, ह्मणून नाक धुतलें पाहिजे. कित्येकांस नाकांतील खरपुड्या बोटानें उकरून काढण्याची सवय असते तीमुळें नाकास इजा होते. नाक धुण्याचा सुखद प्रकार असा आहे कीं, एका उथळ पात्रांत पाणी घेऊन त्यांत नाक बुडवावें व हलकेंच, पात्रांतील पाणी श्वासानें वर उचलून घेऊन लागलेंच खालीं सोडावें. दोन तीन वेळ असा प्रकार केला ह्मणजे झालें. बोटानें खरपुड्या काढण्यापेक्षां त्या पाण्याच्या ओलाव्यानें

---

( मागिल पानावरून टीप )

**'न मूत्रं पथि कुर्वीत'** मनु. ४. ४५ या वाक्यावरून आमच्या आर्यधर्मांत, रस्त्यांत मूत्रोत्सर्गाचा निषेध सांगितला आहे व तो प्रस्तुत आरोग्य रक्षणास उचित असाच आहे. उभ्यानें मूत्रोत्सर्ग करूं नये असें मनु म्हणतो हा विधि मुतऱ्या नसतील तेथेंच पाळणें हिताचें आहे, मुत्र्यांत लघुशंका उभ्यानेंच केली पाहिजे, कारण ती तेथें बसून केल्यास खालील मूत्रांतील विषकारक, गलिच्छ द्रव्यांचे रजःकण श्वासा बरोबर फुफ्फुसांत शिरून इजा होण्याचा विशेष संभव आहे. उभ्या स्थितींत हा संभव कमी. तसेंच वाळलेल्या मूत्रावर लघुशंका केल्यास उष्ण मूत्रानें पूर्वीच्या शुष्क मूत्रांतील दूषित द्रव्यें, बाष्प रूपानें इजा करतील म्हणून असा प्रसंगच पडल्यास वाळलेल्या भागापेक्षां ओल्या भागा वरच हा विधि करणें अधिक प्रशस्त होय.

गळूं देणें फार हितकर आहे. शुद्धतेच्या दृष्टीनें पादप्रक्षालनापेक्षां नासिका क्षालनाची विशेष आवश्यकता आहे. ज्या लोकांत हा प्रघात नसेल त्यांनीं तो त्वरित सुरू करावा.

येथवर हस्तपादादि प्रक्षालनाचा विचार झाला, आतां स्नाना संबंधीं विचार करावयाचा. देहशुद्धी करितां पाण्यानें आंग धुण्याची जरूर आहे परंतु या स्नानविधीचें आह्मी फारच प्रस्थ माजविलें आहे. देव्हाऱ्यांतील देवांची दहीं; दूध, तूप, मध या द्रव्यांनीं आह्मीं आंघोळ घालतों. या आंघोळ घालण्यानें देवांचा आह्मी मळ ऊर्फ पाप काढून टाकतों असेंच नव्हे काय! आह्मीं दह्या दुधाचें स्नान करीत नाहीं, परंतु विलक्षण प्रकारचीं स्नानें करण्याचे विधि आह्मांत सांगितले आहेत. गुरुचरित्रांत अग्निस्नान, भस्मस्नान, वायुस्नान, मानसस्नान इत्यादि स्नानाचे अनंत प्रकार सांगून, ते कोणत्या वेळीं कसे पाळावयाचे याचें उद्घाटन केलेलें आहे. पाय व तोंड धुण्याबद्दल पूर्वीं जे नियम वर्णिले आहेत त्यांवरून एकंदर सर्व शरीर धुण्याबद्दल किती तरी नियम असतील हें सहजच लक्षांत येतें. विधियुक्त शौच–मुखमार्जन–स्नान करण्यास १ प्रहर कांहीं पुरावयाचा नाहीं. हे विधि यथासांग करणारे हल्लीं फारसे कोणी आढळत नाहींत. जसजशी सुधारणा होत चालली आहे तसतसा ह्या यातायातींच्या गोष्टींस फांटा मिळत चालला आहे. जे थोडे बहुत ह्या संबंधीं विधि पाळले जातात त्यांत देखील अतिशयच भोळेपण मातलें आहे. विस्तार भयास्तव त्याची विशेष चर्चा न करितां थोडक्यांतच सांगतों.

**धोंडभट्टी**:—आमच्या कार्यप्रस्थांत प्रत्येकानें स्वच्छ आंग धुऊन यावें असा प्रघात आहे. कित्येकांस तें करण्यास सवड नसते, ह्मणून डोक्यास नुसतें गंधच लाऊन हातांत पळी पंचपात्री व आंगावर स्वच्छ धोतर घेऊन या मंगल कार्यांत ते घुसतात, व इतर लोकांत खपून जातात. आतां एखादा मनुष्य खरोखरच स्नान करून आला परं

त्यानें डोक्यास गंध लाविलें नसलें तर, त्याचें अवलोकन अमंगल मानण्याचा प्रघात आहे हें भोळेपण होय. धोंडू भट्टानें ही भटी प्रचारांत आणली असावी असें तिच्या नांवावरूनच दिसतें. बाह्य झळकळ लोकांस किती आवडते हें धोंडभटीवरून सहज कळतें. हा ठकबाजीचा प्रकार लोकांकडून न घडेल अशा प्रकारचे यत्न झाले पाहिजेत.

**काकस्नानः**—स्नानानें देह शुद्ध होत असल्यामुळें प्रत्यहीं स्नान करणें ही धर्माची बाब झाली. शरीरास ज्या गोष्टी हितावह त्या प्रत्येकानें अवश्य कराव्या ह्मणून त्या धर्माच्या बाबी करून टाकल्या आहेत. स्नान शरीरास जरी हितावह आहे तरी कधीं कधीं त्यापासून अनिष्ट परिणाम घडतात तेव्हां त्यांचा निषेधच हितकर असतो ह्मणून मनु ह्मणतोः—

**न स्नान माचरे द्भुक्त्वा । नातुरो न महा निशी ॥**
**न वासोभिः सहाजस्रं । नाविज्ञाते जलाशये ॥**

अ. ४ श्लो. १२९.

**अर्थः**—भोजनानंतर विनाकारण स्नान करूं नये, रोग्यानें नैमित्तिकही स्नान करूं नये, तर यथा सामर्थ्य, ह्मणजे गळ्याखालीं, किंवा ओल्या वस्त्रानें अंग पुसणें अथवा मार्जन इत्यादि प्रकारें करावें. रात्रीच्या मध्यस्थ दोन प्रहरीं काम्य नैमित्तिका वांचून स्नान करूं नये. नित्य बहु वस्त्रांसहित ( नैमित्तिकावांचून ) स्नान करूं नये. जो जलाशय ( तलाव इत्यादिक ) फार खोल असल्यामुळें मकरादिक प्राणी राहत असतील अशा अपरिचित जलाशयांत स्नान करूं नये.

मनुस्मृतींत वर्णिलेला हा स्नाननिषेध आरोग्य दृष्ट्याच केलेला आहे. शरीर सुस्थितींत ठेवण्यास स्नानासंबंधि विधि निषेध धर्मांत गोंवले गेले परंतु ते कोणत्या हेतूनें केले, याची ओळख लोकांस न राहून ते कसेतरी पाळणें यांतच पुण्य अशी लोकांची कल्पना धांवूं लागली. स्मृतिकाला पुढल्या पौराणिक कालांत विधि निषेध पाळण्यांत लोकांनीं

कमाल करून सोडली. गुरुचरित्रांतील उतारे मागें दिले आहेत त्यांव रून ही गोष्ट ध्यानीं येईल. धर्मविधींचा कार्य कारण भाव दाखवि ण्यास भटजी समर्थ नसल्यामुळें, आधुनिक अल्लड सुधारकांस धर्मविधि तेथून सारा पोर खेळ व त्या विरूद्ध वर्तन करणें ह्मणजे सुधारणा क रणें असें वाटूं लागलें. ज्या प्रमाणें ही अल्लड सुधारकांची चुकी होत आहे त्याच प्रमाणें जुन्या मताचे भाविक लोकही चूक करीत आहेत. स्नान केल्यानें धर्म पालन होतें ह्मणून स्नान करावयाचें, तें कसें तरी करून टाकावयाचें. कावळा ज्या प्रमाणें पाण्यांत पंख बुडवून ते झ टकावून टाकितो त्या प्रमाणें डोक्यावर दोन तांब्ये ओतून आंग भिजलें ह्मणजे स्नान विधि पुरा झाला व आपण पवित्र झालों असें समजणारे मनुष्य खरोखर भोळे होत. शरीर स्वच्छ होण्यास आंगावरील मळ साफ घांसून काढिला पाहिजे. प्रतिक्षणीं त्वचेच्या रंध्रांतून स्वेद घर्मा दि अशुद्ध द्रव्यें निघून, त्यांतच शरीरांतील अत्यंत सूक्ष्म मृतकोश सा मिल होतात व या उभयतांत वातावरणांतील धूलिकाकण मिश्र होऊ न या त्रयींच्या मिलाफाची अत्यंत सूक्ष्म पापडी बनून ती रोमरंध्रें बुज वून टाकिते. रोमरंध्रें बंद झाल्यास शरीरांतील अशुद्ध द्रव्यें बाहेर पडण्यास अटकाव होतो, ह्मणून तीं खुलीं राखण्यास शरीरावरील मळ काढण्याची फार जरूर आहे. नाचण्याचें पीठ किंवा पियर्स सारखा उत्तम साबू यांणीं शरीरावरील मळ थोड्याच श्रमानें काढतां येतो परंतु काय चमत्कार आहे पहा! साबूंत चरबी असते ह्मणून तो आंगास ला वणाऱ्यास कर्मठ बाऱ्या समजतात, व आपण त्या साबूचा उपयोग करीत नाहीं ह्मणून धर्म पालनाचा वृथा गर्व बाळगितात. परंतु त्यांनीं ही गोष्ट पक्की लक्षांत ठेवावी कीं, आंग भिजवून कानाच्या, पाळी, मान, कुशी, बाहू, यांवर कितीतरी मळ राखणाऱ्या कर्मठा पेक्षां पियर्सचा साबू लावून शरीरत्वचा स्वच्छ स्थितींत ठेवणारा गृहस्थच अधिक प वित्र आहे, असें आरोग्य शास्त्राचें अर्थात खऱ्या धर्माचें मत पडेल.

साबूंत चरबी असते व ती आंगास लागल्यानें आपण बाटूं असें ज्या कर्मठांस वाटतें, तेच कर्मठ वाग येणारें, चरबी मिश्रित कुसकें नासकें, किडे पडलेलें मुद्दां, बुधल्यांतील तूप निःशंक प्रत्यहीं सकाळ संध्याकाळ सेवन करितात इतकेंच नव्हे तर, अन्नाची शुद्धि करण्या करितां असल्या तुपाचीहि अन्नशुद्ध करितात हें त्याच्या भोळेपणाच्या कडेलोटाचें उदाहरण होय.

**अविस्पर्श स्नानः**—विटाळशा बायकोचा स्पर्श झाला असतां स्नान करण्याचा विधि सांगितला आहे. या स्थितींत स्त्रीला अत्यंत अपवित्र मानण्याचा प्रघात इतक्याच साठीं पडला कीं, पुरुषाचा व तिचा संयोग होऊं नये. कारण, अशा स्थितींतील संयोगा पासून उपजलेली प्रजा रोगी व विकलांग असते व त्या उभयतांसही इजा होते असा आरोग्य शास्त्राचा सिद्धांत आहे. व धर्मज्ञाचेंही मत तसेंच आहे
मनु काय ह्मणतो पहाः—

रजसाभिप्लुतां नारीं नरस्य ह्युपगच्छतः
प्रज्ञा तेजो बलं चक्षु रायुश्चैव प्रहीयते

**अर्थः**—रजस्वला स्त्रीप्रत जो गमन करितो त्याची प्रज्ञा, वीर्य, बल, नेत्र आणि आयुष्य हीं नष्ट होतात.

हा भयंकर प्रकार टळावा ह्मणूनच मनूनें सांगितलें आहे कीं

नोपगच्छेत्प्रमत्तोऽपि स्त्रियमार्तव दर्शने
समान शयने चैव न शयीत तया सह.

**अर्थः**—पुरुष कामार्त असेल तथापि त्यानें रजोदर्शना पासून तीन दिवस स्त्रियेप्रत गमन करूं नये. एका पलंगावर स्त्रिये सहवर्तमान निद्रा करूं नये.

म. अ. ४. ४०

अलीकडील डाक्तर विटाळशीच्या संयोगापासून भयंकर परिणाम घडतात असेंच प्रतिपादन करितात.

विटाळशीचा संपर्क अरिष्ट उत्पन्न करणारा असल्यामुळें स्मृति ग्रंथांत त्याचा जागजागीं निषेध केला आहे. पुराणादिकांत रजस्वलेच्या संयोगास, थरत भय उत्पन्न व्हावें अशा प्रकारचीं वचनें आहेत.

**प्रथमे हनि चांडाली द्वितीये ब्रह्मघातकी ।**
**तृतीये रजकी प्रोक्ता चतुर्थे हनि शुध्यति ॥**

विटाळशी पहिल्या दिवशीं चांडाली, दुसऱ्या दिवशीं ब्रह्मघातकी तिसऱ्या दिवशीं धोबीण असते व चवथ्या दिवशीं शुद्ध होते. इत्यादि विधानें करण्याचा हेतु, तिचा पतीशीं योग न घडावा हाच आहे. आह्म लोकांत ३।४ दिवसच कायतो विटाळशीचा विटाळ मानला आहे इस्रा एला दिकांत तो ७ दिवस मानण्याचा प्रचात आहे. रजस्वलेचा विटा मानण्याची चाल पाडणारे लोक शहाणे व धूर्त खरे कारण, या प्रचा तामुळें तिचा संयोग न करण्याविषयीं लोकांची स्वाभाविक प्रवृत्ति होऊ लागली. युरोपियनादिकांत अशा प्रकारचा कांहीं निषेध नसल्यामुळे फार भयंकर परिणाम घडतात यामुळें हिंदु, ज्यू , पारशी इत्यादिकांच्या या चालीचें अज्ञान लोकांनीं अनुकरण करणें फार हिताचें आहे असें प्र ख्यात डाक्तर प्रतिपादूं लागले आहेत. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं आह्मांतील कित्येक अल्लड सुधारकांस ही चाल पोरकटपणाची वाटते विटाळशीला मुद्दाम स्पर्श करण्यांत ते सुधारणा समजतात, हें त्यांचें फा जीलपण होय. आतां, इतकी मात्र गोष्ट खरी कीं, विटाळशीच्या विटाळा संबंधीं आह्मी जो भोळेपणाचा कळस करून सोडला आहे, त्याची आरोग्य दृष्टचा शहानिशा केली पाहिजे. विटाळशीचा स्पर्श झाला असतां सचैल स्नान करणारे प्रस्तुत सुधारलेल्या काळांत ती बहुत कर्मठ लोक आहेत इतकेंच केवळ नव्हे तर तिनें स्पर्श केलेल्या वस्त्रास आपल्या वस्त्राची आं चळी लागली तरी स्नान केलें पाहिजे असें ह्मणणारे, नव्हे—खरोखर स्ना करणारे बहुत लोक आहेत. भोळे बिचारे लोक ! विटाळशीचें आं जरी कित्येक दिवस सुरू असतें तरी त्यानें सर्व वस्त्रें भरून जा

असें कांहीं नाहीं, तेव्हां सहज चालतांना तिचें एखाद्या वस्त्रास बोट लागलें तर त्या बोटाच्या अग्रांतून तिचा विटाळ त्या वस्त्रांत जसा कांहीं शिरला असावा व, आपलें वस्त्र त्या वस्त्रास लागतांच आपल्या वस्त्रांतुन तो विटाळ आपणास लागला अशी भावना धरून सचैल स्नान करणाऱ्याच्या भोळेपणाची शिकस्त होय ! विटाळशीचा विटाळ धरण्याचीं कारणें लोकांस समजावून सांगून अडल्या प्रसंगीं, त्यांच्या हातून जीं कार्यें केल्यानें हानि होणार नाहीं तीं कार्यें त्यांजकडून, करविण्याची प्रवृत्ति झाली पाहिजे. विटाळशीचा शब्द कानीं पडतांच तोंडांतील घांस टाकून उठणाऱ्या व चांडाळाप्रमाणें, तिची सावली आंगावर पडली असतां स्नान करणाऱ्या लोकांनीं आपला बेहद्द भोळेपणा सोडून दिला पाहिजे. विटाळशी व चांडाल या शब्दांचे समानार्थक विटाळ चांडाळ हे शब्द आहेत. चांडाल अत्यंत गलिच्छ असल्यास तो अत्यंत अपवित्र मानला असला तरी, इतका कांहीं विटाळशीचा वस्त्रस्पर्शजनित विटाळ मानावयास नको. विद्वानांनीं या गोष्टींची चर्चा करून खुळसटपणाचीं विटाळासंबंधीं मतें नष्ट केलीं पाहिजेत.

**प्रेत दर्शन स्नानः**—मानवी देह हा विटाळाचा गोळा ह्मणून ह्मटलें आहे तरी, मनुष्य जिवंत असे पर्यंत जीवसानिध्यानें त्याचा देह पवित्रच मानला जातो. जिवंत देहा पासून जे भाग पृथक होतात त्यांचा जिवाशीं संबंध नसल्यामुळें ते अपवित्र मानले जातात. डोक्यावर केंस आहेत तों पर्यंत ते पवित्र. डोक्या पासून ते सुटतांच अपवित्र होतात. त्याच प्रमाणें दांत, नखें, व चर्म यांची गोष्ट आहे. पवित्र ब्राह्मणाचे केश किंवा नखें जर रस्त्यांत पडलीं व त्यांवर त्याच कर्मठ ब्राह्मणाचा पाय पडला तर स्नान केल्या खेरीज तो आपणास पवित्र मानणार नाहीं. तोंडांत थुंकी आहे तों पर्यंत ती पवित्र, बाहेर पडतांच अपवित्र. फार काय सांगावें उदरांत मलमूत्राचा सांठा असतां शुचिर्भूत ब्राह्मण आपणास पवित्र मानतो परंतु तो नरक शरीरा बाहेर पडला असतां त्याचा

स्पर्श झाल्यास स्नाना खेरीज गत्यंतर नाहीं असें त्यास वाटतें. नरका
आठवण होतांच स्नान करणारे कांहीं कर्मठ आहेत या सर्व गोष्टीं
विचार केल्यास असें आढळेल कीं, जीवसांनिध्यानें देहा वरील किं
देहांतील केश, नख, चर्म, विष्ठा इत्यादि पवित्र मानलीं जातात पर
तीं, सजीव देहा पासून भिन्न होतांच अत्यंत अपवित्र ठरतात, तोच प्रक
प्रत्यक्ष देहाचा होतो. जों पर्यंत प्राणज्योति देहांत जागरूक असते त
पर्यंत देह पवित्र. पण एकदां का ती मावळली ह्मणजे देह अत्यंत अ
पवित्र झाला असें मानण्याचा प्रघात आहे. या मानण्यांत बराच अ
आहे. देह मृत झाला असतां कुजण्याची क्रिया सुरू होते. त्या पासू
दूषित वायु उत्पन्न होऊन संनिध राहणाऱ्या जीवांच्या आरोग्यास धक
नसतो ह्मणून, देह मृत होतांच त्याची तत्काळ व्यवस्था लावणें आरोग्य
रक्षण दृष्टया फार महत्वाचें काम आहे. विलायते सारख्या थंड देशां
कुजण्याची क्रिया हिंदुस्थाना सारख्या उष्णदेशा पेक्षां फार संथपणां
होते ह्मणून तेथें हिंदुस्थानापेक्षां बराच काळ प्रेतें ठेवण्याची चाल आहे
हिंदुस्थानांत त्यांचा तावडतोब निकाल लावतात. प्रेतास स्मशानांत नेण्या
पूर्वी त्यास स्नान घालतात. स्नानानें त्या वरील मळ किंवा पाप नष्ट हो
ऊन त्यास स्वर्गांत सुख मिळेल असा भोळेपणानें समज झालेला आहे
जो मेला तो गेला त्याच्या प्रेतास अत्तर लावलें काय आणि न
लावलें काय सारखेंच. इजिप्शन लोक आपलीं प्रेतें पुष्कळ काळ टि
कावीं या हेतूनें त्यांत मसाला घालून ठेवीत तें युक्तीस धरून आहे.
ख्रिस्ती लोक आपलीं प्रेतें न्यायाच्या दिवशीं उठतील या भावनेनें सुरेख
पेट्यांत भरून पुरतात त्यांतही कांहीं अर्थ आहे, परंतु जे लोक मानवी
आत्मा स्वर्गांत गेला असें समजून त्याच्या मृतदेहास जाळून टाकतात
त्या मृतदेहास किंवा प्रेतास स्नान घालण्यांत काय अर्थ आहे ! देहशुद्धीनें
चित्त शुद्धि होणें शक्य आहे, असें मानलें तरी ज्या देहांतून आत्मा नष्ट
झाला त्या देहास चित्त कोठलें व स्नानानें त्याची शुद्धि व्हावी कशी

स्नानानें आपण पवित्र होतों तद्वत प्रेतास स्नान घातल्यानें, त्यांत पूर्वी वास्तव्य करणारा आत्मा पवित्र होतो हा समज भोळेपणानें झालेला आहे. इतकेंच केवळ नव्हे तर नामस्मरणानें जसे आपण पवित्र होतों असें वाटतें तद्वत रस्त्यांतून प्रेत नेत असतां **'नारा—यण,'** किंवा **'राम नाम सत्य हैं'** किंवा **'भाई बोलो राम'** हा नामोच्चार प्रेताच्या कर्णरंध्रांत शिरून त्याच्या आत्म्यास पुण्य प्राप्ति होते अशी भावना धरणें हेंही भोळेपणच होय. आतां हें प्रेत चितेवर, चंदनादि सुगंधि द्रव्यांनीं जाळण्यानें प्रेताच्या निघून गेलेल्या आत्म्यास सुगति मिळेल हा समज भोळेपणाचाच आहे. प्रेत जळत असतां त्यांतून अपकारक वाफा किंवा वायु निघत असतात, त्यांच्या शमनार्थ सुगंधी द्रव्यें जाळण्याचा प्रघात पडला असावा परंतु, सुगंधि द्रव्यें जळल्यानें दूषित हवा शुद्ध होते असें कांहीं नाहीं. हवा शुद्ध होण्यास हवेंतील विषारी जीव किंवा द्रव्यें नष्ट करणारे पदार्थ पाहि-जेत. ते पदार्थ हे नव्हत. आतां प्रेता पासून निघणाऱ्या वाफा किंवा धूर, हवा दूषित करीत असल्यामुळें त्यांचा धर्मदृष्टया किंवा आरोग्य दृष्टया निषेध सांगितला आहे.

**'बालातपः प्रेत धूमोवर्ज्यं * * *'**

मनु. ४. ६९.

हा युक्तच आहे. प्रेत किंवा प्रेताचा धूर यांचा स्पर्श झाल्यास स्नान करणें कांहीं गैर नाहीं परंतु, प्रेताचें दर्शन झालें असतांही स्नान करण्याची इच्छा होणें हें भोळेपण होय. प्रेत प्रेक्षणानेंच शरीर अप-वित्र होणें अशक्य. प्रेत अपवित्र, त्याचें मनानें ग्रहण केलें, अर्थात मन भ्रष्ट झालें तें, स्नानानें शुद्ध करावयाचें हें भोळेपण विलक्षण होय. मरणाराचा देह अपवित्र मानून कर्मठ स्वस्थ बसत नाहींत तर, मनुष्य मरतांच त्याच्या कुळांतील सर्व मनुष्यें अपवित्र मानितात ही गोष्ट चमत्काराची नव्हे काय ! मनुष्य मरतांच त्याच्या गोत्रजांस सुतक ध-रावें लागतें तें कोणी किती दिवस धरावें याचा निर्णय धर्मसिंधु इ

त्यादि ग्रंथांत विस्तारानें केलेला आहे. आशौच निर्णय हा ग्रंथ केवळ याच गोष्टी सांगण्या करितां बनविलेला आहे. मनुष्य मेल्यास त्याच्या नातेवाईकांस दुःख होणें साहजीक आहे, त्या दुःखामुळें मन दूषित झालें असें समजून त्यांस, अपवित्र समजण्याचा प्रघात पडलेला असावा. मृताचे संबंधी परस्थलीं असतां त्यांस मृताचें वर्तमान कळेपर्यंत आशौच नाहीं पुढें आहे ह्मणजे असें पहा 'अ' मनुष्याचा संबंधी मृत झाला आहे, परंतु त्याला ही गोष्ट माहीत नाहीं तर, परक्या 'ब' मनुष्यास मृताची *माहिती असली व त्यानें 'अस' स्पर्श केला तरी सुतकासंबंधी दोष त्यास लागत नाहीं अशी बातमी कळली कीं तो सुतकी झाला या प्रघातावरून मरणाराच्या दुःखानें मन व्यग्र अर्थात अशुद्ध होतें ह्मणूनच सुतकाचा दोष मानलेला असावा.

मृताच्या दूरदूच्या नातेवाईकांस दोषी मानण्याचें दुसरें कारण असें असावें कीं, वस्त्राचें एक टोंक पाण्यांत बुडविलें असतां, टोंकाच्या सुतांतून तें पाणी वस्त्रांत शिरून त्यास ओलें करतें, तद्वत मनुष्य मृत अर्थात अपवित्र झालें असतां त्याचा अपवित्रपणा नात्याच्या संबंधानें सर्व नातेवाईकांस लागला, अशी भावना होत असावी! आतां दुःखामुळें सूतक येवो किंवा नात्याच्या संबंधामुळें येवो कोणतीही कल्पना घेतली तरी वाजवी पेक्षां फाजील विटाळ मानण्यांत आह्मी आपल्या

---

* परस्थलीं राहणाऱ्या मृताच्या नातेवाईकास त्याची आईबापें सुतकाची वार्ता आपल्या मुलास कळल्यास उगाच त्रास पडेल ह्मणून सुतक संपण्याच्या फारच थोडा वेळ आधीं, हें वर्तमान कळावें अशा साठीं फार खबरदारी बाळगितात. पोष्टांतून पत्रद्वारें हें वर्तमान कळविणें झाल्यास लाखोटयावर **अमुक तारखेस फोडावें!** असें साफ लिहितात. आतां या लाखोटयावरील गौप्य राहण्याकरितां लिहिलेल्या वाक्यानेंच गोपनस्फोट होतो. ह्मणजे पत्राच्या मालकास कळतें कीं आपलें कोणीतरी संबंधी मेलेलें आहे, असा विचार त्याच्या मनांत आल्यामुळें तेव्हांच त्यास सूतक आले परंतु पत्र फाडून नातेवाइकाचें नांव कळेपर्यंत तो आपणास सुतकी समजत नाहीं, यांत त्याच्या भोळेपणास हंसावें कीं लपंडावास हंसावें हें मोठें गूढ आहे.

भोळेपणाची शिकस्त केली आहे. कारण मृत मनुष्याचीं कुटुंबांतील माणसें व फार झालें तर त्याचीं नातेवाईकें यांस दोष असावा परंतु इतक्यानें कोठें आटपतें आहे! नातेवाईक सुतकी असतां त्यास—नव्हे त्याच्या वस्त्रास—स्पर्श झाला असतां परकी मनुष्यास स्नान करावें लागतें. लोहचुंबकास एकापुढें एक लोखंडाचे तुकडे लाविले असतां, त्याची चुंबक शक्ति पहिल्यांतून दुसऱ्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत अशी जात जात कितीतरी तुकड्यांतून जाते याचें आपणास कौतुक वाटतें, परंतु तें वाटावयास नको कारण, कांहीं नियमित मर्यादेपुढल्या तुकड्यांत चुंबक शक्ति जात नाहीं परंतु, सुतकाच्या विटाळाची मात्र तशी गोष्ट नाहीं कारण, 'अ' मनुष्य मेल्यास त्याच्या 'ब' नातेवाईकास सूतक आलें, या सुतक्याच्या धोतराच्या आंचळीस परक्या 'क' मनुष्यानें स्पर्श केल्यास 'क' दोषी झाला. कच्या वस्त्रास खनें, खच्या गनें, गच्या घने; अशा शेंकडों किंवा हजारों गृहस्थांनीं जर स्पर्श केला आहे तर त्या हजाराच्या किंवा लक्षाच्या मनुष्यास सुतकाचा दोष कर्मठ दृष्टीनें लागतो! व त्यानें सचैल स्नान केलें पाहिजे अशी कर्मठाची मनोदेवता धांवते, १९ व्या शतकांत बहुतेकांच्या लक्षांत येणाऱ्या विद्युत् किंवा चुंबक शक्तींहून जुन्या कर्मठांची ही विटाळ प्रसरण शक्ति अजस्त्र व विलक्षण खरी, सार्वजनिक स्थळावरील सडक्या कुज्याघुशींची घाण नाकांत शिरत असतां, ही घाण दूर करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या, परंतु सुतक्यास स्पर्श करणाऱ्या ५०० शांव्या परक्या मनुष्याच्या स्पर्शानें अपवित्रता मानणाऱ्याच्या भोळेपणाची व पावित्र्य संपादनाच्या इच्छेची बेहद्द झाली ह्मणावयाची!

**जननाशौच स्नानः**—मनुष्य मृत झालें असतां ज्याप्रमाणें त्याच्या संबंध्यांस सुतक नांवाच्या दोषांत रखडत रहावें लागतें तद्वत, एखादी स्त्री प्रसूत झाली असतां तिच्या नातेवाईकांस सोहेर नांवाच्या अपवित्रतेंत रहावें लागतें. परंतु सोहेर हा विटाळ सुतका इतका उग्र नव्हे.

कोठें सूतक रूपी सूर्याचे चंड किरण व कोठें सोहेर रूपी चंद्राचे सौम्य किरण ! चुंबक विद्युत् शक्तींपेक्षां सूतक विटाळांत प्रसरण शक्ति अधिक तशी ती सोहेरांत नाहीं. ज्यास सोहेर आला असेल त्यास काय तो दोष, त्याच्या स्पर्शानें दुसऱ्यास स्नान करण्यास नको, असा आह्मांत प्रघात आहे ही किती वेडेपणाची गोष्ट आहे. वस्तुतः मृताशौचापेक्षां जननाशौच किंवा सोहेर याचाच दोष अधिक मानिला पाहिजे होता. कारण मनुष्य मृत होतांच त्यापासून निघणारीं अशुद्ध व विषकारी द्रव्यें, त्याचें प्रेत भस्मीभूत होतांच नष्ट होतात. ह्मणजे प्रेत जाळण्या पर्यंतच कायतो १।२ दिवस विटाळ असतो परंतु सोहेराचे तसें नाहीं. स्त्री प्रसूत होतांच तिच्या बालकाबरोबर वार व रक्त वगैरे गलिच्छ द्रव्यें बाहेर पडतात, व परटीण ११ व्या दिवशीं विटाळ काढीपर्यंत बाळंतिणीची खोली विटाळाचें माहेर घर असतें, ह्मणून *सूतकापेक्षां सोहेराचाच विटाळ अधिक मानिला पाहिजे होता, व पूर्वकाळीं तो तसा मानीत असतील असें वाटतें.

सोहेर किंवा जननाशौच यांसंबंधीं आह्मा लोकांत भोळेपणाचीं पुष्कळ उदाहरणें आढळतात. एखाद्या गृहस्थाच्या मुलाच्या डोक्यावर

---

* सू धातूचा अर्थ विणें किंवा प्रसवणें असा आहे, यापासून सूतिका किंवा प्रसूतिका म्हणजे बाळंत ( बालवंत ) झालेली असा शब्द झाला. सूतिकेसंबंधी विटाळ किंवा दोष तें सूतक, म्हणजे प्रस्तुत ज्यास आपण सोहेर ह्मणतों त्यास पूर्वी सूतक ह्मणत असत परंतु, हा शब्द हल्लीं मृत मनुष्याच्या आशौचास लावितात. सूतक शब्दानें घोटाळा होण्याचा संभव आहे म्हणून, त्याचा मूळचा अर्थ जें जनन, तद्वाचक तो शब्द असतां, त्यास जननाशौच म्हणतात व त्याचा रूढ अर्थ मरण हा असतां. त्यास मृताशौच ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. सूतक शब्दावरून भाषेंतील शब्दांचे अर्थ कसे फिरतात हें सहज कळून येणार आहे. भाषा शास्त्रज्ञांस अशा प्रकारचे शब्द क्वचित आढळतात. सूतक शब्द मरणसंबंधी दोषास लावण्याचें कारण असें असावें कीं, या शब्दानें पूर्वी अत्यंत विटाळाचा बोध होत होता, तेव्हां जनन आनंददायक व मरण दुःखदायक अर्थात मन व्यग्र करणारे असल्यामुळें, जननापेक्षां मरणांत अधिक दोष वाटूं लागल्यामुळे मरणसंबंधी दोषास सूतक शब्द लावण्यांत आला !

लग्नाक्षता पडण्याचा वेळ आला आहे, इतक्यांत जर का त्याला सोहेराची बातमी कळली, तर लग्नाचा सर्व विचार ढांसळून जातो. काय हें वेड! मृताशौचांत लग्न न करण्यांत कांहीं अर्थ आहे कारण. आपला गोत्रज मरण पावला हें मनास दुःख होत असल्यामुळें या स्थितींत मंगलकृत्य न करण्याची इच्छा होणें स्वाभाविक आहे. परंतु आपल्या कुळांतील बाई प्रसूत झाली तर, ही आनंदाची गोष्ट असतां यांत मंगल कृत्य करण्यास अडचण कां असावी? तिच्या प्रसूती संबंधीं विटाळ तिच्या खोलींत राहिला तो, फार झालें तर तिच्या खोलींत प्रवेश करणाऱ्या तिच्या कुटुंबांतील, मनुष्यास किंवा नातेवाईक इष्टमित्रांस स्पर्शानें लागण्याचा संभव आहे, परंतु १०।१२ च नव्हे शें दीडशें कोसांवर राहणारा कां मनुष्य असेना त्याला सोहेराची बातमी कळतांच तो आपणास अशुचि समजतो. हें भोळेपण विलक्षण होय. या प्रकारच्या सोहेरा संबंधी भोळेपणाच्या असंख्य गोष्टी आहेत, त्या विस्तार भयास्तव सांगत नाहीं. सोहेर मानण्याचा मूळचा हेतु लोकांनीं जाणून विटाळा संबंधीं फाजील भोळेपणा सोडून द्यावा. यांतच शहाणपण आहे.

**तीर्थ स्नानः**—शरीरावरील मळ हें पाप समजून तें, काढून टाकणें हेंच पुण्य असें वाटूं लागल्यावर, हा मळ किंवा हें पाप काढून टाकणारें जें पाणी तें पवित्र वाटूं लागलें. कोंडलेल्या पाण्यापेक्षां उघडें पाणी पवित्र, उघड्या पेक्षां वाहतें पाणी पवित्र वाटूं लागलें. वाहत्या पाण्याच्या नद्या ज्या प्रमाणानें मोठ्या त्या प्रमाणानें त्या शुद्ध व पवित्र वाटूं लागल्या. नद्यांमध्यें तीर्थें उत्पन्न झालीं व त्या तीर्थांत स्नान करून आपलें पाप नष्ट करूं पाहणारे यात्रेकरूंचे मेळे त्यां तीर्थांकडे धूम ठोकूं लागले. इतर नद्यांपेक्षां गंगानदी मोठी असल्यामुळें ती अत्यंत पवित्र वाटूं लागली. आमाझोन सर्व भूगोलावर मोठी आहे ही जर आमच्या पूर्वींच्या लोकांस कळती तर गंगेपेक्षां तिला पवित्र मानण्यांत त्यांनीं आपली कल्पना चालविली असती. आतां गंगानदीस पवित्र मा-

नण्यांत तिच्या विशालपणा शिवाय दुसरीं पुष्कळ कारणें आहेत. ए
तर ती आर्यलोक ज्या उत्तर दिशेकडून आले तिकडून येत असल्यामु
तिला महत्व आलें. दुसरें कारण आर्यांचे देव ज्या हिमालय पर्वता
वास्तव्य करितात, त्यावरून ती येत असल्यामुळें ती स्वर्णदी म्हण
स्वर्गांतून उतरणारी अशी तिला संज्ञा प्राप्त झाली. तिसरें कारण तिं
पाणी शुभ्र+ आहे. शुभ्रपणांत पवित्रता हें मत साधारणच होऊ
राहिलें आहे. चवथें कारण तिचें पाणी टिकाऊ आहे. इतर नद्यांतीं
पाण्यापेक्षां गंगेचें पाणी बाटलींत घालून बंद करून ठेवल्यास तें न नास
बरेच दिवस टिकतें. पांचवें कारण तिच्या पवित्रपणा विषयीं पौराणि
आख्याइका. या प्रमाणें दुसरीं बहुत कारणें तिचें महत्व वाढण्यास क
रणीभूत झाल्यामुळें **गंगातोय** हें अत्यंत पवित्र वाटू लागलें. **काशी**
**वास** व **गंगाजलपान** हेंच कायतें जन्माचें सार्थक असें मानणारे लक्ष
वधि लोक अद्याप हयात आहेत. **कलकले** तीर्थात स्नान करून आ
णास धन्य मानून घेणारे कितीतरी लोक आहेत. हें **कलकले** तीर्थ उत्प
करणांराचा हेतु हल्ली कोणीकडल्या कोणीकडेस उलथून पड
आहे. आजपर्यंत कोट्यावधि मनुष्यांच्या आंगावरील घाणे
मळ व गतभर्तृकांच्या केंसांचे पुंज इत्यादि, यांत स
पडत असल्यामुळें, व गलिच्छ पदार्थ त्यांत पडून ते कुजत चालल्यामुळं

+ एखाद्या खेडेगांवच्या डोंगराच्या पायथ्याशीं, उष्णकाळांत जलप्रवाह सुरू झा
असतां भोळे लोक गंगाबाई आली स्नानास चला म्हणून कल्होळ करून सोडत
आसमंतात भागच्या पाण्या पेक्षां हे पाणी अधिक शुभ्र असतें यामुळें, ही गंगा अस
असे लोकांस वाटतें. अशा प्रकारची गंगा रत्नागिरी जिल्ह्यांतल्या राजापूर प्रांतीं व
गा येत असते. असली गंगा जेथे येते तेथल्या भटांभिक्षकांची खूप चंगळ पिक
ही गंगा येण्याचें कारण असें आहे कीं, डोंगराच्या गर्भात ज्या फटी, चिरा किंवा
वगें असतात, तीं त्यांतील जलप्रवाहानें कांठोकांठ भरतांच त्यांतून पाणी वाहूं ल
ते हा प्रकार कसा होतो हें ज्यास पाहाण्याची इच्छा असेल त्यानें सृष्ट चमत्
वर्णन वाचावें म्हणजे सर्व प्रकार कळेल. विवक्षित स्थलचे जलप्रवाह अडवून, वि
क्षित स्थळीं गंगा आणणाऱ्या ढोंगी भटजींच्या गोष्टी पुष्कळांनी ऐकिल्या असतील

हें तीर्थ ह्मणजे दुर्गंधीचें कोठार होऊन राहिलें आहे. परंतु आमचा भोळेपणा किती अनिवार आहे पहा. या तीर्थांत स्नान केल्यानें आपण निष्पाप होतों असें आह्मी मानतों. हाय हायरे अज्ञाना ! कसें तूं अगदीं हात धुऊन आमच्या पाठीस लागलें आहेस. गंगा नदीचें पाणी जर शुद्ध व पवित्र आहे तर त्यांत स्नान करणें गैर नाहीं, या पाण्यानें आंग स्वच्छ होईल परंतु पूर्वी केलेल्या पापाचा नाश करण्याचें या पाण्यास सामर्थ्य नाहीं. ही गोष्ट अज्ञ जनास कळण्या करितां एका साधूनें आपला कडू भोंपळा एका यात्रेकऱ्या बरावर पाठवून दिला व त्यास प्रत्येक तीर्थांत यास स्नान घाला असें सांगितलें. हा यात्रेकरू, यात्रा करून आल्यावर, साधु महाराजांनीं याच भोपळ्याची भाजी त्यास खावयास घातली व तीर्थस्नानानें भोपळ्याचा कडूपणा गेला नाहीं तद्वत तुमचें पापही नष्ट झालें नाहीं असें त्याच्या प्रत्ययास आणून दिलें. गंगा जलानें पाप नष्ट होतें हा आमचा भोळेपणानें समज झाला आहे. यात्रेस गेलेले लोक एका भांड्यांत गंगाजळ भरून आपल्या घरीं घेऊन येतात व यांतील एक थेंब मरू घातलेल्या माणसाच्या मुखांत घात ल्यास त्याचें सर्व पाप नष्ट होतें असें मानितात. बाबांनो पाप हें काय पोरखेळ आहे काय. हें इतक्या अल्प साधनानें जातें तर काय नवे होतें ! असो या थेंबाची गोष्ट राहूंद्या. कुसकें नासकें कां पाणी असेना त्यानें स्नान करीत असतां, गंगेचें स्मरण केल्यास गंगा स्नानाचें पुण्य मिळतें, असें मानणारे बिचारे भोळे लोक आह्मांत पुष्कळ आहेत. स्नान-प्रसंगीं गंगाष्टक ह्मणण्याचा कर्मठाचा पाठ असतो. त्यांत केवळ गंगेची स्तुति आहे. पाप जाण्याचा मंत्र पहा.

पापोऽहं पापकर्माऽहं । पापात्मा पापसंभवः
त्राहिमां कृपया गंगे । सर्व पाप हराभव

स्नान प्रसंगीं गंगेच्या स्मरणा प्रमाणे कृष्णा, गोदा, यमुना, सरस्वती इत्यादि नद्यांचें स्मरण केल्यानेंही आपलें पाप नष्ट झालें असें सम-

जणारे असंख्य लोक आहेत. आतां आसन्नमरण मनुष्याच्या मुखां गंगातोय घालण्यांत किंवा स्नान प्रसंगीं तिचें स्मरण करण्यांत पुण्य आहे असें मानण्यांत कांहींतरी अर्थ आहे, कारण या गोष्टींनीं मनावर कांहीं तरी कार्य होण्याचा संभव आहे परंतु, इतक्यानेंच आमचें भोळेपण कुठें थांबतें आहे! अहो गंगेपासून शेंकडों कोस दूर राहणारा मनुष्य मरून, त्याला जाळून त्याची रक्षा केली व त्याचीं हाडें एका मडक्यांत घालून तीं ५।५० वर्षे पुरून ठेविलीं, आणी त्या मनुष्याच्या नातवानें किंवा पणतूनें तीं हाडें गंगानदींत नेऊन टाकलीं तर, हीं हाडें ज्या मनुष्याचीं होतीं, त्या मनुष्याचा आत्मा निष्पाप होऊन स्वर्गांत सुखानें नांदतो असें समजणारीं भोळीं माणसें शेंकड्यांनींच नव्हत तर हजारांनीं, लक्षांनीं, नव्हे—कोटींनीं ही मोजतां येण्यासारखीं आमच्या या हिंदुस्थान देशांत आहेत! गंगाजल फार झालें तर मळ काढील पाप काढणार नाहीं, गंगेत टाकलेल्या अस्थींवरचा मळ फार झालें तर निघेल, ज्या देहाच्या त्या अस्थि त्या देहाचा मळ कसा निघावा? तो देह तर जळून खाक झाला आहे. पण समजा त्या देहाचाही मळ गेला पण देहाचा मळ गेल्यानें आत्म्याचें पाप कसें जावें, समजूं या कीं देह शुद्धीनें आत्मा शुद्ध होतो आतां, जो आत्मा ५०।६० वर्षांपूर्वीं देहास सोडून दुसऱ्या जन्मास गेला, त्या आत्म्याला पूर्व जन्मींच्या देहांतील हाडें नातवानें गंगेत टाकल्यानें पाप निष्कृति होऊन सद्गति कशी यावी. अहो हिंदुस्थानची सुधारणा करूं पाहणाऱ्या सामाजिक सुधारकांनो लोकांतील या भोळेपणाच्या गोष्टी काढण्याचा तुम्ही यत्किंचित तरी यत्न केला आहे काय नसेल तर तो सत्वर करूं लागा.

**उल्कापतनदर्शन स्नानः**—नक्षत्र पतन पाहिल्यास स्नान करा वयास सांगितलेलें आहे. याचें कारण इतकेंच कीं नक्षत्रपतन पाहिलें असतां मनास दुःख झाल्यामुळें मन व्यग्र अर्थात् दूषित होतें. दुःख होण्याचें कारण, नक्षत्र पडणें म्हणजे कोणी पुण्यात्मा स्वर्गांत आपलें

पुण्य भोगीत होता त्याचें पुण्य सरल्यामुळें तो मृत्युलोकांत आतां आपलें पाप भोगण्यास जन्मास येत आहे, ह्मणजे चांगल्या स्थितींतून वाईट स्थितींत तो जात आहे असें जुन्या मताच्या भोळे लोकांस वाटतें ! नक्षत्रें—या पेक्षां उल्का ह्मणणें बरें—ह्या, पृथ्वी इत्यादिकांच्या आकर्षणानें पतन पावतात. ह्या, वातावरणांत पडत असतांच कित्येक समूळ नाहींशा होतात, कित्येक पृथ्वीवर येऊन पडतात त्यांचें पृथक्करण करून पाहिलें असतां त्यांत लोखंड इत्यादि पार्थिव द्रव्यें आढळतात. ह्मणून नक्षत्र किंवा उल्का पतनाचें दुःख वाटावयास नको ह्मणूनच स्नान करण्याची जरूर नाहीं.

**मानस स्नानः**—पवित्र गंगा नदीचें मनानें स्नान करून पवित्रता मानण्यांत भोळेपण तर आहेच परंतु, यावरून एक गोष्ट सिद्ध होते कीं जें चांगलें, शुद्ध व पवित्र त्याचें शरीरानें व मनानें ग्रहण करावें व जें वाईट त्याचा शरीरानें व मनानें त्याग करावा. उल्कापतन दुःखानें व्यग्र झालेल्या मनास ज्यांनीं स्नान करण्याचा विधि सांगितला, त्यांस, रागावलेल्या मनुष्याचें रक्त तापतें व मन व्यग्र होतें व कधीं कधीं रागानें मृत्युही येतो या गोष्टी कळल्या असल्या तर, त्यांनीं राग येतांच स्नान करावें असा नियम केला असता व तो प्रस्तुत स्थितीस फारच हितकर झाला असता. चीनी लोकांत भरसभेंत रागावणाऱ्यास दोषी समजण्याचा प्रघात आहे तो हितकर आहे. सारांश स्नानविधीचे नियम प्रचलित करणारांचा आपण उद्देश ध्यानीं आणावा व ते उद्देश ज्या गोष्टींनीं सिद्धीस जातील त्या गोष्टी करूं लागावें, ह्मणजे आपलें कल्याण होईल.

## खाण.

प्राणीमात्रास जीवरक्षणार्थ खाण्याची आवश्यकता आहे. या खाण्याच्या गोष्टींसंबंधानें सर्व जगांतील लोकांत आज्ञांप्रमाणें भोळीं मतें

बाळगणारे दुसरे कोणीच लोक नाहींत. हल्लीं खाण्यांत आमचा धर्म शिरला आहे ह्मणून त्या विषयीं विशेष विचार केला पाहिजे. मनुष्याची आद्यस्थिति पशु-वृत्तिहून फारशी भिन्न नसते—नव्हे त्यापेक्षां ती फार भयंकर असते कारण बहुतेक पशु आपल्या सजातियांस मारून खात नाहींत, परंतु मनुष्याचें तसें नाहीं. आद्यस्थितींत तो मनुष्यास मारून खाणें हें मोठ्या शौर्याचें कृत्य समजतो. कित्येक रानटी जातींत अद्याप ही चाल चालू आहे. पासिफिक महासागरांतील कित्येक बेटांतले लोक, मनुष्य भक्षक आहेत. न्यूगिनी ह्मणून आस्ट्रेलियाच्या उत्तरेस एक बेट आहे तेथील लोक, व बोर्निओ बेटांतील डायक लोक हे नरोपजीवी आहेत हे मनुष्याचें मांस खातात व, मनुष्यांचीं डोकीं बाळवून घरांत ठेवितात. ज्याकडे पुष्कळ डोकीं मिळतील तो अधिक शूर असें मानण्याचा प्रघात आहे. हिंदुस्थानांतील लुषाई लोक मनुष्य भक्षक असल्याची प्रसिद्धि आहे. नररुंडमालधर शंकर याचें पुराणांत जें वर्णन आहे त्यावरून मनुष्यांचीं डोकीं जमविणाऱ्या रानटी लोकांनीं ही देवता प्रथम बनविली असावी असें स्पष्ट दिसतें. पीतांबर नेसणारे लोक आपल्या देवास पितांबर नेसवितात. तद्वत पूर्वकालीं मनुष्यरुंडांच्या माळा घालणारांनीं शंकर देवता कल्पून त्याच्या गळ्यांत त्या माळा अडकविलेल्या आहेत याबद्दल, बहुधा कोणी शंका घेणार नाहीं असें वाटतें, मनुष्याच्या आद्यस्थितींत खाण्यापिण्यासंबंधानें कांहींच निर्बंध नव्हता. त्यास अभक्ष्य असें कांहींच नव्हतें, त्या वेळीं मनुष्यास पाहिजे तें खाण्यास धर्मानें परवानगी दिलेली असावी असें वाटतें.

**प्राणस्यान्नमिदं सर्वं । प्रजापतिरकल्पयत्**
**स्थावरं जंगमं चैव । सर्वं प्राणस्य भोजनम्**

मनु. ५-२८.

**अर्थ.**—स्थावर ( भात, जव वगैरे धान्यें ) जंगम ( गमन करणारे पश्वादिक सर्व ) हे सर्व प्राणाचें ह्मणजे शरीरांतर्भोक्त्या जीवाचें अन्न आहे असें ब्रह्मदेव कल्पिता झाला.

बैबलमधील जेनिसिस या प्रकरणाच्या १ ल्या अध्यायाच्या २९ व ३० या दोन ओंव्यांत कसें वर्णन आहे तें पहाः—

" And God said, Behold, I have given you every herb bearing seed, which is upon the face of all the earth, and every tree in the which is the fruit of a tree yielding seed, to you it shall be for meat 29.

And to every beast of the earth, and to every fowl of the air, and to every thing that creepeth upon the earth, wherein there is life I have given every green herb for meat, and it was so 30. "

प्रस्तुतच्या वनस्पत्याहारी सात्विक ब्राह्मणाच्या प्राचीन अत्यंत-पवित्र मानलेल्या मनुस्मृतींत प्राण्यास अर्थात् मनुष्यास सर्व भक्षणाची अनुज्ञा असावी, व हल्लींच्या ज्यू, ख्रिस्ती इत्यादि अभक्ष्य भक्षक किंवा अनार्य मानलेल्या लोकांच्या जुन्या पवित्र शास्त्रांतील पहिल्याच अध्यायांत मनुष्यास केवळ शाकभाजी खाण्यास सांगितलेलें असावें ही फार चमत्काराची गोष्ट नव्हे काय? मनुस्मृति व बैबल या धर्म ग्रंथांत मनुष्य भक्षणास प्रत्यक्ष अनुज्ञा दिलेली नाहीं तरी ती बलि—अर्पणाच्या रूपानें आहे. नरमेधाची चाल जगांतील सर्व जुन्या धर्मांत आढळते. आपणास जें प्रिय तें देवास अर्पावयाचें अशी भावना असल्यामुळें नरबलि देणाऱ्यांत नरमांस भक्षणाचा प्रकार पूर्वीं खचित असला पाहिजे. आपला अत्यंत पवित्र मानलेला धर्मग्रंथ जो वेद त्यांत नरमेधाची गोष्ट सांगितली आहे. ऋग्वेदाच्या प्रथम अष्टकांत या संबंधाचें एक सूक्त आहे. शुनःशेप नांवाच्या एका मनुष्यास बळी देण्याच्या पूर्वीं खांबाशीं बांधिलें असतां त्यानें आपली सुटका होण्याकरितां सात स्तोत्रें ह्मटलीं त्यां विषयीं कथा ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणांत सांगितली आहे.

पुरुषमेध सर्व सृष्ट पदार्थांवर श्रेष्ठत्व प्राप्त व्हावें एतदर्थ करीत असत. तो, ब्राह्मण व क्षत्रिय यांस मात्र करण्याचा अधिकार असे. त्यास चैत्र महिन्याच्या वद्य पक्षांतील दशमीस आरंभ करीत आणि त्याची समाप्ति

होण्यास ४० दिवस लागत; त्यांपैकीं केवळ ५ दिवसांस पुरुष मेधाचे दिवस ह्मणत, त्यावरून त्याला 'पंचाह' असें नांव पडलें होतें. श्वेत यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेंत देव व देवी यांस देण्यास योग्य अशा नरबलींचें वर्णन केलें आहे. शतपथ ब्राह्मणांत एक श्लोक आहे त्या वरून नरमेध करण्याच्या रीतीची सूचना केलेली दृष्टीस पडते. त्यांत ह्मटलें आहे कीं "मनुष्याचें शिर अग्निस अर्पण करीत. हें अर्पण हेंच यजन आहे यास्तव तेणेंकरून मनुष्य यज्ञ पशूंपैकीं होतो आणि यज्ञांत पशूंमध्यें मनुष्याचा समावेश होतो. डाक्तर राजेंद्रलाल मित्र ह्यांनी ब्राह्मणें आणि आपस्तंभ यांतून पुष्कळ वचनें काढून दाखवून शेवटीं असा निर्णय केला आहे कीं, आर्यलोक प्राचीनकाळीं आपल्या देवांस संतुष्ट करण्या करितां नरबलि देत असत.

पुराणांत चामुंडा किंवा चंडिका नामक कृष्णवर्ण, उग्ररूप, रुधिर प्रिय देवीस नरबलि अर्पण करण्या विषयीं आज्ञा आहे. कालिका पुराणांत सांगितलें आहे कीं, विधियुक्त एक नरबलि दिल्यानें देवी सहस्र वर्षें तृप्त राहते आणि तीन नरबलि दिले असतां तिची एकलक्ष वर्षेंपर्यंत तृप्ति होते. माणसाच्या बलीस अतिबलि ह्मटलें आहे. या विषयीं डा. राजेंद्रलाल मित्र असें ह्मणतात कीं 'हा विधि बहुत काळपर्यंत सर्व हिंदुस्थानांत चालत असे ही गोष्ट चांगली मशहूर आहे आणि देवीस संतृप्त करण्यासाठीं हिंदुस्थानांतील कोना कोपऱ्यांत, कारण प्रसंगीं मनुष्य वध होत असतो असा वहीम बाळगणारे लोक अद्याप पुष्कळ आहेत"

शास्त्रांत सांगितलेल्या यज्ञाखेरीज क्षुद्र देवतांस मनुष्य बली अर्पण करण्याची चाल प्राचीन कालापासून या देशांत होती. एखादें नवें तळें खणावयाचें असलें किंवा किल्ला बांधावयाचा असला तर, आरंभीं तेथील क्षुद्र देवतांस संतुष्ट करण्या करितां मनुष्य बळी देत असत, आपलें रक्त देवीस अर्पण करण्याची चाल मध्यंतरींची होती व सांप्रतकाळीं बंगाल

देशांतील स्त्रिया हा विधि करतात. तेथें संभावित घराण्यांतील यजमानीनें हा विधि केला नाहीं असें एकही घराणें मिळणें कठीण. कुटुंबांत नवरा किंवा मुलगा फार आजारी पडला ह्मणजे तो बरा होण्याकरितां देवीस नवस करितात, आणि तो बरा झाला ह्मणजे देवीला मनुष्याचें रक्त वाहून संतुष्ट करितात. हा प्रकार असा आहे कीं प्रथम यजमानीन बाई कांहीं क्रियाकर्में करिते, मग देवीपुढें आपली छाती उघडी करून दोन स्तनांच्या मध्य प्रदेशांतून नराणीनें थोडेंसें रक्त काढून देवीस अर्पण करिते.

आमच्या पूर्वजांत फार प्राचीन काळीं नरमेधाची चाल होती या गोष्टीच्या सत्यतेस आतां पर्यंत दिलेलीं उदाहरणें पुरे आहेत. अनार्य ह्मटलेल्या गोंड खोंड इत्यादि लोकांत नरबलि अगदीं अलीकडे दिल्या बद्दलच्या गोष्टी प्रसिद्ध झालेल्या आहेत, त्यांबद्दल कोणास शंकाही येणार नाहीं. शंका येण्यासारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे जे कर्मठ ब्राह्मण मांसाहार करणाऱ्याचा हस्तस्पर्श झालेलें पाणी पिण्यासही कबूल नाहींत त्यांचे पूर्वज पशुमांस--नव्हे नरमांस खात होते, ही होय. आतां वरील विवेचना करून इतकें स्पष्ट समजेल कीं, आह्मां आर्य ह्मणविणारांच्या अत्यंत प्राचीन काळच्या पूर्वजांत नरमेधाची चाल होती, परंतु पुढें शंका अशी कीं यज्ञाखेरीज नरमांस भक्षणाच्या गोष्टी वेदांत आहेत काय? याचें उत्तर नाहीं असें द्यावें लागेल. परंतु ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, वेदकाल हा मनुष्याच्या आद्यावस्थेच्या दृष्टीनें फार सुधारलेला काल होता. त्या काळांत आद्यावस्थेंतील मनुष्यां प्रमाणें नरमांस खाणार आर्यलोक नव्हते परंतु वेदकालाच्या फार पूर्वीं, ही गोष्ट, मनुष्य भक्षक, हल्लींच्या रानटी लोकांप्रमाणें अगदीं साहजिक असावी असें दिसतें. वस्त्राच्छादन या प्रकरणांत आद्यस्थितींतील मनुष्यें नग्न असून आंगास रंग लावीत व त्या रंगाचा अवशेष प्रस्तुतचें आमच्या स्त्रियांचें कुंकू त्यांच्या भाळावर धर्म संबंधानें राहिलें असल्यानें दर्शविलें

आहे. तद्वत मनुष्य भक्षणाची सार्वत्रिक चाल, मनुष्य जसजसा सुधारत किंवा सौम्य होत चालला तसतशी नष्ट होत चालली व तिचें अवशेष अर्पण विधीच्या रूपानें धर्माची एक बाब होऊन बसलें. आद्यस्थितील चालींचीं अवशेषें सूक्ष्म रूपानें धर्माच्या बाबी होऊन बसल्याचीं पुष्कळ उदाहरणें पूर्वी येऊन गेलीं आहेत व प्रसंगानुसार आह्मीं तीं पुढेंही दाखविणार आहों, त्यांवरून ही गोष्ट विशेष स्पष्ट होईल.

नरमेधा पुढली पायरी गोमेध ही होय. आमचे कर्मठ लोक गाईची पूजा करितात व तिचें मलमूत्र शुद्धते करितां भक्षितात त्यांस, आपले वैदिक कालचे पूर्वज गाईचें मांस खात असत ही गोष्ट खरी वाटत नाहीं परंतु, अत्यंत पवित्र मानलेल्या वेदांत या गोष्टीस भरपूर पुरावा आहे तैत्तिरीय ब्राह्मणांत गोमेध ह्मणजे गाईचा यज्ञ त्याचा विधि येणेंप्रमाणे सांगितला आहे.

" इंद्रास जाड पायांची गाय, वरुण आणि विष्णु यांस भाकड गाय, पूषणास काळी गाय, वायूस एका वेताची गाय, मित्र आणि वरुण यांस दुरंगी गाय, रुद्रास तांबडी गाय, सूर्यास पांढरी वांझ गाय इ०

पंचसारदीयसव नामक एक मोठा यज्ञ पांच पांच वर्षांनीं करीत त्या समयीं सत्रा तरुण गायींचा होम करीत. तैत्तिरीय ब्राह्मणांत असें ह्मटलें आहे कीं " ज्याला मोठें व्हावयाचें आहे त्यानें पंचसारदीय करावा; तेणेंकरून तो खचित मोठा होईल. " आश्वलायन गृह्यसूत्रांत " शूलगव " नामक एक यज्ञ सांगितला आहे, तो लक्षांत ठेवण्या जोगा आहे. तो करतेवेळीं गायी शूळावर ठेवून भाजीत. इंग्रजींत ज्याला Rost Beef ह्मणतात त्यांतलाच हा प्रकार होता.

बलिदान केलेल्या पशूचें मास आर्यलोक भक्षण करीत हें आश्वलायन गृह्यसूत्रांत यज्ञशेष भक्षण करण्या विषयीं ज्या आज्ञा आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें. पशु मारल्यावर त्याचे कापून तुकडे करण्या विषयीं तैत्तिरीय ब्राह्मणांत विधि सांगितले आहेत. ह्या विधींपैकीं कांहीं येणें प्रमाणें होते:—" ( पशूचें शरीर ) अखंड राही असें त्याचें

कातडें सोडीव. गरुडा प्रमाणें तें ( पंख पसरल्या सारखें ) दिसावें ह्मणून त्याचा ऊर फाड. पुढले पाय ( भुज ) वेगळे कर. ते आरी सारखे वेगळे कर. सव्वीस फांसोळ्या एका मागून एक अशा वेगळ्या कर. विष्ठा पुरण्या करितां खांच खण. रक्त राक्षसांस फेंक. हे अध्रिगु ( यज्ञ पशु वध करणारा ) नेमून दिलेलें काम कर. तें यथाविधि कर."

अथर्ववेदाच्या गोपथ ब्राह्मणांत यज्ञांत जीं मनुष्यें निरनिराळे कार्यभाग उचलीत त्यांस मांसाचे वांटे कसकसे द्यावे हें सांगितलें आहे.

" प्रास्तोता ह्याला जिभे सुद्धां दोन जाभाडें मिळावीं, प्रतिहर्ता याला मा‹› आणि कोहळें मिळावें, उद्गाता ह्याला गरुडा सारखे पंख, नेष्टा याला उजवा भुज; सदस्याला डावा भुज; यज्ञस्थापक गृहस्थाला ( यजमानाला ) दोन उजवे पाय; त्याच्या स्त्रीला डावे पाय इत्यादि.

पूर्वीं गोमेध प्रचलित असल्यामुळें त्याच्या कृतीचे बहुत ठिकाणीं दृष्टांत घेतलेले आढळतात.

**गृत्समद** ऋषि ह्मणतो " हे भरत वंशजा अग्नी, जेव्हां आह्मी तुला गाभण्या गाई व वांझ गाई व बैल यांचा यज्ञ करितों, तेव्हां तूं अगदीं आमचा असा होतोस." आणखी " हे इंद्रा जसे गाईच्या अंगाचे सांधे सोडवितात तसे वृत्राचे हातपाय तोडून तुकडे तुकडे कर."

वेदांत बैलाच्या यज्ञाचाही विधि सांगितला आहे.

सूत्र १६३. मंत्र. ४३ यांत ' चित्रविचित्र रंगाचा बैल शिजवितात आणि तसें करणें हा सनातन धर्म आहे. ( उक्षाणां English ox. नृश्निम् अयचना × × × × तानि धर्माणि प्रथमान्यासन् ) असें ह्मटलें आहे. ऋग्वेद १०.२७.२ यांत ऋषि इंद्राला ह्मणतो कीं, ' जेव्हां मला देवांस न भजणाऱ्या अनार्य शत्रू बरोबर लढण्याची तयारी करावयाची असेल, तेव्हां हे इंद्रा, तुज करितां पुष्ट *बैल मारून मी शिज-

* बैलाचें मांस खाऊन लढाईंत टिकाव धरण्याचें सामर्थ्य येई, तें सामर्थ्य इंद्रास बैल अर्पिल्यामुळें आलें, असें प्राचीन भोळ्या ऋषींस वाटे. सूर्यास नमस्कार ( एक प्रकारची कसरत ) घालून येणारी हुशारी सूर्य भक्तिमुळेंच आली असें समजणाऱ्या अलीकडील भोळ्या कर्मठ मनुष्या प्रमाणेंच हा प्रकार होय.

वीन. ( यदी दहं युधये संनयामि अदेव यून्........ते तुभ्यं वृषभं पचानि ) इशीरेडे यांचाही बळीकडे उपयोग करीत. एकदां इंद्रानें ३०० ( त्यांचा बळी दिला होता असें सांगितलें आहे.

कल्प व गृह्य ह्या दोन्हीं सूत्रांत गाईबैलांचें मांस खाण्या विषयीं उल्लेख आलेला आहे. गोभीलानें श्राद्धांत गोमांस खाण्यास शिफारस केली आहे.

" तप्रा ऊर्ध्वं अष्टम्यां गौः। "

शतपथ ब्राह्मणांत गोमांस हें उत्कृष्ट अन्न असा उल्लेख आहे.

" एतत् ( गोमांस ) उह वै परमं आनन्दं यम् मांसम् "

उत्तरराम चरित्रांत वसिष्टानें कालवड खाल्याची हकीगत आहे त्याच प्रमाणें वाल्मिकी, विश्वामित्र, जनक, शतानंद जमदग्नि इत्यादि ऋषीश्वरांनीं, व कित्येक स्मृतिकारांनीं गोमांस खाल्याच्या पुष्कळ गोष्टी आहेत.

राजेंद्रलाल मित्र यांणीं आपल्या पुस्तकांत प्राचीन आर्य, श्राद्धांत गोमांस खात असत अशा विषयीं पुष्कळ आधार दाखविले आहेत. जिवंतपणीं गोमांस प्रिय असल्यामुळें तें मेल्यावर, परलोकास जातांना मार्गांत खावयास मिळावें ह्मणून, मृताचे संबंधी त्याच्या प्रेता बरोबर गाईचें ×दहन करीत असत. सांप्रत कित्येक रानटी स्थितींतील मनुष्यांत

× मेलेल्या मनुष्याप्रीत्यर्थ वसु सोडण्याची आम्हा लोकांत चाल आहे. एक चांगला पाडा पाहून, त्यास डाग देऊन मृताच्या नांवानें तो सोडून देतात. या वसूस किंवा पोळास कोणी मारझोड करीत नाहींत व त्याकडून कोणी काम करूनही घेत नाहींत. यानें खुशाल पाहिजे तिकडे पाहिजे त्याचें खावें, व खुशाल हिंडावें असा प्रकार अ... त्यामुळें हे पोळ फार माजून लोकांस उपद्रवकारक होतात, परंतु धार्मिक दृष्टीनें लो... त्यांचा सर्व जुलूम सोसतात. असले पोळ उत्तर हिंदुस्थानांत फार आहेत. असल्या पोळांत किंवा बैलांत अतिशय सामर्थ्य असल्यामुळें प्राचीनकाळीं बलिष्ठ पुरुषास बैलाची उपमा दिलेली आढळते. पुरुषबलिवर्द ( बैलाप्रमाणें बळकट पुरुष ) व पुरुषसिंह या उप... बहुतेक समानार्थक आहेत. प्रस्तुत बैलाची उपमा निंदाद्योतक आहे. हल्लीं ' एखा... मनुष्य बैल आहे ' असें म्हटलें असतां तो " ढ " किंवा टोणपा आहे असा अर्थ ध्वनित होत असतो. भाषेतील शब्दांचे अर्थ, कालांतरानें कसे पालटतात हें

मृताबरोबर, त्यास जिवंतपणी प्रिय असणाऱ्या वस्तु जाळण्याची किंवा पुरण्याची चाल आहे. आफ्रिकेंतील कित्येक जंगली स्त्रिया ज्या ठिकाणीं त्यांचीं मृत बालकें पुरलेलीं असतात, त्या ठिकाणावर आपल्या स्तनांतून दूध पिळून टाकित असल्याचें आढळण्यांत आलें आहे. ख्रिस्ती लोकांत प्रेतें पुरण्याची चाल आहे. आवडत्या मृतपत्नी बराबर तिच्या लग्नांत घेतलेलीं बहुमोली कापडें, तिच्या प्रेता बराबर पुरून टाकितात. आमच्या दक्षिणी लोकांतील नुक्तेच निवर्तलेले प्रसिद्ध विद्वान नामदार मंडलीक यांणीं, आपल्या मृतपत्नी बराबर तिचे सर्व अलंकार जाळून टाकल्याची गोष्ट ऐकण्यांत आहे. या सर्व गोष्टीं वरून एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं, मृताच्या प्रेता बराबर ज्या वस्तु ठेवण्यांत येतात त्या वस्तु, मृत मनुष्याच्या उपयोगीं पडतात, ही कल्पना थोड्या बहुत प्रमाणानें आज तागायत सर्व मानव जातींत प्रचलित आहे. मृतास मार्गांत एक नदी लागते ती तरून जाण्यास त्यास गाय मिळावी म्हणून एका ब्राह्मणास त्याच्या नांवानें गायदान करतात तिला अनुस्तरणी असें म्हणतात.

वरील प्रतिपादना वरून श्राद्धांत गोमांस खात असत याविषयीं कांहीं शंका राहणार नाहीं. ज्याप्रमाणें श्राद्धांत गोमांसाचा पूर्वीं विधि होता त्याच प्रमाणें, कोणी पाहुणा घरीं आला असतां त्याप्रीत्यर्थ

---

शब्दाच्या अर्थावरून स्पष्ट दिसेल. यमूस डाग देण्याचें कारण काय, ही गोष्ट सांगण्याची विशेष जरूर नाहीं. ती वाचकांच्या सहज लक्षांत आली असेल. पूर्वीं गाई किंवा बैल मृताच्या प्रेताबराबर भाजीत असत परंतु, बौद्धानें पशुहननाविरुद्ध चळवळ केल्यामुळें, पुढें गाईबैल जाळण्याचें बंद पडलें परंतु, त्यांस जाळण्याची निशाणी डागाच्या रूपानें अत्यंत सूक्ष्मतेनें प्रस्तुतकालीं ती आपल्या दृष्टीस पडत आहे. प्राचीन काळचा आमचा इतिहास इतर देशांप्रमाणें लिहून ठेवण्यांत आला नाहीं म्हणून अलीकडील विद्वान फार हळहळतात त्यांनीं आमच्या प्राचीन चाली धर्मानें, सूक्ष्म रूपानें अद्याप चालू ठेविल्या आहेत त्यांकडे पाहून, त्यांपासून इतिहासाचा थांग लागण्यास थोडासातरी उपयोग होईल असें समजून, आपल्या मनाचें थोडेंसें समाधान करून घ्यावें.

गोहनन करण्याचा प्रघात असे. पाहुण्याचें स्वागत करण्याची रीत अशी होती कीं, प्रथम त्याचे पाय धुवावयाचे, नंतर दुसरे कांहीं विधि करून त्यापुढें गाय आणावयाची. जर त्यानें तिला सोडून द्यावयास सांगितलें तर सोडावयाची. नाहींतर ती पचवून त्यासह ती भक्षावयाची. कित्येक पाहुणे, ही गाय सोडून देत, कित्येक उदर भरणार्थ तिचा उपयोग करीत. सर्वच × पाहुण्यांस गाय दिली जात असे, असें नाहीं. तिचे अधिकारी विवक्षित पाहुणे असत. ज्याकरितां गाय दिली जात असे त्यास **गोघ्न** ही संज्ञा, प्रख्यात संस्कृत व्याकरणकार पाणिनी यानें ध्वनित केली आहे. अन्न प्राशन विधींत **आज** ह्मणजे बोकडाचें मांस लिहिलें आहे. परंतु मधुपर्कांत गव्य* ह्मणजे गोमांस धरलें आहे. व

× **सूत्र**—स्नातकायोपस्थिताय ॥ २ ॥ राज्ञेच ॥ ३ ॥ आचार्य श्वशुर पितृव्य मातुलानांच ॥ ४ ॥

**अर्थः**—घरीं आलेला स्नातक, राजा, आचार्य, सासरा, चुलता किंवा मामा यांना मधुपर्क पूजा द्यावी. मधुपर्कांत आसन, पाद्य, अर्घ्य, आचमनीय, मधुपर्क आणि गाय हे उपचार आहेत. मधुपर्क मांसा खेरीज होत नाहीं ही गोष्ट **'नामांसो मधुपर्को भवति भवति'** या सूत्रावरून स्पष्ट होत आहे. पूर्वी मधुपर्कांत गाईचा विधि होता परंतु गोहनन प्रतिकारानें तर तिच्या जागीं बकऱ्याची स्थापना झाली. संस्कार कौस्तुभांत—**'गौप्रतिनिधित्वेन छाग आलभ्यते'** असें म्हटलें आहे. कित्येक जातींत लग्नांत विहिणीस भेट बकरा म्हणून १ रुपया देतात या चालीचें मूळ वरील गोष्टींत आहे.

* गव्य याचा अर्थ गाई पासून उत्पन्न झालेलें असा असल्यामुळें मांस, दूध, तूप इत्यादिकांचा या शब्दांच्या अर्थात समावेश होतो. गोभक्षण काळांत गव्य म्हणजे गाईचें मांस अत्यंत पवित्र मानलें होतें कारण त्यांत पौष्टिकपणा विशेष असल्यामुळें त्यास ही योग्यता आली. गोहनन काला नंतर तिचें मांस अपवित्र ठरलें व त्याची पवित्रता तिच्या दुधातुपांत शिरली. हे दोन्ही पदार्थ पुष्टी आणणारे आहेत. भोजनपात्रांत खाद्य पदार्थ वाढून झाल्यावर अखेरीस तुपाचा शिक्का पडतो, तो पडल्याखेरीज अन्न शुद्ध झालें नाहीं असें कर्मठांस वाटतें. प्रस्तुतकाळीं या अन्नशुद्धिकर तुपांत चरबीची भेसळ होत असल्याबद्दल पुष्कळ ओरड चालली आहे. सरकार यासंबंधानें कायदा करण्याच्या विचारांत आहे. परंतु, शुद्ध तुपाची व्याख्या कशी करावी हेंच मोठें कोडें पडलें आहे. गरीब बिचाऱ्या ब्राह्मणाची बायको, कढईंत तुपाचा खडा

त्यांत आलंभनच[1] मुख्य असून उत्सर्जन हें गौणपक्षीं आहे. याच प्रमाणें

---

झाट पडत चालला म्हणजे, भोजनपात्रांत टिचकीनें थोडेसे घृतबिंदु शिंपडते आणि अन्नशुद्धिचें शास्त्र केलें असें म्हणते. पौष्टिकपणा व शुद्धता यांचा निकट संबंध कल्पि- ल्यामुळें या शास्त्रकरणविधींत अन्नशुद्धि होत नाहीं असें म्हणावें लागतें. अन्नशुद्धीस अर्थात् पुष्टता येण्यास, सामर्थ्यानुरूप सपाटून तूप खाल्लें पाहिजे. घृतबिंदु भक्षणानें पवित्रता मानणें ही गोष्ट ग्रहणाच्या वेधकालांत दांड्यांवरील वस्त्रांत बारीकसें तुळशी- पत्र टाकून तीं शुद्ध मानण्या प्रमाणेंच होय. गाईचें शेण व मूत यांचा गव्यांतच समा- वेश होतो. गोहननकालांत यांचा शुद्धतेकडे उपयोग केल्याचें आढळत नाहीं. प्रस्तुत प्रत्येक प्रायश्चित्तांत यांचा बहुधा उपयोग करितात. श्रावणमासांत श्रावणी म्हणून दर- साल जो शुद्धीकरणविधि होतो, त्यांत गाईचें दूध, तूप, दहीं, शेण व मूत्र या पंच गव्याचें सेवन अवश्य मानलें आहे. गाईच्या शेणामुतास पवित्रपणा कां आला याचा विचार मागें प्रायश्चित्त या प्रकरणांत केला आहे. वैदिक कालचे, गौमांस गव्य सेवन करण्यांत पवित्रता मानणारे लोक जर प्रस्तुतकाळीं अवतीर्ण झाले, तर त्यांस गोमूत्र व शेण हें गव्य प्राशन करून त्यांत पवित्रपणा मानणाऱ्या प्रस्तुतच्या आपल्या वंशजांस पाहून किती चमत्कार वाटेल बरें !

† आलंभ, किंवा आलंभन हा शब्द लभ धातूपासून झाला आहे. लभ धातूचा अर्थ मिळविणें असा आहे, मधुपर्कादिकांत प्रथमतः गवालंभ याचा अर्थ गाय मिळ- विणें म्हणजे ती भक्षणें, असा प्रचात असल्यामुळें पुढें लभ धातूचा अर्थ मारणें वध करणें असा झाला. टीकाकार आलंभन याचा साधारणतः वध करणें असाच अर्थ करितात. मधुपर्कादिकांत सर्वच गाईचा वध होत असे असें नाहीं. कित्येक मधुपर्का- धिकाऱ्यांच्या इच्छेनें गाईचे बंध खुले होऊन, तिची सुटका होत असे, व पुढें गोहनन कालानंतर गवालंभ म्हणजे करांजलींत पाणी घेऊन तें गाईच्या सोंवाळीशीं नेऊन हुंगून टाकण्याचा, व तीस सोडून देण्याचा प्रचात पडला तेव्हां, व्यवहारांत आलंभन शब्दाचा अर्थ गाईची मुक्तता असा होऊं लागला. त्याच्या आधारावर कित्येक अर्वाचीन कर्मठ असा वाद करितात कीं, 'पूर्वी गाईचा वध करीत हें म्हणणें मिथ्या आहे.' या कर्मठांनीं असा विचार करावा कीं, गवालंभ म्हणजे गाईची मुक्तता असाच जर पहिल्यापासून लोकांचा समज असता तर कलिवर्ज्यांतील ५ गोष्टींत गवालंभ घाल- ण्याची काय जरूर होती ? पुन्हा, गाय आणून नंतर ती, सोडून देण्याचा तरी भाव काय ? पूर्वी पशूंचे मेध होत नसत तर पिष्ट पशूंचे ते करीत या म्हणण्याप्रमाणेंच हें म्हणणें दिसतें. या मताच्या प्रतिपादकांस हा प्रश्न कीं, पिष्टपशू तरी करण्याचें कारण काय ? गलिच्छ वस्तूंच्या प्रतिमा करून त्या खावयास कोणास आवडेल काय? कधींही नाहीं आवडणार. पशुमांस प्रस्तुत आम्हांस गलिच्छ वाटत आहे व पिष्टपशू करून

गोहनन करण्याचा प्रघात असे. पाहुण्याचें स्वागत करण्याची रीत अशी होती कीं, प्रथम त्याचे पाय धुवावयाचे, नंतर दुसरे कांहीं विधि करून त्यापुढें गाय आणावयाची. जर त्यानें तिला सोडून द्यावयास सांगितलें तर सोडावयाची. नाहींतर ती पचवून त्यासह ती भक्षावयाची. कित्येक पाहुणे, ही गाय सोडून देत, कित्येक उदर भरणार्थ तिचा उपयोग करीत. सर्वच × पाहुण्यांस गाय दिली जात असे, असें नाहीं. तिचे अधिकारी विवक्षित पाहुणे असत. ज्याकरितां गाय दिली जात असे त्यास **गोघ्न** ही संज्ञा, प्रख्यात संस्कृत व्याकरणकार पाणिनी यानें ध्वनित केली आहे. अन्न प्राशन विधींत आज म्हणणे बोकडाचें मांस लिहिलें आहे. परंतु मधुपर्कात गव्य* म्हणजे गोमांस धरलें आहे. व

---

× **सूत्र**—स्नातकायोपस्थिताय ॥ २ ॥ राज्ञेच ॥ ३ ॥ आचार्य श्वशुर पितृव्य मातुलानांच ॥ ४ ॥

**अर्थ**:—घरीं आलेला स्नातक, राजा, आचार्य, सासरा, चुलता किंवा मामा यांना मधुपर्क पूजा द्यावी. मधुपर्कांत आसन, पाद्य, अर्घ्य, आचमनीय, मधुपर्क आणि गाय हे उपचार आहेत. मधुपर्क मांसा खेरीज होत नाहीं ही गोष्ट **'नामांसो मधुपर्को भवति भवति'** या सूत्रावरून स्पष्ट होत आहे. पूर्वी मधुपर्कांत गाईचा विधि होता परंतु गोहनन प्रतिकारानें तर तिच्या जागीं बकऱ्याची स्थापना झाली. संस्कार कौस्तुभांत—**'गोप्रतिनिधित्वेन छाग आलभ्यते'** असे म्हटलें आहे. कित्येक जातींत लग्नांत विहिणीस भेट बकरा म्हणून १ रुपया देतात या चालीचें मूळ वरील गोष्टींत आहे.

* गव्य याचा अर्थ गाई पासून उत्पन्न झालेलें असा असल्यामुळें मांस, दूध, तूप इत्यादिकांचा या शब्दांच्या अर्थात समावेश होतो. गोभक्षण काळांत गव्य म्हणजे गाईचें मांस अत्यंत पवित्र मानलें होतें कारण त्यांत पौष्टिकपणा विशेष असल्यामुळें त्यास ही योग्यता आली. गोहनन काला नंतर तिचें मांस अपवित्र ठरलें व त्याची पवित्रता तिच्या दुधातुपांत शिरली. हे दोन्ही पदार्थ पुष्टी आणणारे आहेत. भोजनपात्रांत खाद्य पदार्थ वाढून झाल्यावर अखेरीस तुपाचा शिक्का पडतो, तो पडल्याखेरीज अन्न शुद्ध झालें नाहीं असें कर्मठांस वाटतें. प्रस्तुतकाळीं या अन्नशुद्धिकर तुपांत चरबीची भेसळ होत असल्याबद्दल पुष्कळ ओरड चालली आहे. सरकार यासंबंधानें कायदा करण्याच्या विचारांत आहे. परंतु, शुद्ध तुपाची व्याख्या कशी करावी हेंच मोठें कोडें पडलें आहे. गरीब बिचाऱ्या ब्राम्हणाची बायको, कथलींत तुपाचा खडख-

त्यांत आलंभनच[†] मुख्य असून उत्सर्जन हें गौणपक्षीं आहे. याच प्रमाणें

---

हाट पडत चालला ह्मणजे, भोजनपात्रांत टिचकीनें थोडेसे घृतबिंदु शिपडते आणि अन्नशुद्धिचें शास्त्र केलें असें ह्मणते. पौष्टिकपणा व शुद्धता यांचा निकट संबंध कल्पिल्यामुळें या शास्त्रकरणविधींत अन्नशुद्धि होत नाहीं असें म्हणावें लागतें. अन्नशुद्धीस अर्थात् पुष्टता येण्यास, सामर्थ्यानुरूप सपादून तूप खाल्लें पाहिजे. घृतबिंदु भक्षणानें पवित्रता मानणें ही गोष्ट ग्रहणाच्या वेधकाळांत दांड्यांवरील वस्त्रांत बारीकसें तुळशीपत्र टाकून तीं शुद्ध मानण्या प्रमाणेंच होय. गाईचें शेण व मूत यांचा गव्यांतच समावेश होतो. गोहननकालांत यांचा शुद्धतेकडे उपयोग केल्याचें आढळत नाहीं. प्रस्तुत प्रत्येक प्रायश्चित्तांत यांचा बहुधा उपयोग करितात. श्रावणमासांत श्रावणी म्हणून दरसाल जो शुद्धीकरणविधि होतो, त्यांत गाईचें दूध, तूप, दहीं, शेण व मूत्र या पंच गव्याचें सेवन अवश्य मानलें आहे. गाईच्या शेणामुतास पवित्रपणा कां आला याचा विचार मागें प्रायश्चित्त या प्रकरणांत केला आहे. वैदिक कालचे, गोमांस गव्य सेवन करण्यांत पवित्रता मानणारे लोक जर प्रस्तुतकाळीं अवतीर्ण झाले, तर त्यांस गोमूत्र व शेण हें गव्य प्राशन करून त्यांत पवित्रपणा मानणाऱ्या प्रस्तुतच्या आपल्या वंशजांस पाहून किती चमत्कार वाटेल बरें!

† आलंभ, किंवा आलंभन हा शब्द लभ धातूपासून झाला आहे. लभ धातूचा अर्थ मिळविणें असा आहे, मधुपर्कादिकांत प्रथमतः गवालंभ याचा अर्थ गाय मिळविणें ह्मणजे ती भक्षणें, असा प्रघात असल्यामुळें पुढें लभ धातूचा अर्थ मारणें वध करणें असा झाला. टीकाकार आलंभन याचा साधारणतः वध करणें असाच अर्थ करितात. मधुपर्कादिकांत सर्वच गाईचा वध होत असे असें नाहीं. कित्येक मधुपर्काधिकाऱ्यांच्या इच्छेनें गाईचे बंध खुले होऊन, तिची सुटका होत असे, व पुढें गोहनन कालानंतर गवालंभ ह्मणजे करांजळींत पाणी घेऊन तें गाईच्या सोवाळीशीं नेऊन हुंगून टाकण्याचा, व तीस सोडून देण्याचा प्रघात पडला तेव्हां, व्यवहारांत आलंभन शब्दाचा अर्थ गाईची मुक्तता असा होऊं लागला. त्याच्या आधारावर कित्येक अर्वाचीन कर्मठ असा वाद करितात कीं, 'पूर्वी गाईचा वध करीत हें ह्मणणें मिथ्या आहे.' या कर्मठांनीं असा विचार करावा कीं, गवालंभ ह्मणजे गाईची मुक्तता असाच जर पहिल्यापासून लोकांचा समज असता तर कलिवर्ज्यांतील ५ गोष्टींत गवालंभ घालण्याची काय जरूर होती? पुन्हा, गाय आणून नंतर ती, सोडून देण्याचा तरी भाव काय? पूर्वी पशूंचे मेध होत नसत तर पिष्ट पशूंचे ते करीत या म्हणण्याप्रमाणेंच हें ह्मणणें दिसतें. या मताच्या प्रतिपादकांस हा प्रश्न कीं, पिष्टपशू तरी करण्याचें कारण काय? गलिच्छ वस्तूंच्या प्रतिमा करून त्या खावयास कोणास आवडेल काय? कधींही नाहीं आवडणार. पशुमांस प्रस्तुत आह्मांस गलिच्छ वाटत आहे व पिष्टपशू करून

अष्टका श्राद्धांतही मांस × लिहिलें असून पशुकल्पांत तर पशूंची हिंसा लिहिलेली आहे.

ख्रिस्ती शकापूर्वी ५ व्या किंवा ६ व्या शतकांत चरक संहिता लिहिली गेली आहे तींत असें सांगितलें आहे कीं, गाईबैलांचें, रेड्याह्मशींचें व डुकरें इत्यादिकांचें मांस दररोज खाऊं नये. आधार:—

---

त्यांचा पूर्वी यज्ञ करीत असें जर आम्हीं कबूल करीत आहों तर, खरोखर जीवंत पशूंचा यज्ञ होत असे ही गोष्ट उघड सिद्ध होत आहे. पशु भक्षणाची अतिशय इच्छा झाल्यास मनूनें युक्ति सांगितली आहे ती अशी:——

कुर्यात् घृत पशुं संगे कुर्यात्पिष्टपशुं तथा
नत्वेव तुवृथा हंतुं पशुमिच्छे त्कदाचन ५.३७

**अर्थः**—पशुभक्षण करण्याची अतिशय इच्छा होईल तर, घृताचा अथवा पिठाचा पशु करून तो भक्षण करावा इ०. या निर्बंधना वरून इतकें स्पष्ट दिसतें कीं पशुमक्षणाचा निषेध केल्यावरही पशुभक्षणाची हुक्की लोकांस येत असावी. व ती भागविण्याकरितां मनूनें हें कुयेडें सांगितलें असावें.

× श्राद्धांत मांस अवश्य पाहिजे अशा विषयीं मनूचें मत.

मधुपर्केच यज्ञेच पितृदैवत कर्मणि
अत्रैव पशवो हिंस्या नान्यत्रेत्य ब्रवीन्मनुः ५.४१

**अर्थः**—मधुपर्कपूजा, ज्योतिष्टोमादिक यज्ञ आणि पितरांचें व देवांचें श्राद्धादिक कर्म यांचे ठायीं पशु मारावे, इतर कर्मांत पशुहत्या करूं नये असें मनु बोलता झाला.

श्राद्धांत मांस खाण्यास परवानगी आहे असें नव्हे तर मांस भक्षणाची सक्ति आहे हे पुढील श्लोकावरून दिसेल.

नियुक्तस्तु यथान्यायं यो मांसं नात्ति मानवः
सप्रेत्य पशुतां याति संभवानेक विंशतिम् ५.३५

**अर्थः**—श्राद्ध आणि मधुपर्क यांचे ठायीं यथाशास्त्र नियुक्त होतसाता जो मनुष्य मांस भक्षण करीत नाहीं तो मृत झाल्या नंतर एकवीस जन्मपर्यंत पशुयोनी प्रत पावतो.

पशुहनन कालांत सपाटून मांस खाण्याचा प्रघात असे, पुढें मांस भक्षणाचा निषेध झाल्यावर, श्राद्ध दिवशीं तरी मांस खालें पाहिजे नाहींतर २१ जन्म पशु योनींत काढावे लागणार या भीतीनें, श्राद्धाचे दिवशीं मांसान्ना ऐवजीं मांषान्न ( माष=उडीद ) सेवूं लागले ! मांस व माष या शब्दांत फारसा फरक नाहीं. चमत्काराची गोष्ट ही कीं, या दोन्हीं वस्तूंत बहुतेक सारखाच पौष्टिकपणा आहे. माषान्ना ( वड्यां ) खेरीज प्रस्तुत श्राद्धाची सांगता होत नाहीं. वडे हे मांसाचा प्रतिरूप आहे, ही गोष्ट भोळ्या बिचाऱ्या आधुनिक कर्मठ ब्राह्मणाच्या स्वप्नांत तरी येत असेल काय !

कुर्चिकांश्च किलाटांश्च शौकरं गव्यमाहिषे ।
मत्स्यान् दधिच माषांश्च यवकांश्च न शीलयेत् ॥
चरकं अन्नपान विध्यध्यायः

वरील श्लोकावरून ही गोष्ट स्पष्ट दिसते कीं अडीच हजार वर्षां पूर्वीं आमचे आर्यपूर्वज गाईबैलांचें मांस, हें आपलें नित्याचें अन्न समजत असत परंतु, तें जडान्न असल्यामुळें रोजरोज खाणें बरें नव्हे असें चरकाचार्यांनीं आपल्या संहितेंत लिहिलें. अशुद्धतेच्या दृष्टीनें त्यांनीं त्याचा निषेध केलेला नाहीं. मत्स्य, दहीं, यवधान्यें यांचा जडान्नाच्या दृष्टीनें जसा निषेध केला तितकाच तो गोमांसाचा केला आहे. गर्भार स्त्रीनें गर्भपुष्टी करितां गोमांस खावें, अशी त्यानीं आपल्या याच संहितेंत सूचना केली आहे.

सुश्रुताचार्य पुढील रोगांत गोमांसाचा निषेध करितात

गव्यं केवल वातेषु पीनसे विषमज्वरे
शुष्क काश श्रमानाग्नि मांसक्षय हितश्चतत् ।

याप्रमाणें प्राचीन कालच्या आमच्या सर्व वैद्यांनीं केवळ आरोग्य दृष्टीनें विशेष प्रसंगीं मांसाचा निषेध केला आहे. व बऱ्याच प्रसंगीं त्याचा विधि सांगितला आहे.

एका प्राचीन वैद्यक ग्रंथांत आंचक्यांनीं बेशुद्धी येणारास मांसरस घेण्यास सांगितलें आहे !

गवां मांसे बलिनं सर्व्व क्लेह सहन्तथा
तक्रासिद्धा यवागुःस्यात् घृता व्यापद् विनाशिनी.
तैलव्यापटिश स्तत्र कपिशा पाकसाधिता
गव्यमांस रसे साम्ला विशमज्वर नाशिनी ।

प्राचीन वैद्यक ग्रंथांत बहुतेक प्राण्यांच्या मांसाचे गुण धर्म सांगितले आहेत त्यांवरून मांसभक्षण हें, लोकांस साधारण अन्नाप्रमाणें वाटत असावें असें दिसतें.

प्रस्तुत गाय आह्मी अत्यंत पूज्य मानली आहे. गोमांस शब्द आमच्या कर्णरंध्रांत शिरतांच आंगावर शहारे उभे राहतात ह्मणून, पूर्वी गोमांस संबंधानें आमच्या पूर्वजांचे काय विचार होते, या गोष्टीचें फार विस्तारानें वर्णन केलें. आतां इतर पशूंच्या हिंसे संबंधानें थोडा विचार करूं.

गोमेधा पुढें + अश्वमेधास सुरुवात झाली असावीसें दिसतें. हा विधि आर्यांनीं मध्य एशियांतील स्कुथी किंवा सिथियन नामक लोकां पासून घेतला असावा असें वाटतें. ते आपल्या देवांस वारंवार घोडे अर्पीत असत. वैदिक काळानंतर या यज्ञाचें फार स्तोम माजलें.

या यज्ञाच्या तयारीस एक वर्ष लागत असे. तैत्तिरीय ब्राह्मणांत सांगितल्या प्रमाणें ह्या यज्ञाला दहापट अठरा ग्राम्यपशु अर्पण करावे लागत. ह्या शिवाय दोनशें साठ वनपशु आणून यज्ञ स्तंभाला बांधून ठेवीत आणि त्यांच्या भोंवतालीं अग्नि फिरविल्यावर त्यांस सोडून देत.

प्रथम पूषणाला एक बकरा अर्पण करीत. घोडा खरोखर कापून त्याचें मांस शिजवीत हें पुढील मंत्रांवरून निःसंशय सिद्ध होतें.

ऋ. वे. २. १६२—

११. "[ हे घोड्या ], अग्नीच्या योगानें तुझें शरीर जळत असतां जो तुझा [ अंश ] खालीं गळेल, अथवा तुला मारिला ह्मणजे त्यावेळीं जो तुझा अंश सुरीकडेस गळेल, तो भूमीला अथवा गवताला चिकटून न राहो. तर इच्छाळू देवांला अर्पिला जावो.

---

+ याचा अर्थ गाईचा मेध बंद पडल्यावर अश्वमेध सुरू झाला असा नव्हे. नरमेध कालीं गोमेध, अश्वमेध व अजमेध सुरू असावे असें दिसतें. परंतु या मेधांची विवक्षित काळीं विशेष प्रवृत्ति असल्यामुळें यांचा अनुक्रम लाविला आहे. हिंदुस्थानच्या इतिहासांत पोर्तुगीज, डच, फ्रेंच इंग्लिश यांच्या कारकीर्दींच्या अनुक्रमाप्रमाणेंच कांहींसा हा प्रकार आहे. यांत मागल्याची कारकीर्द खलास झाल्यावर दुसऱ्याच्या कारकीर्दीला सुरुवात झाली असें कांहीं नाहीं. परंतु त्यांच्या उत्कर्षाच्या विवक्षित कालानुरूप त्यांचा अनुक्रम मणलेला आहे, ही गोष्ट वाचकानें ध्यानांत ठेवावी.

१२. जे घोडा शिजलेला पाहतात ते ह्मणतात कीं, याला आतां चांगला सुगंध येतो ह्याला काढा, आणि जे घोड्याची मांसभिक्षा मिळेल ह्मणून वाट पाहत बसतात त्यांचा सर्वांचा संकल्प आह्माप्रत येवो.

१३. मांस शिजवायाच्या थाळींत घालावयाची जी पळी, सुवा ओतून ठेवायाचीं जीं पात्रें, मांस पात्रांतील ऊब जाऊं नये ह्मणून वर ठेवण्याचीं जीं झांकणीं आणि जे आंकडे आणि सुऱ्या, तीं घोड्यास भूषणदायक आहेत."

१८ प्रबळ आणि देवांचा बंधु असा जो घोडा, त्याच्या चवतीस बरगड्यां मध्यें सुरी घुसते. [ हे कापणारे हो, ] याचे अवयव सगळ्याचे सगळेच सोडवा; प्रत्येक सांधा एका मागून एक नांव घेऊन कापा."

अलीकडील कित्येक लोकांस असें वाटतें कीं प्राचीन अश्वमेधांत घोडा कापीत नव्हते. जर घोडा खरोखर कापीत नसते तर ह्या मंत्रांचा प्रादुर्भाव कसा झाला ?

यज्ञांत बळी दिलेल्या घोड्यास तूं देवांप्रत जात आहेस असें सांगून त्याचें समाधान करीत असत:—

२० "हे [ अश्वा, ] तूं वर जात असतांना तुला तुझा प्रिय प्राण दुःख न देवो. सुरी तुझ्या गात्रांवर फार वेळ न बसो. अडाणी आणि गिधाडा सारिखा कापणारा तुझीं गात्रें नागा सोडून सुरीनें उगीच न झेजरो.

२१ "[ हे अश्वा, ] तूं जो हा मरत आहेस तो खरोखर मरत नाहींस, आणि नाशा प्रत पावत नाहींस. तूं चांगल्या मार्गांनीं देवांप्रत जात आहेस. [ तुला स्वर्गास नेण्या करितां ] तुज बरोबर इंद्राचे पिंवळे घोडे, आणि मरुताच्या ठिपकेदार हरिणी तुझ्या बरोबर जोडल्या जातील, अश्वीच्या गाढवाच्या धुरेला तुजबरोबर बलवान गाढव जोडिला जाईल.

वरील गोष्टीवरून घोडा खरोखर कापीत होते या विषयीं कांहीं

शंका नाहीं. कित्येक लोक असें समजतात कीं यज्ञांत मारलेले पशु पूर्वी सजीव करीत होते हा समजही चुकीचा आहे कारण. पशु हनना· नंतर त्याचें मांस वगैरे हव्यभाग घेऊन अस्थी वगैरे पृथ्वींत पुरून टाकाव्या असें ऐ. ब्रा. १ अध्याय १, २ पंचिका ६ खंड यांत सांगि· तलें आहे ( ऊवध्य गोहं पार्थिव. )

सामवेदांत पशूचे हननसमयीं त्याचे मातापितर व इष्टआप्त यांची समजूत याप्रमाणें घालतातः—

**अनुत्वा माता मन्यता मनुपिताऽनुभ्राताऽनुसगभ्र्योऽनु**
**सखासयूथ्यः आत्तं देवोभ्यो हविः ॥ ३०—मंत्र ब्राह्मण.**

या वरून संजीवन कल्पना मिथ्या होय. कारण संजीवनाची रीत होती तर त्या वध्य पशूंचे मातापितरांची समजूत करण्याचें मुळींच कारण नव्हतें. तसेंच यज्ञपशूला उत्तम गति मिळते असें ह्मटलें आहे त्या अर्थी त्या काळीं संजीवनाची वार्ताहि नव्हती हें उघड आहे.

**ओषध्यः पशवो वृक्षास्तिर्यंचः पक्षिणस्तथा**
**यज्ञार्थं निधनं प्राप्ताः प्राप्नुवंत्युत्सृतीः पुनः**

म. ५—४०

**अर्थः**—औषधी, वृक्ष, कासवादिक, पक्षी हे सर्व यज्ञासाठीं नाशा· ला पावले होत्साते पुनः उत्तम जातींत जन्म पावतात.

रामायणांत दशरथानें पुत्रप्राप्तीकरितां अश्वमेध केल्याची कथा आहे. त्यावेळीं जीं क्रियाकर्मे केलीं त्यांत एक कर्म असें होतें कीं, दशरथाची पट्टराणी कौशल्या हिला एक रात्र मेलेल्या घोड्याच्या अंगाशीं अंग लावून निजावयास लाविलें—कदाचित् जीव घेतल्याचा हा मोबदला असेल. "दुसरे दिवशीं प्रातःकाळीं जेव्हां राणी अशा ओंगळवाण्या स्थितीपासून मुक्त झाली तेव्हां ती व तिच्या दासी आणि मुख्य उपाध्या यांजमध्यें संवाद झाला त्याचा विषय अत्यंत मूर्खत्वाचा व बीभत्स आहे तो यजुष् व शतपथ ब्राह्मणाचा अश्वमेध नामक भाग यांत दिला असून त्याचा अर्थ सूत्रांत सांगितला आहे.

वरील गोष्टींत राजपत्नीस मृत घोड्याजवळ निजविण्याचें कारण उघड आहे. घोड्याचा जीव घेतल्याचा तो मोबदला आहे. हा घोडा जर जिवंत करतां आला असता तर राजपत्नीस त्याजवळ निजविण्याचें कांहीं कारण नव्हतें. ह्मणून संजीवनाची कल्पना मिथ्या आहे हेंच ह्मणणें खरें ठरतें.

आह्मी लाविलेल्या व्यवस्थेप्रमाणें विचार केला असतां अश्वमेधा पुढें अजामेधाचा नंबर लागतो.

अजामेधास वेदांत आधार मिळतो तो असाः---सुंदर वस्त्रें आणि अलंकार घातलेल्या घोड्याच्यापुढें जो बली धरून नेत आहेत तो सुंदर रीतीनें चालावयास, बेंबें करून ओरडावयास लागो आणि नाना वर्णाचा बकरा इंद्र आणि पूषा यांचा प्रिय भक्ष्य होवो.

अजमेधाबद्दल विस्तारानें लिहिण्याची कांहीं गरज नाहीं. कारण हा मेध प्रस्तुत अत्यंत शुद्ध ह्मटल्या जाणाऱ्या कर्मठ ब्राह्मणांतही कधीं-कधीं झाल्याचें निदर्शनास येतें. पालगड, अलिबाग, नरसिंह वाडी इत्यादि ठिकाणीं अलीकडे अजमेध झाल्याच्या गोष्टी लोकांच्या चांगल्याच स्मरणांत आहेत.

यज्ञ केवळ पशूंचेच होत असें नाहीं पक्ष्यांचीही यज्ञाकडे योजना, होत असे.

**यज्ञार्थं ब्राह्मणैर्वध्याः प्रशस्ता मृगपक्षिणः**
**भृत्यानां चैव वृत्त्यर्थमगस्त्योह्याचरत्पुरा.**

मनु. ५-२२

**अर्थः**---ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांनीं यथाविधि यागासाठीं शास्त्र-विहित मृगपक्षी मारावे. अवश्य पोषणाला योग्य असा दासवर्ग, वृद्ध मातापितरादिक यांच्या रक्षणासाठीं पूर्वकालीं अगस्त्य ऋषीनें तसें केलें आहे.

वभूवुर्हि पुरोडाशा भक्ष्याणां मृगपक्षिणाम्
पुराणेष्वपि यज्ञेषु ब्रह्मक्षत्रसवेषु च

मनु. ५-२३

अर्थः—ज्यापेक्षां प्राचीनकाळीं ऋषींनीं आपल्या यज्ञांमध्यें भक्ष्य जे मृगपक्षी त्यांच्या मांसें करून पुरोडाश केले त्यापेक्षां यज्ञासाठीं एतत्कालीन ब्राह्मणादिकांनींही मृगपक्षी मारावे.

या श्लोकाच्या आधारावरच प्रस्तुतचे कर्मठ ब्राह्मण अजमेध करीत असतील असें वाटतें !

येथपर्यंत यज्ञमिषानें मांस भक्षणाचा विधि वर्णिला यज्ञ न करितां मांस भक्षण कसें करावें याविषयीं मनु सांगतोः—

क्रीत्वा स्वयं वाप्युत्पाद्य परोपकृतमेव वा
देवान्पितॄंश्चार्पयित्वा खादन्मांसं न दुष्यति

५-३२

अर्थः—मोल देऊन अथवा दुसऱ्या कोणाकडून विकत आणलेलें मांस देवपितरांला अर्पण करून शेष भक्षण करणारा दोषातें पावत नाहीं. तसेंचः—

प्रोक्षितं भक्षयेन्मांसं ब्राह्मणानां च काम्यया
यथाविधि नियुक्तस्तु प्राणानामेव चात्यये

५-२७

अर्थः—मंत्रांहीं करून प्रोक्षण नामक संस्कारानें संस्कृत केलेलें मांस, यज्ञहोमाचें शेषमांस हीं दोन प्रकारचीं मांसें भक्षण करावीं, आणि ब्राह्मणाची ज्या काळीं मांस भक्षणाची कामना ( इच्छा ) होईल त्या काळीं यथाविधि नियमित मांस भक्षण करावें. प्राणनाश होण्याचा प्रसंग असतां मांस भक्षण करावें.

मांस भक्षणाच्या विधिसंबंधानें आतां पर्यंत वर्णन झालें. आतां मांसाबद्दल जो आह्मांस अत्यंत तिटकारा उत्पन्न झालेला आहे तो होण्यास, अर्थात त्याचा निषेध करण्यास काय कारणें घडलीं आहेत

त्यांचा विचार होणें अत्यंत महत्वाचें असल्यामुळें त्या गोष्टींची आतां चर्चा करण्यास आरंभ करितों.

जीव जीवाचें अन्न असल्यामुळें मनुष्य आपल्या आद्य स्थितींत सर्व प्रकारचे जीव भक्षण करीत असे. परंतु कित्येक जीवांच्या मांसाचे त्याच्या शरीरावर अनिष्ट परिणाम घडूं लागल्यामुळें त्यानें ते ते जीव खाण्याचें वर्ज केलें असावें. जें आपणास हितकर तें देवास हितकर वाटूं लागल्यामुळें व यज्ञांत वधलेले पशु देवास पावतात असा समज असल्यामुळें ज्या पशूंचें मांस मनुष्यांस हितकर होई ते पशु मेध्य ह्मणजे पवित्र समजण्याचा प्रघात पडला. गाईस पवित्रता येण्याचें कारण तिच्या मांसाचे सुष्ट परिणाम होतात असें वाटलें असावें परंतु,

**क्रव्यादान् शकुनान् सर्वान् तथा ग्रामनिवासिनः**
**अनिर्दिष्टांश्चैक+शफांष्टिटिभं च विवर्जयेत्**

मनु ५. ११

**अर्थः**—कच्चें मांस भक्षण करणारे गीध इत्यादिक पक्षी, ग्रामांत राहणारे असे पारवे इत्यादिक, भक्ष्यत्वें करून न सांगितले असे एक-शफ ह्मणजे गर्दभादिक, आणि टिटवा पक्षी यांचें मांस भक्षण करूं नये.

**न भक्षयेदेकचरान ज्ञातांश्चमृगद्विजान्**
**भक्ष्येष्वपि समुद्दिष्टान्सर्वान्पंचनखां स्तथा**

मनु. ५. १७

**अर्थः**—जे एकाकी संचार करणारे सर्पादिक, नामानें व जातीनें जे अज्ञात मृगपक्षी, भक्ष्यत्वें करून न कथन केलेले असे पंचनखांतील वानर इत्यादिक हे भक्षण करूं नयेत.

---

+ एकशफ पशूंचा निषध बैबलांतही आहे. जुन्या करारांतील नियम शास्त्रकर्ता- मोशे ह्मणतो "आणि परमेश्वर अहरोनाला असें बोलला इस्राएलांच्या संता- नांस असें सांगा कीं पृथ्वीवरले सर्व जीवांतले जे तुम्ही खावे ते हेच. पशूमध्यें ज्याचा खूर चिरलेला म्हणजे ज्याचा खूर चिरून दोन भाग झाले आहेत आणि जो रवंथ करितो ते सर्व खावे."

यावरून ज्याचा खूर चिरलेला नाही अर्थात् जो एकशफ तो खाऊं नये असा अर्थ स्पष्ट होत आहे.

मनुस्मृतींतील वरील दोन श्लोकांचा विचार केला असतां प्राचीन आर्यांनी कित्येक पशुपक्षी कां अभक्ष्य मानले याचें कारण सहज ध्यानीं येईल. मांसाहारी प्राण्याचें मांस खाण्यास हल्लींचे कित्येक मांसभक्षक लोकही कचरतात. त्यांनीं ज्या दृष्टीनें मांसाहारी प्राण्याचें मांसखाणें वर्ज्य केलें आहे त्याच दृष्टीनें तें पूर्वींच्या आर्यांनीं वर्ज्य केलें असावें, पारवे इत्यादि, गावांत राहणाऱ्या पक्ष्याचें मांस कित्येकांस रुचकर लागत असून आमच्या पूर्वजांनीं त्याचा निषेध केवळ स्वच्छतेच्या दृष्टीनेंच केलेला असावा. मनु. अ. ५ श्लोक २० मध्यें ग्रामकुक्कुट ह्मणजे गांव कोंबडा भक्षण केल्यास द्विज पतित होतो असें ह्मटलें आहे. गांवांतील पारवे किंवा कोंबडे वर्ज्य करण्याचें कारण उघड आहे कीं, वनपक्ष्यां प्रमाणें यांचा आहार शुद्ध नसतो. शहरांतील कोंबड्यावकऱ्यांपेक्षां खेड्यांतील कोंबडींवकरीं खाण्यास चांगलीं असें मांसभक्षक लोक सांगतात. तसेंच खेडेगावांतील पशुपक्ष्यांपेक्षां वनांतील पशुपक्ष्यांचे मांस अधिक उत्कृष्ट असतें यावरून गांवांतील पारवे किंवा कोंबडे यांचा कां निषेध केला आहे तें कळेल.

तसेंच मनु. अ. ५ श्लोक १६ यांत पाठीन, रोहित, राजीव इत्यादि जातींचे मासे भक्षणास योग्य सांगितले असून त्याच अध्यायाच्या १५ व्या श्लोकांत असें ह्मटलें आहे कीं ' जो प्राण्याचें मांस भक्षण करितो तो त्याचे मांसाचें भोजन करणारा ह्मटला आहे. मत्स्य हा सर्व मांस भक्षण करणारा आहे यास्तव जो मत्स्य भक्षण करितो त्यानें सर्व प्राण्यांचें मांस भक्षण केलें असें होतें, तस्मात मत्स्य +भक्षण करूं नये.

+मत्स्य भक्षण पूर्वीं ब्राम्हण जातींत रूढ होतें पुढें मत्स्य सर्वमांसभक्षक समजल्यावर त्याचें मांस खाण्याविषयीं शंका वाटूं लागली. न जाणो वाईटसाईट मांस याणें खाल्लें असल्यास त्याच्या मांसाचे दुष्ट परिणाम होतील या शंकेनें मत्स्यभक्षणाच्या दृष्टीनें ते त्रिकर्मी–तीन कर्माचे ( यजन, याजन, अध्यापन यांचे ) अधिकारी ठरले! व स्वतः निषेध पाळल्यामुळें आपणांस मात्र ते पूर्णाधिकारी किंवा षट्कर्मी ह्मणवूं लागले!

आरोग्यरक्षण दृष्टया ज्या प्रमाणें कित्येक मांसांचा निषेध करण्यांत आला त्याच प्रमाणें सजातियांचा व आपल्या सदृश प्राण्यांचा ह्मणजे वानर इत्यादि प्राण्याच्या मासांचा निषेध केला गेला. परंतु लुषाई वगैरे लोक आद्य स्थितींतील मनुष्यां प्रमाणें मस्तुत ही मनुष्यें भक्षितात तद्वत कातकरी वगैरे लोक वानर वगैरे मनुष्य सदृश्य प्राणी भक्षितात मन्वादिस्मृतिकारांचा निषेध त्यांच्या स्वप्नींही नाहीं.

वानर वगैरे मनुष्य सदृश प्राणी यांचें मांस मनुष्यांनीं खाऊं नये अशा विषयीं मनूस्मृतींत कसा निर्णय ठरविला आहे पहा.

चराणामन्नमचरा दंष्ट्रिणामप्यदंष्ट्रिणः
अहस्ताश्च सहस्तानां शूराणां चैव भीरवः

५. २९

अर्थः—चर ह्मणजे हरिणादिक यांचें अन्न, अचर ( तृणादिक ); दंष्ट्री ( व्याघ्रादिक ) यांचें अन्न हरिणादिक; सहस्त ( मनुष्यादि ) यांचें अन्न अहस्त ( मत्स्यादिक ) शूर ( सिंहादिक ) यांचें अन्न भीरु ( गजादिक ).

यज्ञ, धर्मप्राप्त्यर्थ अवश्य वाटल्यामुळें तोतर केलाच पाहिजे ह्मणून केवळ त्या करितांच कायतो पशुवध युक्त मानिला, अन्यथा तो सदोष मानण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली.

यज्ञार्थं पशवः सृष्टाः स्वयमेव स्वयंभुवा
यज्ञस्य भूत्यै सर्वस्य तस्माद्यज्ञे वधोऽवधः

५. ३९

अर्थः—सर्व यज्ञाचे सिद्धीसाठीं ब्रह्मदेवानें स्वयमेव पशु उत्पन्न केले या करितां यज्ञाचे ठायीं जो पशुवध करणें तो वध नव्हे, कारण, त्या वधापासून दोष नाहीं.

असंस्कृतान्पशून्मंत्रैर्नाद्या द्विप्रः कदाचन
मंत्रैस्तु संस्कृता नद्याच्छाश्वतं विधिमा स्थितः

५. ३६

अर्थः—वेदविहित जो मंत्रसहित प्रोक्षणादि संस्कार तद्रहित पशुमांस, ब्राह्मणादिकानें कदापि भक्षण करूं नये, तर अनादि सिद्ध असा पशु यागादिकांचा विधि स्वीकारून मंत्रांनीं +संस्कार केलेले पशु भक्षण करावे.

यानंतर पुढें दयेचें तत्व थोड थोडें आमच्या पूर्वजांच्या मनांत शिरूं लागलें असावें असें दिसतें. मनु. अ ५. श्लोक १२. यांत मैना पोपट इत्यादि भक्षण करूं नयेत असें ह्मटलें आहे, अध्याय ५ श्लोक १८ यांत ससा व शल्यक ( मृग विशेष ) हे भक्ष्य सांगितले असून त्याच अध्यायाच्या ४५ व्या श्लोकांत सांगितलें आहे कीं.

योऽहिंसकानि भूतानि हिनस्त्यात्मसुखेच्छया
स जीवंश्च मृतश्चैव न क्वचित्सुखमेधते.

अर्थः—अन्याची हिंसा न करणारे असे हरिणादिक प्राणी यांला आपणांस सुख प्राप्त व्हावें या इच्छेनें जो मारितो तो जिवंत असतां इहलोकीं व मृत झाल्या नंतर परलोकीं सुखातें पावत नाहीं.

परस्पर विरुद्ध× अशा या दोन वचनांवरून इतकें स्पष्ट दिसतें कीं, आरंभीं हरिणादि निरुपद्रवी प्राण्याचा वध सांगितला असून पुढें सात्विक किंवा दयागुणाचा उद्भव झाल्यावर तो वध निंद्य मानण्यांत आला.

---

\+ नाहक पशुहिंसा करणें सदोष आहे हें मत यवनादिकांचेही आहे. वांद्रें येथील कसाईखान्यांत पशुहवना पूर्वीं यवनपशुइंते आपल्या धर्माप्रमाणें कांहीं मंत्र म्हणून मग पशुहिंसा करितात. हाच त्यांचा संस्कार होय. यावरून इतकी गोष्ट सिद्ध होते कीं, पशुवध ही गोष्ट मनास वाईट वाटणें, संस्कार युक्त मानवी स्वभावास अनुसरूनच आहे. आतां पशुवधाची जरूर वाटणें व तो केल्यास मनास रुखरुख लागणें असें होत असल्यामुळें, संस्कार युक्त पशू मारावे असा प्रघात पडला असावा.

× मनुस्मृतींत परस्पर विरुद्ध अशीं कित्येक विधानें आहेत परंतु, मांस भक्षणाच्या विधिनिषेधा संबंधानें तीं अशीं कांहीं चमत्कारिक रीतीनें केलेलीं आहेत कीं, तीं पाहून कित्येक अल्लड सुधारकांस वाटतें कीं, मनुस्मृति हा पोरखेळ आहे. एका श्लोकांत मासे खावे ह्मणून मनु ह्मणतो व त्याच्या पुढच्याच श्लोकांत मत्स्य भक्षणाचा निषेध करितो तेव्हां याच्या सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें म्हणून ते मनूची थट्टा उडवि-

पुढें गौतम बुद्धानें *अहिंसाधर्माची स्थापना केली. यज्ञमिषानें वैदिक लोक अत्यंत क्रूरतेनें पशूंचा वध करीत. या क्रूरतेच्या गोष्टी पाहून त्याचें मन कळवळलें व त्यांच्या प्रतिकारार्थच त्यानें बौद्धधर्माची स्थापना केली. त्या धर्माच्या १० आज्ञांपैकीं पहिलीच आज्ञा अशी आहे कीं " कोणाचाही जीव घेऊं नको " या आज्ञेंत त्यानें सर्व प्रका-

---

तात. त्यांनीं ही गोष्ट पूर्णपणें लक्षांत ठेवावी कीं, परस्पर विरुद्ध विधानें एकाच मनूनें केलेलीं नव्हत. मनु हा, शास्त्रवचनाचा संग्राहक होय. जुनेपणांत पवित्रता हें आमच्या धर्माचें रहस्य, इतर धर्मापेक्षां फार जोरानें आमच्या स्मृतिकारांनीं आदरिलेलें आहे म्हणून, मांसभक्षणाच्या विधिकालांतील वचनें, निषेधकालांतही पवित्र वाटून त्यांच्या शेजारींच त्यांची स्थापना करण्यांत आली आहे. यामुळेच ऐतिहासिक दृष्ट्या मनूची योग्यता विशेष मानण्यांत येते. मॅक्समूलर साहेबांनीं वेदांतफिलासफी या ग्रंथांत क्रमविरहित व परस्पर विरुद्ध +उपनिषद्वचनांची थोरवी गायली आहे त्याच प्रमाणें ऐतिहासिकदृष्ट्या मनुस्मृतीची ही थोरवी गाणें प्रशस्त होय. पूर्वकालचीं वचनें मनूनें गाळलीं असतीं तर त्याच्या स्मृतींत असंबद्धता दिसली नसती खरी परंतु, आचारांचें उत्क्रमण कशा रीतीनें झालें हें कळण्यास मग मुळींच मार्ग राहिला नसता. वास्तव ज्या विरुद्ध विधानांस्तव आमचे तरुण मनूची थट्टा करितात त्या विधानांमुळेंच त्यांनीं त्याचे फार फार आभार मानिले पाहिजेत !

---

+" We watch in them the historical growth of philosophical thought, and are not offended therefore by the variety of their opinions. On the contrary, we expect to find variety, and are even pleased when we find independent thought and apparent contradictions between individual teachers, although the general tendency of all is the same ". Page 34.

* अहिंसेचें तत्व वैदिक धर्मांत मुळींच नव्हतें असें नाहीं, बीजरूपानें तें त्यांत होतेंच. वनांत रहाणारे सत्वशील ऋषि बहुतेक अहिंसकच होते. कण्वाश्रमीं पोसलेल्या हरिणावर दुष्यंत शरप्रहार करीत असतां, कण्वशिष्यांनीं त्यास न मारण्या विषयीं काकळूत वाणीनें विनविल्याचें, शाकुंतल नाटक वाचणाऱ्यांस समजलेंच असेल. बुद्धानें अहिंसेवर विशेष जोर दिल्यामुळें अहिंसेची प्रवृत्ति त्यानें पाडली असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. बुद्ध जरी मांसभक्षणा विरुद्ध होता तरी तो स्वत: अतिशय डुकराचें मांस खाल्यामुळेंच मेला, असें एकाटिकाणीं वर्णन आहे. अहिंसेची विशेष प्रवृत्ति अशोकाच्या कारकीर्दीं पासून पडली असावी असें विद्वानांचें मत आहे.

रच्या जीवांचा समावेश केला होता. त्यानें आपल्या शिष्यांस कोणतीही वनस्पति उपटण्याची मनाई केली होती, कारण तींत प्राण्यासारखा जीव असून मनुष्य मरून त्याचा आत्मा तिच्यांत गेलेला असेल अशी त्याची कल्पना होती. यज्ञाच्या विरुद्ध बौद्ध लोकांचीं जीं वादप्रमाणें होतीं त्यांपैकीं एक हें होतें कीं, "ज्योतिष्टोम विधि करितांना तत्प्रीत्यर्थ मारलेला पशु स्वर्गांत जातो असें असेल तर, यज्ञकर्त्यानें यज्ञांत आपला बापच कां बळी न द्यावा!'

गौतमाच्या दयाधर्माचे कळवळ्याचें उपदेश, लोकांच्या मनांत बिंबून ते त्याच्या धर्मास अनुसरूं लागले तसतशी वैदिकधर्मी लोकांची संख्या घटत चालली. आपला धर्म नामशेष होऊन जाणार या भीतीनें वैदिकधर्मी धर्माध्यक्षांनीं किंवा स्मृतिकारांनीं कांहीं तडजोड करून बुद्धाचीं सात्विक किंवा अहिंसेचीं तत्वें आपल्या धर्मांत गोंवलीं ही गोष्ट मनुस्मृतीवरून स्पष्ट दिसते.

नाकृत्वा प्राणिनां हिंसां मांसमुत्पद्यते क्वचित्
नच प्राणिवधःस्वर्ग्यं स्तस्मान्मांसं विवर्जयेत्. ५–४८

अर्थः—प्राण्यांची हिंसा केल्याविना मांस उत्पन्न होत नाहीं, आणि प्राणिवध तर नरकालाच कारण आहे तस्मात् मांस भक्षण करूं नये.

समुत्पत्तिं च मांसस्य वधबंधौ च देहिनाम्
प्रसमीक्ष्य निवर्तेत सर्वमांसस्य भक्षणात् ५–४९

अर्थः—शुक्रशोणित परिणामरूप अशी दया उत्पन्न करणारी मांसाची उत्पत्ति आहे. आणि प्राण्याचा वध व बंधन हीं अति क्रूर कर्मे आहेत असें जाणून शास्त्रविहित मांसही वर्ज्य करावें, अविधि प्रयुक्त तर सर्वथा वर्ज्य होय.

बौद्धाचें अहिंसेचें तत्व वैदिक धर्मावर आपली छाप बसवीत असतां जन्मांतराचें मत मोठ्या जोरानें प्रचारांत येऊं लागलें. मनुष्याचा आत्मा मेल्यावर दुसऱ्या योनींत जातो, असें प्राचीन आर्यांचें मत नव्हतें, परंतु त्यांच्या वंशजांनीं तें आदरिल्यावरून मांस न खाण्याविषयीं त्यांस

मोठें निमित्त झालें. एखाद्यावेळीं आपली आजी मेंढीच्या जन्मास गेली असली तर मेंढी मारून खाल्ली असतां, आजीला खाल्ल्यासारखें होईल असे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले !

पंडितांनीं मांस वर्ज करण्यास कशी युक्ति योजिली आहे पहा—

**मांसभक्षयिताऽमुत्र यस्य मांसमिहाद्म्यहम् ।**
**एतन्मांसस्य मांसत्वं प्रवदंति मनीषिणः॥** मनु. ५—५५

**अर्थः**—या लोकीं ज्या प्राण्याचें मांस मी भक्षण करितों तो परलोकीं मला भक्षण करील याप्रमाणें **मांस** या शब्दाचा अर्थ '**मां**' (मला) '**स**' (तो) असा पंडित जन करितात.

पुराणांत पशुयज्ञाचा निषेध कसा खडसून केला आहे याविषयीं मत्स्य पुराणांतील खालील ×उतारा लक्षांत ठेवण्याजोगा आहे.

---

× " त्या काळीं सर्व ऋत्विज त्या श्रेष्ठ कर्मांत स्वकर्माविषयीं प्रवृत्त असून होम करणारा, अर्थात अनेक प्रकारचे होमद्रव्यांचा देवांच्या उद्देशानें होम करीत असतां तेथें देव आले, तेव्हां सामवेदाचें गायन करणारे सुस्वरानें गायन करूं लागले, ते समयीं अध्वर्युंच्या हाताखालचे त्वरायुक्त पुरुष पशूंस मारण्याविषयीं प्रवृत्त होऊन त्यांनीं ते यज्ञाचे पशु मारले असतां मन आदी करून सर्व इंद्रियांस प्रेरणा करणारे जे देव आहेत ते देव त्याकाळीं यथार्थ बोलावून तेथें आले असतां जे प्रतिकल्पाचे आरंभीं इंद्राचें साहाय्य करणारे देव असतात ते त्या देवांचें यजन करितात. नंतर अध्वर्यूनें प्रयोच्चार करण्याचे समयीं ते सर्व महर्षी उठले आणि आर्तस्वरानें ओरडणाऱ्या त्या पशुसमुदायास पाहून ते दयाळू ऋषि त्याकाळीं त्रैलोक्यराज इंद्रास विचारूं लागले कीं, हे इंद्रा तुझे यज्ञाचा विधि कसा आहे ? हे देवोत्तमा इंद्रा या तुझ्या यज्ञांत धर्माच्या इच्छेनें ही दीन पशूंची हिंसा चालली आहे हा महाबलिष्ठ अधर्म आहे; तस्मात् पशु मारण्याचा हा विधि तुझे यज्ञांत आम्हांस इष्ट नाहीं. हे इंद्रा त्वां, धर्माच्या नाशार्थ पशु मारून हा अधर्म आरंभला आहेस हा कांहीं धर्म नव्हे तर हा अधर्मच आहे. कारण शास्त्रांत हिंसेस धर्म असें म्हणत नाहींत, तस्मात तूं धर्म करण्यास इच्छित असशील तर वेदांचे प्रमाणानें धर्माचें आचरण कर. हे देवश्रेष्ठ ज्या धर्मांत इतरांस दुःख नाहीं अशा शास्त्रविधियुक्त यज्ञाचे विधींत धर्म, अर्थ व काम यांचे साधनास कारण अशा यज्ञोपयोगी धान्याचे बीजांनीं यज्ञ कर. हे इंद्रा हाच यज्ञ महान् श्रेष्ठ असें पूर्वीं ब्रम्हदेवानें सांगितलें आहे. याप्रमाणें तत्वज्ञानी ऋषींनीं सांगितलें तरी तो त्रैलोक्यराज इंद्र, गर्व न अविचार यांनीं युक्त होता, त्यामुळे

अशा विचाराचा काळांत पशुभक्ति मोठ्या जोरानें प्रचारांत येऊं लागली. दिवसेंदिवस लोक संख्या जास्त वाढत चालली. शेतकीवर सर्वांचें जीवित अवलंबून असल्यामुळें त्या शेतीस फार उपयोगी पडणारे गाईबैल यांस ईश्वरा प्रमाणें लोक मान देऊं लागले. फार प्रा-

---

त्यानें तें ऋषींचें मत मानिलें नाहीं. तेव्हां तेथें इंद्र व महर्षी यांचा मोठा विवाद उत्पन्न झाला तो असा कीं जंगम (पशु) स्थावर (धान्यबीजें) यांत कोणते द्रव्यानें यज्ञ करावा.

नंतर ते ऋषि वादशक्तीनें समर्थ असूनही त्या वादानें खिन्न (श्रमी) होऊन इंद्राशीं मध्यस्थाचे द्वारानें निर्णय करण्याचा संकेत करून त्याविषयीं उपरीचरवसु राजास विचारतात. ऋषी बोलले, उत्तानपात वंशस्था, महा बुद्धिमंता, समर्था, उपरिचर वसुराजा, त्वां वेदशास्त्रांत यज्ञाचा विधि कसा पाहिला आहेस, तो सांगून आमचा संशय दूर कर. असें तें ऋषींचें वाक्य श्रवण करून तो उपरिचर वसु त्यांस बोलूं लागला. तो राजा बोलला कीं, मुंज झालेल्या ब्राम्हणांनीं जसा अवश्य यज्ञ करावा तसेंच शुद्ध पशु किंवा फळें व मुळें यांनीं यज्ञ करावा. ऋषी हो, **हिंसा हा यज्ञाचा स्वभाव आहे** असें माझ्या पाहण्यांत आहे. तसेंच **यज्ञाचे मंत्रांतही पशुहिंसा करण्याचींच लिंगें आहेत** असें दीर्घ तप करणारे असून सर्व नक्षत्रादिकांस ज्ञान दृष्टीनें प्रत्यक्ष पाहणारे ऋषि जाणतात या प्रमाणांवरून म्यां सांगितलें; तस्मात् आतां तुम्ही या वादापासून शांत होण्यास योग्य आहांत. ब्राम्हणहो, आपलीं वेदवाक्यें जर तुम्हांस प्रमाण आहेत; तर जसें वेदवाक्यांचें प्रमाण आहे तसा तुम्ही यज्ञ प्रवृत्त करावा; परंतु अन्यथा आपण न करावें. असें त्या मध्यस्थ उपरिचर वसु राजानें उत्तर केल्यावर त्या ऋषींनीं ध्यानयोगानें पुढें अवश्य होणारें तें भविष्य जाणून त्याकालीं त्या उपरिचर वसु राजास तूं खालीं पड असा शाप दिला. नंतर तो राजा पूर्वी असा आकाशमार्गांत संचार करीत असून असें ऋषींचे मुखांतून शाप वचन निघतांच त्यानें तो राजा रसातळास प्रवेश करता झाला. वसु राजा धर्माचे विचारांत संशयच्छेद करणारा असून तो ऋषींच्या शापवाक्यानें खालीं जाऊन भूतलावर संचार करूं लागला.

मत्स्य पुराण. अ० १४२.

बुद्धाचें अहिंसेचें तत्व वैदिक धर्मांत जोरानें शिरत असतां मागल्या पुढल्या वर्तनाचा मेळ पाडण्याकरितां पुराणकर्त्यांनीं कशा गोष्टी रचिल्या आहेत याचा मासला वरील उताऱ्यावरून चांगला कळण्यासारखा आहे. पूर्वकाळीं यज्ञांत पशु खरोखरच मारीत होते व, त्यास पुन्हां सजीव करीत नव्हते ही गोष्ट याच उताऱ्यावरून ध्वनित होते.

चीनकाळीं ज्या गाईचें मांस मोठें पवित्र मानून लोक तें भक्षण करीत त्या गाईस माता ह्मणण्यांत ते भूषण मानून, मातेच्या दुधा प्रमाणें तिचें दूध पिऊन त्यांतच तृप्त होऊं लागले. स्वतः गोमांस सोडलें इतकेंच नव्हे तर तें भक्षण करणाराच्या सावलीसही उभें राहण्यांत +दोष आहे असें वाटूं लागलें. मनुस्मृतींत गोहत्येस फारच मोठें प्रायश्चित्त सांगितलें आहे यावरून गाईची योग्यता पुढें लोकांस किती करूं लागली ही गोष्ट स्पष्ट समजणार आहे.

गाईप्रमाणें तिचा पति जो *बैल त्यासही लोक पूज्य मानूं लागले. गाईबैलांप्रमाणेंच इतर निरुपद्रवी व उपयुक्त पशुपक्ष्यांच्या ठिकाणीं

---

+ ह्माराची सावली न घेण्याचें कारण काय तें यावरून स्पष्ट होणार आहे. याबद्दल विस्तारपूर्वक निरूपण मागे आम्हीं केलेंच आहे. या निषेध प्रकरणासंबंधानें येथें इतकेंच सांगावयाचें आहे कीं, विचारी महात्म्यांनीं एखाद्या गोष्टीचा केलेला निषेध सर्व लोकांनीं सारखाच अमलांत आणलेला दिसत नाहीं. ज्यांनीं हा निषेध मान्य केला नाहीं ते अपवित्र म्हटले गेले. मत्स्यभक्षणनिषेधासंबंधाची टीप पूर्वीं दिली आहे तीवरून ही गोष्ट स्पष्ट ध्यानीं येईल. बुद्धाच्या दयाधर्माचीं तत्वें, वैदिक धर्मांत शिरतांच धर्मोपदेशक जो, उत्कृष्ट ब्राम्हणवर्ग त्यानें सर्व प्रकारचें मांस सोडिलें, ब्राह्मणेतरांस तसें करणें अवघड वाटलें ह्मणून, त्यांनीं विशेषतः गोमांस मात्र वर्ज्य करून इतर मांसाचा त्याग केला नाहीं. यामुळें त्यांकडे ब्राम्हण लोकांनीं रोटी व्यवहार करण्याचें बंद केलें. क्षत्रिय कुलोत्पन्न द्रौपदी इच्या हातचे, ६० सहस्र ब्राम्हणांनीं अन्न भक्षिल्याची गोष्ट पूर्वकालीं घडल्याचें पुराणावरून दिसतें, तसा प्रकार पुढें झाल्याचें आढळत नाहीं. ब्राह्मणांनीं द्वेषानें आपणाकडे मोठेपणा घेऊन ब्राम्हणेतरांशीं बेटीरोटी व्यवहार बंद केला, असे कुत्सित विचार कित्येक अज्ञान ब्राम्हणेतर दर्शवितात, ते जर इतिहासाकडे दृष्टि देतील तर बेटीरोटी व्यवहारासंबंधानें तरी ब्राम्हणास त्यांस दोष देतां येणार नाहीं.

* शंकर व नंदी यांस आम्हीं दैवत मानलें याचें कारण फार विचाराचें आहे. शंकराची खूण लिंगरूपानें दाखविली जाते व शाळुंखींत तिची स्थापना केलेली असते. स्त्रीपुरुष जननेंद्रियांपासून सर्वांची उत्पत्ति आहे त्या धोरणावर पिंडी व शाळुंखी यांची रचना आहे. **'शंकरा पूर्वीं बैलास वंदन'** अशी निंदाद्योतक ह्मण पडली आहे परंतु तिचा मूळ उद्देश फार गूढ आहे. बैल धान्य उत्पन्न करितो, त्या धान्यभक्षणानें वीर्य उत्पन्न होतें व त्यापासून प्राण्याची उत्पत्ति होते. जननेंद्रियांपेक्षां वीर्याची योग्यता अधिक.

लोकांची विशेष करुणा उत्पन्न होऊं लागली. हिकडे अहिंसे संबंधानें बौद्ध उपदेशकांचे कळवळ्याचे उपदेश चाललेच होते, त्यामुळें व मुक्या प्राण्या करितां बुद्धधर्मी लोकांनीं पांजरापोळा सारख्या संस्था सुरू केल्या त्यांकडे पाहून वैदिक आर्यवंशजांस पशुहत्या भयंकर वाटूं लागली. यज्ञाकडे त्यांचा फार ओढा व यज्ञ तर पशूंखेरीज होणें अशक्य अतएव त्या यज्ञाचे प्रतिकल्प होऊं लागले.

वर्षे वर्षेऽश्वमेधेन यो यजेत शतं समाः
मांसानि च न खादे द्यस्तयोः पुण्यफलं समम्

म. ५. ५३

अर्थः—जो पुरुष शंभर वर्षें पर्यंत प्रतिवर्षी अश्वमेध यज्ञ करितो तो आणि जो यावज्जीव पर्यंत मांसभक्षण करीत नाहीं तो या उभयतांचें पुण्यफळ ( स्वर्गादिक ) समान जाणावें.

मांसभक्षणनिषेधाच्या श्रेष्ठपणाची कमाल.

फलमूलाशनै र्मेध्यैर्मुन्यन्नानां च भोजनैः
न तत्फलमवा प्नोति यन्मांस परि वर्जयेत्

म. ५. ५४

अर्थः—मांस भक्षणवर्ज्य केल्यानें जें फळ प्राप्त होतें, तें पवित्र अशीं कंद, मूळ, फळें भक्षण केल्यानें आणि वानप्रस्थांत नीवारादिक अन्नें भक्षण केल्यानें प्राप्त होत नाहीं.

यज्ञयागादिकांच्या महत्वाच्या पुढें कशा चिंधड्या उडाल्या आहेत त्या पहा.

क्षरंति सर्वा वैदिक्यो जुहोति यजति क्रियाः
अक्षरं दुष्करं ज्ञेयं ब्रह्म चैव प्रजापतिः

। म. २. ८४

---

धीं धान्यावर अवलंबून, धान्योत्पत्ति बैलाच्या साह्यानें, ह्मणून, शंकरा पूर्वी बैलास वंदन करणें अधिक न्यायाचें आहे. आतां बैल शंकराचा सेवक किंवा शिपाई असल्यामुळें धन्यापूर्वीं शिपायाची भेट होते असा उद्देश साहजिक ध्यानीं येतो. परंतु तो सत्य नव्हे कारण, शंकराचें लिंग ही अलंकारिक प्रतिमा आहे या गोष्टीकडे धोरण असलें पाहिजे. ऋषिपंचमीच्या दिवशीं बैलाच्या श्रमाचा पदार्थ बायका खात नाहींत याचें कारण चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आल्या वांचून राहणार नाहीं.

अर्थः—होम, यागादिरूप वेदविहित क्रिया त्या सर्व स्वतां नाशवंत असून त्यांचीं फलें जीं स्वर्गादिक तींही नाशवंत आहेत. परंतु प्रजांचा अधिपति जें ब्रह्म, तेंच हा ओंकार आहे. यास्तव यागादिरूप क्रिया-रहित जो ओंकार तो स्वरूपतः अविनाशी आहे. कारण ब्रह्मप्राप्तीला हेतु आहे, आणि याच्या जपानें ब्रह्मरूप होणें तें नाशवंत नाहीं यास्तव फलें करूनही तो अविनाशी आहे.

अशा स्थितींत यज्ञाचे प्रतिकल्प काय सांगितले आहेत ते पहा.

महर्षींनीं सांगितलेले गृहस्थाश्रमाचे पंचमहायज्ञ येणें प्रमाणें होते.

अध्यापनं ब्रह्मयज्ञः पितृयज्ञस्तु तर्पणम्
होमो दैव बलिर्भौतो नृयज्ञोऽतिथिपूजनम्

म. ३. ७०

अर्थः—पंच महायज्ञ असे—वेदाचें अध्यापन व अध्ययन करणें तो ब्रह्मयज्ञ, अन्नादिकानें किंवा उदकानें तर्पण करणें तो पितृयज्ञ, अग्नीचे ठायीं जो होम करणें तो देवयज्ञ, भूतबलि तो भूतयज्ञ, आणि अतिथीचें पूजन करणें तो मनुष्ययज्ञ.

याप्रमाणें, वैदिक लोकांचे यज्ञ म्हणजे क्रूरपणाचे आगर होते ते अहिंसामतप्रकर्षामुळें अत्यंत सात्विकरूप बनत चालले. अहिंसा मत प्रचलित करण्यांत पुढील बुद्धधर्मी राजांनीं फारच सक्तीचे व कडक हुकूम केले. बुद्धधर्मी महापराक्रमी अशोक राजा ख्रीस्तापूर्वी २६०—२२० पर्यंत राज्य करीत होता. त्यानें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागीं खडकांत लेख खोदून ठेविले आहेत. त्यांपैकीं एक येणें प्रमाणें आहेः—

"देवांचा प्रिय जो राजा प्रियदासी त्याचा हा +आज्ञा लेख आहे जीवहत्या अगदीं बंद केली आहे."

+ या प्रकारच्या आज्ञा युरोपांतील ग्रीस देशांत बुद्धोपदेशकांनीं नेल्याचे उल्लेख आढळले आहेत. ग्रीक लोकांत पायथागोरसपासून अहिंसामत निघाल्याची प्रसिद्धी आहे. संस्कृत गुरु याचें ग्रीक भाषेंत गोरास व बुद्ध याचें पुथ किंवा पुथा असें रूप होऊन त्यापासून पायथागोरास म्हणजे बुद्धमत उपदेशक असा शब्द बनला आहे.

पोंकाक्स इंडिया इन ग्रीस.

समुद्रांत ज्याठिकाणीं लाट उत्पन्न होते, तेथें तिची उंची सर्वांहून असते, तद्वत अहिंसामत बुद्धधर्मांत फारच जोरानें प्रचारांत आलें व हिंदुस्थानच्या वातावरणांत कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होण्याचा गुण आहे त्या अन्वयें अहिंसा मताची परमावधि झाली. नाकातोंडांत वाऱ्या बरोबर वातावरणांतील जीव शिरून मृत होतील या भयानें तोंडास फडकीं बांधण्याचा प्रघात सुरू झाला. वैदिक धर्माभिमान्यांनीं या परमावधीचें अनुकरण केलें नाहीं इतकेंच नव्हे, तर ज्ञानेश्वरा सारख्या साधुवर्यांनीं या अतिरेक पावलेल्या चालीची आपल्या ज्ञानेश्वरींत ×थट्टा उडविली आहे. नाकातोंडास फडकीं बांधण्या पर्यंत जरी त्यांची मजल पोंचली नाहीं. तरी त्या चाली जवळ जवळ ते गेले आहेत हें पुढील श्लोकांवरून दिसेल.

पंचसूना गृहस्थस्य चुल्लीपेषण्युपस्करः<br>
कंडनी चोदकुंभश्च वध्यते यास्तुवाहयन्

म. ३–६८

अर्थः—चुल्ली ह्मणजे चूल, पेषणी ह्मणजे जातें ( पाटा, वरवंटा इत्यादि पिष्ट करण्याचें साधन ) उपस्कर ह्मणजे केरसुणी, खराटा, कुंचा इत्यादि, कुंडें व गृह यांची शुद्धि करण्याचें साधन; कंडनी ह्मणजे उखळ, मुसळ इ० उदकुंभ घट हांडा इ० उदक ठेवण्याचें साधन या पांच सूना ह्मणजे वधस्थानें आहेत, यास्तव यांचा उपयोग गृहस्था श्रमी यानें आपल्या गृहकार्याकडे केला असतां त्यापासून जीवांची अल-क्षित हिंसा घडते आणि त्या पापेंकरून गृहस्थाश्रमी दोषी होतो. ह्मणून

---

× एकीं धर्माचिया वाहणी । गाळूं आदारिलें पाणी<br>
तंव गाळितया आहाळणी । जीव मेले ओ. २३५<br>
एक न पचवितीचि कण । इये हिंसेचे भेण<br>
तेथ कदर्थले प्राण । तेचि हिंसा. ओ. २३६

ज्ञानेश्वरी, अ. १३

तासां क्रमेण सर्वासां निष्कृत्यर्थं महर्षिभिः
पंच क्लृप्ता महायज्ञाः प्रत्यहं गृहमेधिनाम्
म. ३. ६९

अर्थः—त्या पंचसूनां पासून उत्पन्न होणाऱ्या पापाच्या निष्कृती साठीं गृहस्थाश्रमी यांनीं पंचमहायज्ञ प्रतिदिवशीं करावे.

प्रत्यहीं दोनप्रहरीं जेवणापूर्वी कर्मठ ब्राह्मण वैश्वदेव करीत असतात तो पंचसूनादोषपरिहारार्थच आहे.

याप्रमाणें अत्यंत क्षुद्रक जीवाची ज्ञातपणें--नव्हे अज्ञातपणें जरी आपणाकडून हिंसा झाली तरी मोठा दोष घडला, अशी आमची समजूत होऊं लागल्यावर, आमच्या पूर्वस्थितींत फारच फरक पडूं लागला. आर्य ह्मणजे श्रेष्ठ किंवा संभावित ही महत्वदर्शक संज्ञा अर् ह्म. नांगरणें या धातूपासून उत्पन्न झाली आहे. हें नांगरणें आह्मी अत्यंत नीचकृत्य समजूं लागलों. कारण, जमीन नांगरतांना पुष्कळ जीवजंतूंची हत्या होते. ज्या नांगराच्या साह्यानें मोठमोठीं नगरें आह्मीं बसविलीं व आमच्या वर्णमालेचा पहिलाच वर्ण 'अ' ही संज्ञा आह्मीं नांगरा*वरूनच बसविली, तो नांगर पुढें आह्मांस घातक वाटूं लागल्यामुळें, त्याची व्यवस्था आह्मीं दास केलेल्या शूद्र लोकांकडे लाविली. हल्लीं नांगऱ्या हा शब्द तुच्छतादर्शक झाला आहे !

बुद्धापूर्वींच आह्मांत मांसभक्षणाची थोड्याबहुत प्रमाणानें आरोग्यरक्षणदृष्ट्या व दयादृष्ट्या निवृत्ति पडत जाऊन, बऱ्याच प्रमाणानें

---

१ या पासून उर्वरा म्हणजे नांगरलेली किंवा सस्ययुक्त भूमि असा झेंद व संस्कृत भाषेंत शब्द आहे. सर्व आर्यभाषांत हा धातु नांगरणें या अर्थी आढळतो. Aro ( Latin ) I plough. प्राचीन स्लाहो. arati. गाथिक, arjan. लिथुएनियन. arti. केल्टिक er, या सर्वांवरून नांगरण्यास अर शब्द आहे असें दिसेल.

चिप्सफ्राम ए जर्मन वर्कशाप पुस्त. २ रें,

* अ ही देवनागरी वर्णाची खूण नांगरावरून आहे ही गोष्ट पूर्वकालच्या अ वर्णाचें रूप 'ऋ' यावरून सहज लक्षांत येईल. 'उ' वर्ण, भात कापण्याच्या विळ्याचा दर्शक आहे. शेतकीच्या आउतांच्या बऱ्याच खुणा आमच्या वर्णमालेंत आहेत.

परस्पर अन्नव्यवहार वर्ज होऊन, जातिभेदवृक्ष उफाळ्यानें वाढत चा-
लला होता. या वृक्षाचा समूळ नाश करून टाकावा हा बुद्धाचा उदात्त
हेतु होता. अहिंसेचें तत्व, सर्वांनीं स्वीकारलें असतें तर, त्याच्या यत्नास
यश आलें असतें परंतु जीव जीवांचें भक्ष्य हा जो निसर्गाचा मोठा नियम,
महासागरा प्रमाणें प्रचंड रूप धारण केलेला होता, त्यास सर्वथैव
शोषून टाकणें अशक्य होतें. ब्राह्मणादि उच्चवर्णांत जरी पशुहिंसा
ब्राह्मणेतरां पेक्षां बऱ्याच प्रमाणानें ×कमी झाली तरी, इतर वर्णांत ती
थोड्याबहुत प्रमाणानें होतीच. जरी इतर वर्ण, मांसभक्षण करीत तरी
श्रेष्ठ मानलेल्या ब्राह्मणवर्गानें मांस सोडल्यामुळें, मांस न खाणें पवित्र
व आपण मांस भक्षितों हें अपवित्रपण आहे असें त्यांस वाटूं लागलें
आपलें तें चांगलें असें वाटण्याचा एक स्वभाव मनुष्यांत आहे, त्या
अन्वयें मांसभक्षक जसे ब्राह्मणास उच्च मानीत तसे, आपणापेक्षां, अन्य
प्रकारच्या प्राण्याच्या मांसभक्षकास ते कमी योग्यतेचे समजूं लागले,
व त्यांशीं बेटीरोटी व्यवहार ते हळूहळू बंद करूं लागले
ह्मणून जातिभेदाचा वृक्ष तोडण्यास बुद्ध पहात होता, त्याची खच्ची झा-
ल्यामुळें तो उलट मोठ्या उफाळ्यानें वाढूं लागला, व अन्नोदक व्यव-
हार करण्यास, अत्यंत शंकारूपी मोठमोठालीं फळें त्यास येऊं लागलीं

याच काळाच्या सुमारास वैष्णवांचा अत्यंत सात्विक व प्रेमळ
भक्तिमार्ग सुरू झाला. चंडिकेला पूर्वीं रेडे व बकरीं अर्पण करण्याची
चाल होती तेथें आतां भोंपळे व ऊंस वाहूं लागले.

पुढें हळूहळू मुसलमान लोक आह्मांस जिंकून, जुलुमानें धर्मभ्रष्ट
करूं लागले. ब्राह्मणवेशानें कित्येक मुसलमानांनीं बऱ्याच हिंदुलोकांस
आपल्या हातचें अन्न भक्षवून त्यांस, यवनी धर्मांत घेतल्याच्या गोष्टी
जिकडे तिकडे पसरूं लागल्या. हिंदुस्थान देश अफाट, एका प्रांतांतील

× शंकराचार्यानुयायांत मात्र फार सक्तीनें मांसभक्षण वर्ज झालेलें दिसतें. इतर
ब्राह्मणांत थोड्या बहुत प्रमाणानें तें अद्यापि चालेंच.

लोकांशीं दुसऱ्या प्रांतांतील लोकांशीं, दळणवळणाचीं साधनें हल्ली प्रमाणें सुलभ नव्हतीं. कोण कोणत्या जातीचा, हें कळण्यास मार्ग नव्हता म्हणून, अत्यंत भीतीनें व संशयानें अनोळखी, जातवाल्याशींहि खाण्यापिण्यास दिक्कत वाटूं लागली.

अमांसभक्षक मांसभक्षकां पेक्षां पवित्र वाटूं लागल्यामुळें, आम्हांत कसे चमत्कारिक फरक होऊं लागले पहा. जिंकणारे लोक जिंकलेल्या लोकांस बहुशा जेवण करण्याच्या कामास लावितात असें इतिहासा वरून दिसतें. आम्हांस जिंकणाऱ्या युरोपीयन लोकांचे बवर्जी कोण आहेत ते पहा. आमच्या आर्जपूर्वजांनीं, दस्यूंस आपले स्वयंपाक्ये केले होते असा आधार सांपडतो. पुढें अन्नोदक व्यवहारांत संशय उत्पन्न झाल्यामुळें, अमांसभक्षक ब्राह्मणाच्या हातचें मात्र अन्न, इतर सर्व वर्णांतील लोकांस पवित्र वाटूं लागलें म्हणून, आपल्या पूर्वजांचे वेदांतोपदेशाचे कामाऐवजीं, विद्याविहीन ब्राह्मण आचार्य नांवाचें भ्रष्टरूप जें आचारी तें धारण करून, इतर वर्णांतील लोकांस स्वयंपाक करून घालूं लागले!

दिवसेंदिवस जातीभेदरूपी वृक्षाचीं संशयरूपी फळें पक्क होऊन त्याचीं बीजें वातावरणांत इतस्ततः पसरून, संशयाचें रान माजूं लागलें. ब्राह्मणाब्राह्मणांत सोंवळ्याओंवळ्याचें बंड फार माजत चाललें. मुळ्याच्या जातीचा बीट शिजविला असतां लाल दिसतो. मांस लाल असतें म्हणून, मांसाप्रमाणें लाल बीट खाण्यास मन कचरूं लागलें. पडवळ नागासारखें असतें म्हणून नागपंचमीच्या दिवशीं पडवळाची भाजी कर्मठांनीं वर्ज्य केली! मांसभक्षक गलिच्छ वाटल्यामुळें, त्यांशीं अन्नोदक व्यवहार बंद झाला इतकेंच नव्हे तर, त्यांच्या हातचा जलकण आंगावर पडल्यास स्नान केलें पाहिजे, त्याखेरीज शुद्धता नाहीं असे विचार मनांत येऊं लागले व, अत्यंत पवित्र मानलेल्या, वनस्पतिभक्षक ब्राह्मणा पासून तों, गोमांस भक्षक महारा पर्यंत प्रत्येक, कमी दर्जाच्या जातींत व पोट-

जातींत कमी अधिक प्रमाणानें भक्ष्याभक्ष्याच्या संबंधानें श्रेष्ठ कनिष्ट व भ्रष्टभाव उत्पन्न झाला. आणि खाण्यापिण्या संबंधानें भांडाभांडीस, मारामाऱ्यांस व प्रायश्चित्तांस पूर येत चालला.

अशा धामधुमीच्या काळांत इंग्रजांचें आह्मांवर वर्चस्व झाल्यामुळें, त्यांची आङ्ग्लभाषा आह्मांत उत्कट्यानें वाढत चालली. स्वधर्मा पेक्षां आङ्ग्लप्रभुधर्मांची जास्त माहिती होऊं लागली. इंग्रज आह्मांपेक्षां सर्व गुणांनीं श्रेष्ठ अशी भावना होतांच आमचे आचारविचार, पोरखेळ धाटून त्यांच्या मतांचा स्वीकार करण्यांत भूषण वाटूं लागलें. विद्वत्ता, द्रव्य, कीर्ति यांच्या जोरावर कित्येक अर्ध्या हळकुंडानें पिवळे होणारे-लोक, पुन्हा मांसभक्षणाचा प्रचार पाडूं लागले आहेत. कर्मठ त्यांचा द्वेष करीत आहेत परंतु, त्यांच्या मताचें सयुक्तिक खंडण करण्याचें त्यांस अवसान नाहीं. मांस खावें कीं न खावें याचा तरुणमंडळीस कांहींच निर्णय करितां येत नाहीं आहे. पाश्चात्यशिक्षण, मांसभक्षणास बहु-तांशीं उत्तेजनदायक होत आहे. आमचे शुद्धाचार, त्याचा निषेध करीत आहेत. यांत तथ्य काय आहे तें पाहिलें पाहिजे.

प्रस्तुत जगांत हयात असलेल्या राष्ट्रांत आमचें राष्ट्र सर्वांत जुनें आहे. मनुष्याची दिवसेंदिवस सुधारणा होत चालली आहे. सुधारणा ह्मणजे सात्विक गुणाचा प्रकर्ष होय. आद्यास्थिती पासून अत्यंत उन्नत स्थितींत मनुष्याचे विचार व आचार कसकसे बदलत गेले व त्यांस कसें उत्कृष्ट रूप आलें हें, आमच्या राष्ट्राच्या इतिहासावरून स्पष्ट कळतें. लहान मूल रांगत असतां आपलीच विष्ठा भक्षण करतें परंतु दिवसेंदिवस त्याचे आहार तो विचारानें ठरवूं लागतो, स्थावरजंगम हे सर्व प्राण्यांचें अन्न आहे, हा विधि अत्यंत आद्य स्थितींतला होता. द्विपादांत शिद्दी व चतुष्पादांत घडवंची वगळून बाकी सर्वांचा चिनी लोक फडशा पाडितात, अशी आह्मी त्यांची थट्टा करितों परंतु फार प्राचीन काळीं, तसाच प्रकार आमच्या पूर्वजांत होता तो काळ कोणी-

कडे, व मांसभक्षकाच्या ह्यातच्या शितोष्ण्यानें आपण वाटतों असें मानण्याचा काळ कोणीकडे ! याचा विचार केला असतां फार चमत्कार वाटतो. सुधारणे बराबर क्रौर्यपराङ्गमुखता वाढत चालली आहे. पाश्चिमात्य राष्ट्रें अत्यंत मांसभक्षक असतां, अलीकडे अलीकडे त्यांत व्हेजिटेरियन ( वनस्पतिभक्षक ) मंडळ्या निघूं लागल्या आहेत यावरून आपणास काय समजतें! आह्मा प्रमाणेंच हे लोक शनैः शनैः अमांसभक्षक बनतील असेंच नव्हे काय ? हिंसा दोन कारणांनीं प्रचारांत आली असें ज्ञानदेवांनी वर्णिलें तें खरें आहे. पहिलें कारण ईश्वरास बलिअर्पण. हें कारण जगांतील मांसभक्षक विचारी ख्रिस्ती धर्मास देखील हल्लीं तुच्छ वाटत आहे. मग तें आह्मांस वाटत असेल यांत नवल नाहीं. शरीरसंगोपनार्थ हिंसाकरणें हें दुसरें कारण आहे व यावरच काय तो पाश्चात्यमताचा व आमच्या कित्येक अनभिज्ञ जनाचा विचार आहे. आतां पाश्चात्य मोठमोठे विद्वान डाक्तर कित्येक मांसभक्षणास अनुकूल व कित्येक प्रतिकूळ आहेत, व परस्परांचीं मतें खोडण्यास्तव त्यांनीं मोठमोठे ग्रंथ लिहिले आहेत, त्यांतील तत्व पाहिल्यास असें आढळून येईल कीं, स्थितिपरत्वें व कालपरत्वें मांसभक्षणापासून सुष्ट परिणाम होतात, तथापि उत्कृष्टपणा ह्मटला ह्मणजे त्याच्या निवृत्तींतच तो आहे. शरीरपुष्टी, विवक्षित स्थितींत मांसभक्षणानें होईल हें खरें परंतु, मांस हें सात्विक अन्न नव्हे. दिवसेंदिवस शक्तीपेक्षां युक्तीस अधिक महत्व येत चाललें आहे. ब्राह्मणेतर मांसभक्षकांत शक्ती अधिक परंतु अमांसभक्षक ब्राह्मणांत युक्ति अधिक ही गोष्ट ब्राह्मणद्वेष करणाऱ्या दीनबंधूसारख्या ब्राह्मणेतरांनींही कबूल केली आहे. मांसास घाण येते ह्मणून मांस भ्रष्ट असें कर्मठांस वाटतें, ही चूक आहे. ताज्या मांसास घाण असते असें नाहीं परंतु, मांस हें उच्छिष्ट अन्न होय. शुद्धवनस्पतीचें जसें आपल्या शरीरांत शुद्ध रक्त बनतें, तसें मांसाचें बनत नाहीं. पशुपक्ष्यांनीं वनस्पती व धान्यें भक्षून आपल्या शरीरांत जें मांस बनविलें, तें मांस कितीही ताजें असलें

तरी, तें बनत असतां, ज्या रासायनिक क्रिया सुरू असतात त्यांच्या योगानें त्यास अशुद्धताच आलेली असते. मांसामध्यें एक प्रकारचा मादकपणाच असतो. शुद्धविचार उत्पन्न होण्यास सात्विक अन्नाची जरूर असते. तत्वशोधक महाविद्वान न्यूतन, यानें महाविचाराचा 'प्रिन्सिपिया' नांवाचा ग्रंथ रचित असतां, मांसाचा सर्वस्वी त्याग केला होता. याचप्रमाणें आह्मांतले महाभाविक भगवद्भक्त, तत्ववेत्ते, यांच्या उन्नत विचारांस अमांसभक्षणामुळेंच सामर्थ्य प्राप्त झालेलें दिसत आहे. प्रस्तुतचे पाश्चात्य महान तत्ववेत्ते, जरी मांसभक्षण करीत आहेत तरी, त्यांचा कल आस्ते आस्ते अमांसभक्षणाकडेसच होत चालला आहे.

आतां येथें अशी शंका उत्पन्न होण्यासारखी आहे कीं, पाश्चात्य कित्येक मांसभक्षकांतही सुविचारी तत्ववेत्ते निपजले आहेत. अमांसभक्षक लोक क्रूर, असून कित्येक यथोचित मांसभक्षक दयाळू पहाण्यांत आले आहेत तर, यथोचित मांसभक्षण करावें कीं नाहीं ? यास उत्तर असें आहे कीं, अधिक हिताची गोष्ट शहाणे करितात ह्मणून, प्राणच जाण्याचा प्रसंग असतां, भोळेपणा एकीकडे ठेवून विवक्षित स्थितींत मांसखाणें अवश्य आहे असें आनुभविक व विद्वान वैद्यांचें मत पडल्यास मांसभक्षण करावें परंतु, असा प्रसंग फारच क्वचित् येणारा आहे. शिवाय मांसाप्रमाणें वनस्पतींत जीवनोपयोगी सर्व द्रव्यें आहेत ह्मणून, होतांहोईतों, त्यांवरच गुजराण करणें, नीतिदृष्ट्या व आरोग्यदृष्ट्या हितकर आहे.

तसाच प्रसंग पडल्यास मांसभक्षण करावें या आमच्या विधानाचा भाव नीट लक्षांत ठेविला पाहिजे. दुष्काळांत कित्येक आईबापांनीं आपलीं पोटचीं पोरें खाल्लीं आहेत. त्यांस ज्या दृष्टीनें दोष देतां येणार नाहीं, त्याच दृष्टीनें मांसभक्षकास कार्यवशात् दोषी मानतां येणार नाहीं. वस्तुतः आपल्या चैनी करितां निरुपद्रवी प्राण्यास मारण्याचा

हक्क* मनुष्यास नाहीं. सुखदुःखसंवेदना पशूंस व मनुष्यांस सारख्याच होत असल्यामुळें, आपणासारखेंच ज्यांस दुःख होतें, त्या पशूंस मनुष्यानें मारणें हा अन्याय नव्हे काय? वाघ साप असल्या प्राणघातकांस मारणें हें, खुनी मनुष्याचा जीव घेण्या इतकेंच न्यायाचें आहे.

असो, खाणें याविषयाच्या विचारांत पुष्कळ गोष्टींचा विचार होणें जरूर असून केवळ मांसभक्षणाचाच विचार फार विस्तारानें केला याचें कारण असें कीं, आज हिंदुस्थानांत जातिभेद ह्मणून उग्ररूपधारण करणारा दैत्य, लोकांस दुःख देत आहे. तो कसा बनला व त्याचा नाश कोणत्या रीतीनें करावयाचा, ही गोष्ट कळणें फार अगत्याचें आहे. जातीजातींत व विशेषतः ब्राह्मण व ब्राह्मणेतरांत जो द्वेषभाव वाढत आहे, व परस्परांवर जो गालिप्रदानांचा परस्पर वर्षाव करीत आहेत, त्यांनीं नीट विचार करावा. ब्राह्मणांनीं आपणाकडे श्रेष्ठपणा उगाच घेतलेला नाहीं. तो घेणें त्यांस कसें भाग पडलें याचा विचार पूर्वीं केलाच आहे. आतां खाण्यापिण्यांत जातिभेद मोडणें असेल तर एकच उपाय आहे. तो कोणता तर, अमांस भक्षकांनीं मांसभक्षक किंवा मांसभक्षकांनीं अमांसभक्षक बनलें पाहिजे. या दोन्ही गोष्टी प्रस्तुत प्रसंगीं अशक्यच दिसताहेत. तरी सुधारणेचा कल ध्यानीं आणून मांसभक्षक, आपले आचार अधिक शुद्ध व सात्विक करण्यास झटतील तर, कालांतरानें हा जातिभेद कमी दुःखदायक होत जाऊन, पुढें ऐक्य होईल असें वाटतें.

**मांसविरहित अन्नांचाही सात्विक दृष्टीनें केलेला निषेध पहा.**

**लशुनं गृंजनं चैव पलांडुं कवकानि च**
**अभक्ष्याणि द्विजातीनाममेध्य प्रभवाणि च. म. ५. ५.**

**अर्थः**—लसूण, गाजरें, पलांडु ( स्थूलकंदशाक ) छत्राक, आणि अपवित्र पदार्थांपासून ( विष्ठादिकांपासून ) उत्पन्न झालेलीं तंदुलीय इत्यादिक हीं, द्विजातींला ( ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांला ) अभक्ष्य जाणावीं.

---

* 'तिर्य्यक प्राण्यांचे हक्क' या विषयावरील माझा निबंध पहावा.

याप्रमाणें भक्ष्याभक्ष्य पदार्थांचा फार बारीक विचार केलेला आहे त्याचें सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन केल्यास असें आढळेल कीं, शरीरास व मनास ज्यांपासून विकार उत्पन्न होईल, त्या वस्तु भक्षण करण्यास निषेध केला आहे. आतां हा निषेध कित्येक गोष्टींत फारच फाजील केला आहे, हें खरें, तरी त्या निषेधकरण्यांत उत्तम हेतु आहे तो आपण शोधून काढण्याचा यत्न करावा. आपल्या स्मृति इत्यादि शास्त्रांत कांहीं अर्थ नाहीं, हा बालिश विचार सोडून द्यावा. अनंत कालापासून आपल्या शास्त्रपुराणांच्या उपदेशाचे कर्मठांवर पुष्कळ सुष्टदुष्ट परिणाम झाले आहेत. सुष्ट परिणान हा आहे कीं, कर्मठांच्या अत्यंत भोळ्या समजुतींत उन्नत सुधारणेचें तत्व वास करीत आहे. जसें अमांसभक्षक कर्मठांची हिंसापराङ्गमुखता. कर्मठांच्या वर्तनांत दुष्ट परिणाम असा झाला आहे कीं, निरर्थक गोष्टींस व्यर्थ महत्व देण्यांत आलें आहे. जसें मांसभक्षकाच्या हातच्या शितोड्यानें अपवित्र झालों असें वाटणें. या सुष्टदुष्ट परिणामाचा नीट विचार करावा. आचार विचार कसे पालटत गेले यांविषयीं इतिहास जें आपणास सांगत आहे, त्याचा फायदा करून घ्यावा. सुधारणेच्या धवलगिरीवर चढविण्यास ज्या गोष्टी आपणांत चालू आहेत त्यांचा उच्छेद करून, आद्यस्थिति सारख्या रानटी चालींचें अनुकरण कधीं करूं नये. नीच मानलेल्या जातींचा द्वेष करूं नये. आपल्या सात्विक व शुद्ध आचरणानें त्यांस सुधारण्याचा यत्न करावा. जें उपयुक्त व हिताचें असेल, त्याचाच स्वीकार करून निरुपयोगी व घातक जें जें आढळेल त्याचा त्याग करावा ह्मणजे आपलें कल्याण होईल.

पूर्वार्ध समाप्त.

जागृत करणें कांहीं दिवस केंस राखणें ही गोष्ट बरी नव्हे ?' यावर उत्तर असें आहे कीं प्रत्येकाची आपल्या केंसांवर पूर्ण सत्ता आहे त्याला वाटेल त्याप्रमाणें तो त्यांची व्यवस्था करील. एखाद्यानें कधीं कोट घातला, कधीं अंगरखा घातला तर त्यास हसण्याचा आपणास अधिकार नाहीं, तो पाहिजे तेव्हां अंगरखा घालील, पाहिजे तेव्हां कोट घालील. अंगरखा किंवा कोट कायतें एकच नेहमीं घालीत रहा असें सांगणें जसें चमत्कारिक होईल तद्वत केंस राखणें तर नेहमीं राख हेंही सांगणें चमत्कारिकपणाचें दर्शक होणार आहे.

तेव्हां शुद्धतेकरितां, जाति पंथ भेद दर्शविण्याकरितां, सौंदर्याकरितां, आरोग्याकरितां, केश रचना भिन्न भिन्न प्रकारांनीं करणें योग्यच असल्यास त्यांत शरीरास इजा न होईल या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन काय फेरफार करणें असतील ते करावे.

---

## वस्त्राच्छादन.

या प्रकरणांत वस्त्रांशिवाय इतर गोष्टींचा समावेश करणें अवश्य आहे. वस्त्रांचा इतिहास थोडक्यांत सांगतों ह्मणजे त्यांत भोळेपणा कसा शिरला आहे हें सहज कळेल.

१ मनुष्याच्या आद्य स्थितींत इंद्रियांचा उघडेपणा त्यास लज्जास्पद वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर, जैन धर्मांतील दिगंबर पंथाचे लोक दिगंबर वृत्ति हीच उत्तम अवस्था मानितात. वस्त्राच्छादन कृत्रिम असल्यामुळें तें त्यांस त्याज्य वाटतें.

२ नग्नावस्थेंत आपला देह सुंदर दिसावा ह्मणून त्यावर मनुष्य नानाप्रकारचे रंग लावितो. विद्वानांनीं शोध करून असें ठरविलें आहे कीं, इतर सर्व रंगांत लाल रंग अंग रंगविण्यास मनुष्यानें मोठ्या आवडीनें निवडून घेतलेला दिसतो. जसजसा मनुष्य सुधारत जातो तसतसें रंगलेपन कमी प्रमाणानें होऊं लागतें. स्त्रियांचें कुंकुं रंगलेपनाचा अवशेष

होय. सुशिक्षित स्त्रियांचें कुंकू बारिक होत चाललें आहे. दा० आनंदीबाई टांचणीच्या बुध्यानें कुंकू लावीत. सर्वांगावरचा लाल रंग आमच्या स्त्रियांच्या अदृष्टांवर अत्यंत सूक्ष्म रूपानें चमकत आहे. अदृष्टावरून हा पुढें अदृश्य होईल असा विद्वानाचा तर्क आहे.

३ रंगलेपना मागून धूलिका व रक्षालेपन प्रचारांत आलें. भस्मलेपनाचें मूळ यांतच आहे.

४ पुढें उट्या प्रचारांत आल्या. गंध हें उटीचाच अवशेष आहे. गंध शब्दाचा अर्थ वास असा आहे.

५ उट्यां मागून गोंदणें आलें. स्त्रिया आपल्या कपाळावर व हातांवर चंद्र, स्वस्तिकें इत्यादि गोंदितात. हें त्याचें अवशेष होय.

६ पुढें तप्तमुद्राधारण प्रचारांत आलें. वैष्णवांत गुरूपासून तप्तमुद्रा घेणें हें मोठ्या खर्चाचें काम होऊन बसलें आहे. प्रत्येक मुद्रेस ५।६ रौप्यमुद्रा गुरूस द्याव्या लागतात.

७ पुढें शरीर विंधणें प्रचारांत आलें. नाकाकानांस भोकें पाडण्याचा जो प्रघात आहे तो विंधण्याचें अवशेष होय. जे लोक आपले नाक कान विंधीत नाहींत, त्यांस आह्मीं अविंध ह्मणजे यवन किंवा भ्रष्ट समजतों.

८ पुढें मनुष्य चर्मपरिधान करूं लागतो. मुंज्याच्या गळ्यांत हरणाच्या कातड्याचा तुकडा बांधलेला असतो. तें त्याचें अवशेष होय.

९ पुढें झाडांचे टाळे शरीरावर गुंडाळूं लागतो. नाटकांतील वनचर ऊर्फ विदूषक याच्या शरीरावर त्याचें अवशेष अद्याप आढळतें.

१० पुढें झाडांच्या सालींनीं देह आच्छादितो. वल्कलांचें पुराणादिकांत वर्णन आलेंच आहे. साली कुटल्या ह्मणजे त्यांचे जे तंतु तीं वल्कलें होत जानवें हें त्याचें अवशेष होय.

११ उभ्या तंतूंत आडवे तंतू भरून, मनुष्यें जाडीं भरडीं वस्त्रें नेसूं लागलीं. आरंभीं तीं गोणपाटासारखीं जाड असून पुढें कौशल्यानें

जामत करणें कांहीं दिवस केंस राखणें ही गोष्ट बरी नव्हे '' यावर उत्तर असें आहे कीं प्रत्येकाची आपल्या केंसांवर पूर्ण सत्ता आहे त्याला वाटेल त्याप्रमाणें तो त्यांची व्यवस्था करील. एखाद्यानें कधीं कोट घातला, कधीं अंगरखा घातला तर त्यास हमण्याचा आपणास अधिकार नाहीं, तो पाहिजे तेव्हां अंगरखा घालील, पाहिजे तेव्हां कोट घालील. अंगरखा किंवा कोट कायतें एकच नेहमीं घालीत रहा असें सांगणें जसें चमत्कारिक होईल तद्वत केंस राखणें तर नेहमीं राख हेंही सांगणें चमत्कारिकपणाचें दर्शक होणार आहे.

तेव्हां शुद्धतेकरितां, जाति पंथ भेद दर्शविण्याकरितां, सौंदर्याकरितां, आरोग्याकरितां, केश रचना भिन्न भिन्न प्रकारांनीं करणें योग्यच असल्यास त्यांत शरीरास इजा न होईल या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन काय फेरफार करणें असतील ते करावे.

---

## वस्त्राच्छादन.

या प्रकरणांत वस्त्रांशिवाय इतर गोष्टींचा समावेश करणें अवश्य आहे. वस्त्रांचा इतिहास थोडक्यांत सांगतों ह्मणजे त्यांत भोळेपणा कसा शिरला आहे हें सहज कळेल.

१ मनुष्याच्या आद्य स्थितींत इंद्रियांचा उघडेपणा त्यास लज्जास्पद वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर, जैन धर्मांतील दिगंबर पंथाचे लोक दिगंबर वृत्ति हीच उत्तम अवस्था मानितात. वस्त्राच्छादन कृत्रिम असल्यामुळें तें त्यांस त्याज्य वाटतें.

२ नग्नावस्थेंत आपला देह सुंदर दिसावा ह्मणून त्यावर मनुष्य नानाप्रकारचे रंग लावितो. विद्वानांनीं शोध करून असें ठरविलें आहे कीं, इतर सर्व रंगांत लाल रंग अंग रंगविण्यास मनुष्यानें मोठ्या आवडीनें निवडून घेतलेला दिसतो. जसजसा मनुष्य सुधारत जातो तसतसें रंगेलपन कमी प्रमाणानें होऊं लागतें. स्त्रियांचें कुंकुं रंगेलपनाचा अवशेष

होय. सुशिक्षित स्त्रियांचें कुंकूं बारिक होत चाललें आहे. दा० आनंदीबाई टांचणीच्या बुध्यानें कुंकूं लावीत. सर्वांगावरचा लाल रंग आमच्या स्त्रियांच्या अदृष्टांवर अत्यंत सूक्ष्म रूपानें चमकत आहे. अदृष्टावरून हा पुढें अदृश्य होईल असा विद्वानाचा तर्क आहे.

३ रंगलेपना मागून धूलिका व रक्षालेपन प्रचारांत आलें. भस्मलेपनाचें मूळ यांतच आहे.

४ पुढें उट्या प्रचारांत आल्या. गंध हें उटींचाच अवशेष आहे. गंध शब्दाचा अर्थ वास असा आहे.

५ उट्यां मागून गोंदणें आलें. स्त्रिया आपल्या कपाळावर व हातांवर चंद्र, स्वस्तिकें इत्यादि गोंदितात. हें त्याचें अवशेष होय.

६ पुढें तप्तमुद्राधारण प्रचारांत आलें. वैष्णवांत गुरूपासून तप्तमुद्रा घेणें हें मोठ्या खर्चाचें काम होऊन बसलें आहे. प्रत्येक मुद्रेस ५।६ रौप्यमुद्रा गुरूस द्याव्या लागतात.

७ पुढें शरीर विंधणें प्रचारांत आलें. नाकाकानांस भोकें पाडण्याचा जो प्रघात आहे तो विंधण्याचें अवशेष होय. जे लोक आपले नाक कान विंधीत नाहींत, त्यांस आह्मीं अविंध ह्मणजे यवन किंवा भ्रष्ट समजतों.

८ पुढें मनुष्य चर्मपरिधान करूं लागतो. मुंज्याच्या गळ्यांत हरणाच्या कातड्याचा तुकडा बांधलेला असतो. तें त्याचें अवशेष होय.

९ पुढें झाडांचे टाळे शरीरावर गुंडाळूं लागतो. नाटकांतील वनचर ऊर्फ विदूषक याच्या शरीरावर त्याचें अवशेष अद्याप आढळतें.

१० पुढें झाडांच्या सालींनीं देह आच्छादितो. वल्कलांचें पुराणादिकांत वर्णन आलेंच आहे. साली कुटल्या ह्मणजे त्यांचे जे तंतु तीं वल्कलें होत. जानवें हें त्याचें अवशेष होय.

११ उभ्या तंतूंत आडवे तंतु भरून, मनुष्यें जाडीं भरडीं वस्त्रें नेसूं लागलीं. आरंभीं तीं गोणपाटामारखीं जाड असून पुढें कौशल्यानें

जामत करणें कांहीं दिवस केंस राखणें ही गोष्ट बरी नव्हे ?' यावर उत्तर असें आहे कीं प्रत्येकाची आपल्या केंसांवर पूर्ण सत्ता आहे त्याला वाटेल त्याप्रमाणें तो त्यांची व्यवस्था करील. एखाद्यानें कधीं कोट घातला, कधीं अंगरखा घातला तर त्यास हंसण्याचा आपणास अधिकार नाहीं, तो पाहिजे तेव्हां अंगरखा घालील, पाहिजे तेव्हां कोट घालील. अंगरखा किंवा कोट कायतें एकच नेहमीं घालीत रहा असे सांगणें जसें चमत्कारिक होईल तद्वत केंस राखणें तर नेहमीं राख हेंही सांगणें चमत्कारिकपणाचें दर्शक होणार आहे.

तेव्हां शुद्धतेकरितां, जाति पंथ भेद दर्शविण्याकरितां, सौंदर्याकरितां, आरोग्याकरितां, केश रचना भिन्न भिन्न प्रकारांनीं करणें योग्यच असल्यास त्यांत शरीरास इजा न होईल या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊन काय फेरफार करणें असतील ते करावे.

---

## वस्त्राच्छादन.

या प्रकरणांत वस्त्रांशिवाय इतर गोष्टींचा समावेश करणें अवश्य आहे. वस्त्रांचा इतिहास थोडक्यांत सांगतों ह्मणजे त्यांत भोळेपणा कसा शिरला आहे हें सहज कळेल.

१ मनुष्याच्या आद्य स्थितींत इंद्रियांचा उघडेपणा त्यास लज्जास्पद वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर, जैन धर्मांतील विवसन पंथाचे लोक दिगंबर वृत्ति हीच उत्तम अवस्था मानितात. वस्त्राच्छादन कृत्रिम असल्यामुळें तें त्यांस त्याज्य वाटतें.

२ नग्नावस्थेंत आपला देह सुंदर दिसावा ह्मणून त्यावर मनुष्य नानाप्रकारचे रंग लावितो. विद्वानांनीं शोध करून असें ठरविलें आहे कीं, इतर सर्व रंगांत लाल रंग अंग रंगविण्यास मनुष्यानें मोठ्या आवडीनें निवडून घेतलेला दिसतो. जसजसा मनुष्य सुधारत जातो तसतसें रंगलेपन कमी प्रमाणानें होऊं लागतें. स्त्रियांचें कुंकु रंगलेपनाचा अवशेष

होय. सुशिक्षित स्त्रियांचें कुंकू बारिक होत चाललें आहे. डा० आनं-दीबाई टांचणीच्या बुध्यानें कुंकू लावीत. सर्वांगावरचा लाल रंग आमच्या स्त्रियांच्या अदृष्टांवर अत्यंत सूक्ष्म रूपानें चमकत आहे. अदृष्टावरून हा पुढें अदृश्य होईल असा विद्वानाचा तर्क आहे.

३ रंगलेपना मागून धूलिका व रक्षालेपन प्रचारांत आलें. भस्मलेपनाचें मूळ यांतच आहे.

४ पुढें उट्या प्रचारांत आल्या. गंध हें उटीचाच अवशेष आहे. गंध शब्दाचा अर्थ वास असा आहे.

५ उट्यां मागून गोंदणें आलें. स्त्रिया आपल्या कपाळावर व हातांवर चंद्र, स्वस्तिकें इत्यादि गोंदितात. हें त्याचें अवशेष होय.

६ पुढें तप्तमुद्राधारण प्रचारांत आलें. वैष्णवांत गुरूपासून तप्तमुद्रा घेणें हें मोठ्या खर्चाचें काम होऊन बसलें आहे. प्रत्येक मुद्रेस ५।६ रौप्यमुद्रा गुरूस द्याव्या लागतात.

७ पुढें शरीर विंधणें प्रचारांत आलें. नाकाकानांस भोकें पाडण्याचा जो प्रघात आहे तो विंधण्याचें अवशेष होय. जे लोक आपले नाक कान विंधीत नाहींत, त्यांस आह्मीं अविंध ह्मणजे यवन किंवा भ्रष्ट समजतों.

८ पुढें मनुष्य चर्मपरिधान करूं लागतो. मुंज्याच्या गळ्यांत हरणाच्या कातड्याचा तुकडा बांधलेला असतो. तें त्याचें अवशेष होय.

९ पुढें झाडांचे टाळे शरीरावर गुंडाळूं लागतो. नाटकांतील वनचर ऊर्फ विदूषक याच्या शरीरावर त्याचें अवशेष अद्याप आढळतें.

१० पुढें झाडांच्या सालींनीं देह आच्छादितो. वल्कलांचें पुराणादिकांत वर्णन आलेंच आहे. साली कुटल्या ह्मणजे त्यांचे जे तंतु तीं वल्कलें होत जानवें हें त्याचें अवशेष होय.

११ उभ्या तंतूंत आडवे तंतू भरून, मनुष्यें जाडीं भरडीं वस्त्रें नेसूं लागलीं. आरंभीं तीं गोणपाटासारखीं जाड असून पुढें कौशल्यानें